श्री

# ...ड्ास-संशोधक-मंडळ.

...के १८३२.

श्री

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

## अहवाल शके १८३२.

संपादक

खं० चिं० मेहेंदळे, बी. ए. चिटणीस.

पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत छापिलें.

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

किंमत ~~२~~ 10/- रुपये.

१९११.

रा. नटेश अप्पाजी द्रवीड यांनीं पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत छापिला, व
रा. खंडेराव चिंतामण मेहेंदळे, बी. ए. चिटणीस, यांनीं अप्पा बळवंताचा
वाडा-भा. इ. सं. मंडळाचें कार्यालय येथें प्रसिद्ध केला.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे

# नियम.

१ मंडळाचे सभासद होऊं इच्छिणारे गृहस्थाचे अर्जाची अगर इच्छेची लेखी सूचना मंडळापुढें एक पंधरवडा आगाऊ आली पाहिजे, व मंडळाचे बहुमतानें निवड झाल्यावर त्यास मंडळाचा सभासद होतां येतें.

२ वार्षिक वर्गणी रुपये २५ आगाऊ दिली पाहिजे. (दुसरे वर्षापासून या नियमाची दुरुस्ती करण्यांत आली आहे. सभासदाचे मासिक प्राप्तीचा भाग शेंकडा सव्वासहा या प्रमाणानें वार्षिक वर्गणी आगाऊ देणें.)

३ मंडळाची सभा दर पंधरावे दिवशीं भरते.

४ मंडळापुढें वाचण्यांत अगर चर्चेस येणारे निबंध साधार व लेखनिविष्ट च असले पाहिजेत.

श्री

# इतिहाससंशोधकमंडळाचा

## गतवर्षाचा ( शके १८३२ )

### अहवाल

---

**अध्यक्ष व सभासद हो,**

१ आपल्या मंडळाची स्थापना शके १८३२ च्या आषाढशुद्ध प्रतिपदेस झाली. त्यावेळीं आपण असें ठरविलें कीं, हें पहिलें वर्ष नऊ महिन्यांचें धरावें व पुढील वर्षास चैत्रापासून सुरुवात करावी. त्याप्रमाणें, आजची ही बैठक नव्या वर्षाची पहिली आहे. तेव्हां पुढील वर्षाच्या कामाला आरंभ करण्यापूर्वी, गतवर्षांत आपण जें थोडेंबहुत काम केलें त्याचा आढावा घेणें जरूर आहे.

२ गतवर्षाच्या अखेरीस मंडळाचे सभासद येणेंप्रमाणें होतेः—

१ नामदार रावबहादूर गणेश व्यंकटेश जोशी, बी. ए., अध्यक्ष, पुणें.

२ सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे, बी. ए., चिटणीस व खजिनदार, पुणें.

३ श्रीमंत विनायक नीलकंठ ऊर्फ रावसाहेब नातू, इनामदार, पुणें.

४ प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानु, बी. ए., पुणें.

५ रावसाहेब काशीनाथ नारायण साने, बी. ए., पुणें.

६ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एलएल. बी., संपादक, मराठा व केसरी, पुणें.

७ रावबहादूर चिंतामण विनायक वैद्य, एम. ए. एलएल. बी., कल्याण.

८ रा. रा. नारायणराव भवानराव ऊर्फ नाना पावगी, बी. ए., पुणें.

९ रा. रा. गणेश सखाराम खरे, एंजिनीयर, पुणें.

१० श्रीमंत सरदार गंगाधरराव नारायण ऊर्फ आबासाहेब मुजूमदार, पुणें.

११ डॉक्टर गणेश कृष्ण गर्दे, एल. एम. अँड एस., पुणें.

१२ रा. रा. हरि नारायण आपटे, संपादक करमणूक व व्यवस्थापक आनंदाश्रम, पुणें.

१३ श्रीमंत रा. रा. महादेव मोरेश्वर भानु फडणीस, पुणें.

१४ रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव, बी. ए. एलएल. बी., सत्कार्योत्तेजक सभा, धुळें.

१५ प्रोफेसर हरि गोविंद लिमये, एम. ए., पुणें.

१६ रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए., सर्व्हंट ऑफ् इंडिया सोसायटी, पुणें.

१७ रा. रा. अच्युत सीताराम साठे, एम. ए. बी. एल. सबजज्ज, दर्यापूर, वऱ्हाड.

१८ विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, पुणें.

१९ रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए., संपादक मुमुक्षु, पुणें.

२० रा. रा. काशीनाथ कृष्ण लेले, पुणें.

२१ रा. रा. कृष्णाजी गोविंद ओक, महाड.

३ गतवर्षांत मंडळाच्या बैठकी एकंदर २० झाल्या. प्रत्येक बैठकीस सरासरीनें सहा-सात सभासद हजर होते.

४ या वर्षांत जे निबंध मंडळापुढें ठेवण्यांत आले, ते बहुतेक सर्व पुढें छापले आहेत. रावबहादूर गणेश व्यंकटेश जोशी यांचीं " भारतीय आर्यांची प्राचीन राजकीय पद्धत " या विषयावर पांच व्याख्यानें फार महत्वाचीं व मुद्देसूद झालीं, तीं लेखनिविष्ट नसल्यामुळें येथें देतां आलीं नाहींत, याचें वाईट वाटतें. रा. रा. नाना पावगी यांचें " आर्यांचें मूलस्थान " या विषयावर व्याख्यान झालें, तें हि लेखनिविष्ट नव्हतें; सबब छापतां आलें नाहीं. व्याख्यान लेखनिविष्ट असल्याखेरीज तें मंडळापुढें देऊं नये, असा नियम करण्यांत आला.

५ गेल्या सालीं वर्गणीचा वार्षिक दर पंचवीस रुपये होता. येत्या सालीं, महिन्याच्या ऐन उत्पन्नाइतके आणे वर्गणी प्रत्येक सभासदानें दर वर्षास कमींत कमी द्यावी, असा ठराव सर्वानुमतें झाला.

## ६ इतिहाससंशोधकमंडळाचा

## शके १८३२ आषाढ ते फाल्गुन अखेरपर्यंतचा जमाखर्च

| जमा | रु. आ. पै. | खर्च | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| सभासदांची वर्गणी | ...१७५–०–० | टपाल ... | ...४– ७–३ |
| | | लेखनसामग्री ... | ...२–१३–० |
| | | छापणावळ ... | ...२– ४–० |
| | | | ९– ८–३ |
| | | शिल्लक | ...१६५– ७–९ |
| एकूण | ...१७५– ०– ० | एकूण | ...१७५– ०–० |
| | | वर्गणीची बाकी | ...२५०– ०–० |

७ येणेंप्रमाणें गतवर्षाचा अहवाल आहे. आतांपर्यंत एकवीस सभासद मंडळांत आले. पुढील वर्षी यांच्याहूनं ज्यास्त लोक प्रविष्ट होतील, अशी आशा आहे. वार्षिक वर्गणी हि कमी केलेली आहे. त्यामुळें मंडळप्रवेश पुष्कळ लोकांना सुलभ व्हावा असा अंदाज वाटतो. शिवाय, स्वदेशाच्या व इतर देशांच्या व लोकांच्या इतिहासाच्या साध-

नांचा अभ्यास व शोध करण्याकडे अलीकडे बऱ्याच लोकांचें लक्ष लागत चाललेलें दिसतें. कमीत कमी सध्यां देशांत दहापंधरा शोधक यथाशक्ति काम करीत आहेत. निव्वळ शोधक सोडिले, तरी समानशील अशा गृहस्थांची संख्या कांहीं थोडीथोडकी नाहीं. असे शोधक व समानशील गृहस्थ कोठें तरी एकत्र जमण्याची कांहीं तरी सोय असावी, असें अनेकांना वाटत होतें. तो योग आपल्या ह्या मंडळाच्या द्वारा जुळून आलेला आहे. त्याचा फायदा आस्ते आस्ते पुष्कळ लोक घेतील, यांत बिलकुल संशय नाहीं. एकत्र जमण्यानें शंका, समाधान, प्रश्न, विचारपूस, तेथल्या तेथें समक्ष करतां येऊन, व्यक्तिमात्राच्या विस्खलित प्रयत्नांना संकलित रूप मिळतें; होतकरू शोधकांना कामाची दिशा कळते; आणि अशा रीतीनें सर्वांना इष्ट जें संशोधन त्याची प्रगति होते. लेखांचा संग्रह करण्याचें, तो सुरक्षित ठेवण्याकरितां संग्रहालय उभारण्याचें, उभारलेलें संग्रहालय चालू ठेवण्याकरितां फंड जमविण्याचें, ऐतिहासिक ग्रंथसंग्रह जुळविण्याचें, संदर्भग्रंथ एकत्र आणण्याचें, ताम्रशिलादि लेखांच्या संशोधनाचें व संग्रहाचें, पुराणवस्तूंचे नकाशे काढण्याचें, मूर्तींचा एकत्र जमाव करण्याचें, वगैरे अनेकविध काम आपल्यापुढें आहे. इतकेंच नव्हे, तर हा नानाविध उद्योग करतांना सामान्य लोकांना सहजप्रिय होतील असे इतिहासग्रंथ निर्माण करण्याकडे हि आपल्याला लक्ष पोहोंचविलें पाहिजे. हें काम आस्ते आस्ते उठविण्याचें सत्कृत्य आपल्या हातून निर्विघ्नपणें व विजयानें तडीस जाईल, व हा उद्योग करण्यास देशांतील विद्वान्, धनिक व समानशील लोक आपल्याला उचित साहाय्य करतील, अशा हुरुपानें पुढील वर्षाच्या कामगिरीला आपणास लागावयाचें आहे.

आपाबळवंताचा वाडा, पुणें, बुधवार, चैत्र शुद्ध १ शके १८३३. } खंडेराव चिंतामण मेहेंदळे, चिटणीस, इतिहाससंशोधक मंडळ.

# पाणिनिकालनिर्णय

वि. का. राजवाडे

( १ ) कंबोजाल्लुक् ( ४-१-१७५ ) ह्या पाणिनीय सूत्रांत एकट्या कंबोजाचाच तेवढा निर्देश केला आहे. ह्या सूत्रावर कंबोजादिभ्य इति वक्तव्यम् असें कात्यायनानें वार्तिक रचिलें. कारण, चोल-शक-केरल-यवन ह्या चार शब्दांची ही अवस्था कंबोजशब्दाप्रमाणें च आहे, असें त्यास आढळून आलें. इतिहासरीत्या विचार करणारे जे आहेत ते ह्यासंबंधानें अशी कोटि लढवितात. पाणिनि हा स्वकालीन सर्वशब्दंकष असा वैय्याकरण होता. तो ज्या अर्थी कंबोज हा एक च शब्द सूत्रितो, त्या अर्थी चोल-शक-केरल-यवन हे चार शब्द त्याला माहीत नव्हते. शब्द च जेथें माहीत नाहींत, तेथें जनपद, अभिजन, राजा किंवा अपत्य ह्या विषयींचीं तच्छब्दजन्य तद्धितरूपें माहीत नसणार च. अर्थात् सूत्रांत ते शब्द येण्याचा संभव नाहीं. आतां एका शब्दासंबंधानें तरी ऐतिहासिकांचा हा कोटिक्रम लुला आहे, असें म्हणतां येण्यास सबळ कारण आहे. पाणिनीला यवन हा शब्द माहीत होता. इंद्रवरुणभवशर्वरुद्रमृडहिमारण्ययवयवनमातुलाचार्याणामानुक् ( ४-१-४९ ) ह्या सूत्रांत यवन हा शब्द आहे. तेव्हां चोल-शक-केरल-यवन हे चारी शब्द पाणिनीला माहीत असण्याचा संभव आहे. पैकीं यवन हा शब्द तर निखालस माहित होता. मग कात्यायनाप्रमाणें त्यानें यवन हा शब्द कंबोज शब्दाबरोबर सूत्रांत कां गोंविला नाहीं ? यवन हा शब्द मनुष्यवाचक व लोकवाचक आहे हें तर पाणिनीला माहीत असलें च पाहिजे. कारण यवनानी हा स्त्रीलिंगी तद्धितशब्द यवन शब्दापासून आनुक्-प्रत्यय लागून होतो, हें तो च सांगतो. येथें यवन म्हणजे यवन लोक, एवढा च अर्थ पाणिनीला विवक्षित आहे. यवनजनांच्या जनपदाला काय म्हणत, अभिजनाला काय म्हणत, राजाला काय म्हणत व लिपीला काय म्हणत, ह्यासंबंधीं तो कांहींएक सांगत नाहीं. ह्यावरून काय अनुमान काढावयाचें ? एक च अनुमान निघतें. यवनांच्या देशाला, राजाला, लिपीला किंवा अभिजनाला कोणत्या नांवानें उल्लेखीत, तें पाणिनीला माहीत नव्हतें. असतें, तर तो तीं सूत्रांत गोंविल्याविना रहाता ना. तेव्हां, पाणिनि अशा काळीं भारतवर्षांत झाला असला पाहिजे कीं, ज्या काळीं यवन शब्दाचें स्त्रीलिंग यवनानी असें होतें, एवढी एक च बाब भारतवर्षांत माहीत होती; यवनांच्या जनपदाला, अभिजनाला, राजाला किंवा लिपीला कोणत्या नांवांनीं निर्देशितात, तें माहीत नव्हतें. जनपद म्हणजे प्रांत. यत्र पूर्वैरुषितं सोऽभिजनः, म्हणजे पूर्वज जेथें राहिले तो अभिजन. जनपदाचा अधिपाति तो राजा. तद्देशोत्पन्न प्रजा म्हणजे अपत्य. जनपदावयव म्हणजे प्रांताचे भाग. म्हणजे यवन लोकांचा जनपद, व अभिजन जो Ionia तो पाणिनीला माहीत नाहीं. Ionia चा राजा माहीत नाहीं. Ionia चे अवयव म्हणजे भाग माहीत नाहींत. तेथील प्रजेला Ionian यवन म्हणतात हें माहीत नाहीं. व तेथील लिपीचें नांव माहीत नाहीं. फक्त यवन शब्दाच्या स्त्रीलिंगाला यवनानी म्हणतात, एवढें माहीत आहे. ही पाणिनीची माहिती झाली. कात्यायनाची माहिती

पहावी तर त्याला यवनजनपदाच्या राजाला यवन ह्मणतात, हें आणीक माहीत आहे, असें दिसतें. ही अधिक माहिती असल्यामुळें कंबोजाल्लुक् या सूत्राची दुरुस्ती कंबोजादिभ्योलुक् अशी तो करतो. चोल-यवन-शक-कंबोजेभ्यो लुक् असा कात्यायनाच्या वृत्तीचा विस्तार होतो. जनपदवाचियवनशब्दात् परस्य तद्राजसंज्ञकस्य लुक् स्यात्. म्हणजे यवनांचा जनपद व यवनांच्या राजाचें सामान्यनाम, इतक्या दोन बाबी कात्यायनाला जास्त माहीत आहेत. तसें च यवनलिपीला यवनानी ह्मणतात, हें हि त्यास माहीत आहे. जनांना यवन, जनपदाला यवन, व राजाला यवन असा एक च शब्द तिन्हीं बाबींना लागतो, असें कात्यायन सांगतो. ह्या जास्त बाबी पाणिनीला माहीत नव्हत्या, हें मागें सांगितलें च आहे. येणेंप्रमाणें, पाणिनि आणि कात्यायन यांच्या माहितींत अनुक्रमें

| पाणिनि | कात्यायन |
|---|---|
| १ यवनलोक-२ यवनानी स्त्रीनाम | १ यवनलोक-२ यवनानी-लिपी-<br>३ यवनराजा-४ यवन-जनपद |

असा फरक होता. हा फरक पडण्याचीं कारणें दोन देतां येतात. यवन लोकांचा संबंध अति अल्प व दूरचा पडल्यामुळें पाणिनीला यवन शब्दाच्या स्त्रीलिंगाची तेवढी माहिती मिळणें संभाव्य होतें; आणि यवन लोकांचा अतिनिकट संबंध घडल्यामुळें कात्यायनाला यवन लोकांच्या लिपीचें, राजाचें व जनपदाचें नांव कळणें साहजिक होतें. हें एक कारण संभवतें. दुसरें कारण असें संभवतें कीं, पाणिनिकालीं यवनलोकांना लिपी हि नव्हती, जनपद हि नव्हता व राजा हि नव्हता, तेव्हां त्यांचीं नांवें त्यानें दिलीं नाहींत; आणि कात्यायनाच्या कालीं लिपी, जनपद व राजा अशीं तिन्हीं यवनलोकांना असल्यामुळें त्यांचीं नांवें त्यानें सहज च दिलीं. दुसरें कारण प्रथम तपासूं. अशाकरितां कीं, ज्या इसमांकडून यवनस्त्रीलिंगाच्या अस्तित्वाची माहिती पाणिनीला मिळाली, त्या च इसमाकडून त्यांच्या देशाचें व त्यांच्या देशाच्या राजाचें सामान्यनाम त्याला जाणतां आलें असतें. तेव्हां असें च म्हणावें लागतें कीं, पाणिनिकालीं यवनलोकांना लिपी नव्हती, जनपद नव्हता व राजा हि नव्हता. असा काल कोणता तें नक्की पहावयाचें आहे. आतां पाणिनीला—म्हणजे पाणिनिकालीन भारतीयांना—माहिती देणारे लोक यवन असतील किंवा यवनेतर असतील. यवन असते व त्यांच्या देशाला नांव असतें व राजा असता, तर ती माहिती ते पाणिनीला देते. यवनेतर असतील तर यवनांच्या स्त्रीपुरुषांचें नांव त्यांनीं पाणिनीला सांगितलें, पण देशाच्या व राजाच्या आणि लिपीच्या नांवाची माहिती त्या यवनेतर लोकांना नव्हती असें म्हणावें. कोणती हि कल्पना केली तरी एवढें निखालस आहे कीं, यवनांच्या स्त्रियांचें सामान्यनाम जें यवनानी तें पाणिनीला माहीत होतें व भारतवर्षातील तत्कालीन संस्कृत भाषेंत प्रचलित झालें होतें. यवनांच्या राजाचें किंवा जनपदाचें नांव पाणिनीला माहीत नव्हतें; कारण पाणिनिकालीं त्या लोकांना जनपद व राजा

नव्हता. यवन लोकांच्या इतिहासांत असा काल कोणता, हें शोधिलें म्हणजे पाणिनीचा काल ठरवितां येतो. शोध करण्याची ही एक दिशा झाली. आतां दुसरी दिशा. पाणिनीला माहिती देणाऱ्या यवन किंवा यवनेतर इसमांनीं यवन लोकांच्या देशाचें व राजाचें सामान्य नांव पाणिनीला सांगितलें असेल; परंतु संस्कृत भाषेंत तें नांव रूढ झालें नसल्यामुळें पाणिनीनें तें आपल्या व्याकरणसूत्रांत गोंविलें नाहीं. पाणिनि कांहीं भूगोलग्रंथ रचीत नव्हता; व्याकरणग्रंथ रचीत होता. तेव्हां भाषेंत जे शब्द रूढ झाले तेवढे च त्यानें संक्षेपानें टिपून ठेविले. ह्या कोटीचा अर्थ असा कीं, पाणिनि अशा कालीं झाला असला पाहिजे कीं, ज्या कालीं संस्कृत भाषेंत यवनांच्या देशाचें व राजाचें नांव रूढ झालें नव्हतें. म्हणजे पाणिनिकालीं यवनांचा संबंध फार दूरचा व अल्प होता. ह्या मार्गानें शोध करावयाचा म्हणजे भारतवर्षाच्या इतिहासांत असा काल कोणता तें पाहिलें असतां पाणिनीचा काल ठरतो.

( २ ) ह्या दुसऱ्या दिशेनें शोध करावयाचा ह्मणजे यवनांचे राजे यवन या नांवानें भारतवर्षांत केव्हां माहीत झाले तें पाहिलें पाहिजे. अशोक मौर्य ( शकपूर्व ३५० = B. C. 272 ), सुरिआचा राजा Antiochos Theos ( B. C. 262 ), इजिप्तचा राजा Ptolemy Philadelphos ( B. C. 285 ), कुरीनीचा राजा Magas ( B. C. 258 ), माकेडोनियाचा राजा Antigonos Gonatas ( B. C. 278 ), व एपिरसचा राजा Alexander ह्या पांच ग्रीक राजांना यवन ह्मणतो. अशोक केवळ Asiatic Greek राजांना च यवन ह्मणत नाहीं; तर यवन या संज्ञेंत European Greek राजांचा ह्मणजे माकेडोनिया व एपिरस ह्या युरोपांतील देशांच्या ग्रीक राजांचा समावेश करतो. ह्याचा अर्थ असा कीं, अशोक एशिआटिक व युरोपियन ग्रीक राजांना दोघांना हि यवन हें नांव देतो. तात्पर्य, ग्रीक ह्मणजे यवन असा अशोकाचा अभिप्राय आहे. ही संज्ञा अशोकानें नवीन पाडली असेल, असें म्हणतां येत नाहीं. कारण चंद्रगुप्त मौर्याला हि Alexander, वगैरे लक्षावधि यवन माहीत होते. ह्मणजे Alexander ( B. C. 327 ) पासून भारतवर्षांतील लोकांना यवन राजे माहीत आहेत. तत्पूर्वीं ते माहीत होते कीं काय, हें नक्की सांगतां येत नाहीं. B. C. 327 त नंद हे भारतवर्षांत सम्राट् होते. त्यांच्या कालीं कात्यायन झाला, अशी जी कथा आहे ती विश्वसनीय असावी, असें दिसतें. यवनांच्या राजाला यवन म्हणतात, अशी जी माहिती त्यानें आपल्या वार्तिकांत दिली, ती इतिहासप्रसिद्ध आहे, ह्यांत संशय नाहीं. नंद, अलेक्झांडर व कात्यायन हे समकालीन होते, ह्मणजे B. C. 350–323 पर्यंत होते असें आतां निःसंशय ह्मणतां येतें.

( ३ ) यवन हा शब्द तद्राजार्थी आहे, हें पाणिनीला माहीत नव्हतें, त्या अर्थीं नंद, अलेक्झांडर व कात्यायन ह्यांच्या अगोदर किंवा पूर्वीं पाणिनि झाला असला पाहिजे. ह्मणजे B. C. 350 च्या पूर्वीं तो झाला असला पाहिजे, हें सिद्ध आहे. B. C. तिसऱ्या शतकाच्या पूर्वीं पाणिनि झाला, असें अद्याप बिनतोड कोणीं सिद्ध केलें नाहीं, असें विधान युरोपियन व अमेरिकन विद्वान् लोक करतात, तें यापुढें बिनधोक वायफळ समजावें; व B. C. 350 च्या अलीकडे पाणिनिकाल ओढतां च येत नाहीं, हा सिद्धांत समजावा. संकलादिभ्यश्च ( ४–२–७५ ) ह्या सूत्रांत वाहीक देशांतील म्हणजे पंजाबां-

तील सांकल ह्या शहराचा उल्लेख झाला आहे. हें सांकल शहर Sangala ह्मणून Alexander च्या वेळीं प्रसिद्ध होतें. तें त्यानें समूळ मोडून टाकिलें. म्हणजे पाणिनि Alexander च्या भारतवर्षांत येण्यापूर्वीं, ह्मणजे B. C. 327 पूर्वीं, झाला असला पाहिजे. Sangala हें Kathaian नांवाच्या लढवय्यांचें शहर होतें.

( ४ ) आतां शकपूर्व ४२८ अथवा B. C. ३५० ह्या कालाच्या पूर्वीं केवळ सूत्रांच्या आधारावर पाणिनिकाल कोठपर्यंत जातो, तो पाहूं. पर्श्वादियौधेयादिभ्योऽणञौ (५–३–११७) असें सूत्र आहे. पर्शु इत्येवमादिभ्यः, यौधेय इत्यवेमादिभ्यः च, आयुधजीविभ्यः स्वार्थे क्रमेण अण् अञ् इत्येतौ प्रत्ययौ भवतः । पार्शवः पार्शवौ पर्शवः । यौधेयः यौधेयौ यौधेयाः । पर्श्वादिगण येणेंप्रमाणें:–पर्शु, असुर, रक्षस्, बाल्हीक, वयस्, वसु, मरुत्, सत्वत्, दशार्ह, पिशाच, अशनि, कार्षापण. पाणिनिपठित जो पर्श्वादिगण त्यांतील निदान पहिले तीन शब्द तरी पाणिनीचे निःसंशय आहेत. आणखी काटकसर केली तत्रापि पहिले दोन शब्द तर पाणिनीचे ठरल्यावांचून सोय च नाहीं. पाणिनीय गणांना कित्येक स्थलीं पाणिनीनंतरचे कित्येक शब्द जोडिले गेले. सबब प्रक्षेप टाळण्याकरितां ज्या अर्थीं पर्श्वादि असे पाणिनीचे सूत्रशब्द आहेत त्या अर्थीं एकाहून जास्त शब्द ह्या गणांत आहेत व निदान पहिले दोन शब्द अथवा तीन शब्द तरी पाणिनीचे आहेत, हें विनतक्रार मान्य करावें लागतें. ह्मणजे, पर्शु व असुर हे दोन शब्द पाणिनीला माहीत होते. हे दोन शब्द आयुधजीविसंघवाचक ह्मणजे शस्त्रोपजीविसंघवाचक आहेत. हे दोन लोक पाणिनीच्या कालीं शस्त्रांवर उपजीविका करणारे किंवा उपजीवनार्थ मोलानें युद्ध करणारे होते. पर्शु ह्मणजे युरोपियन लोक ज्यांना पर्शियन म्हणतात ते, व असुर ह्मणजे युरोपियन लोक ज्यांना Assyrian असुर्यन ह्मणतात ते. ञ्यादयस्तद्राजाः ( ५–३–११९ ) ह्या सूत्रांत ह्या लोकांच्या राजांचीं सामान्यनामें कशीं होतात तें सांगितलें आहे. जसें पर्शवः, असुराः इत्यादि. वैदिकी प्रक्रियेंत असुरस्य स्वं (४–४–१२३) ह्या सूत्रांत सांगितलेला असुरशब्द वेदकालीन असुरांचा वाचक आहे. आयुधजीवि असुरांचे च हे वेदकालीन असुर पूर्वज असतील. परंतु वेदकालीन असुरांशीं येथें आपल्याला कांहीं एक कर्तव्य नाहीं. पाणिनिकालीन आयुधजीवि असुरांचा काल कोणता तें पाहिलें म्हणजे प्रस्तुत कार्य झालें. असुरांचें राज्य असुर्य देशांत B. C. १८३० पासून B. C. ५३८ पर्यंत ( H. H. W. Vol. I, pp. ३३०–३३६ ) होतें. B. C. ५३८ त पर्शूंचा राजा जो कुरुस् ( Kyrus ) त्याच्या हस्तें असुरांच्या राज्याची व राजाची धूळधाण झाली. ह्या असुरांचें आयुधजीवि ह्या विशेषणानें पाणिनि वर्णन करतो. तेव्हां ते त्यांचे समकालीन होते हें उघड आहे. त्यांच्या राजाचा B. C. ५३८ त नायनाट झाला. तेव्हां B. C. ५३८ ह्मणजे शकपूर्व ६१६ च्या पूर्वीं पाणिनि केव्हां तरी झाला असला पाहिजे.

( ५ ) पर्शु या शब्दापासून हि हें च अनुमान दृढ होतें. हा शब्द असुर लोकांच्या इषिकालेखांत ( H. H. W. Vol. II, p. 560 ; and H. H. W. Vol. I. p. 389, 388 ) Parsua ( पार्शव ) असा सांपडतो व त्यांचा काल B. C. ८५० पर्यंत जातो. म्हणजे

B. C. ५३८ पासून B. C. ८५० पर्यंत केव्हां तरी पाणिनि झाला असावा, असें म्हणावें लागतें.

येथें अशी शंका घेतां येईल कीं, असुरांचें राज्य मोडल्यावर व पर्शूंचें राज्य मोडल्यावर असुर व पर्शु हे आयुधजीविसंघरूपानें उपजीविका करूं लागले. स्वराज्य नाहींसें झाल्यावर त्या त्या देशांतील लढवय्ये लोक मोलानें युद्ध करण्याचा धंदा करतात. म्हणजे असुरांचें राज्य B. C. ५३८ त बुडाल्यावर व पर्शूंचें राज्य B. C. ३२९ त बुडाल्यावर अनुक्रमें असुर व पर्शु शस्त्रोपजीविसंघ झाले व ह्या संघांचा पाणिनि उल्लेख करतो; तेव्हां पाणिनि B. C. ३२९ नंतर झाला. परंतु मागें आपण अशी सिद्धि केली आहे कीं, पाणिनि ज्या अर्थीं यवनांच्या राजाचें सामान्यनाम जें यवन त्याचा उल्लेख करीत नाहीं, त्या अर्थीं तो B. C. ३५० च्या पूर्वीं झाला असला पाहिजे. तेव्हां B. C. ३२९ च्या नंतर तो झाला हा पक्ष व शंका सोडून द्यावी लागते. स्वराज्य असतांना हि पुष्कळ लोक मोलानें युद्ध करणारे आढळतात. उदाहरणार्थ A. D. सतराव्या शतकांतलि जर्मन लोक किंवा B. C. चवथ्या शतकांतील ग्रीक लोक. तेव्हां, आयुधजीविसंघ स्वराज्य असतांना व नसतांना अशा दोन्ही कालीं सांपडतात. सबब, ही शंका टिकण्यासारखी दिसत नाहीं.

(६) पाणिनिकालीं यवनानी हा शब्द यवनस्त्रीवाचक होता, यवनलिपिवाचक नव्हता. कात्यायनकालीं यवनानी हा शब्द लिपिवाचक समजला जाऊं लागला व यवनी हा शब्द स्त्रीवाचक समजत. ग्रीक ह्मणजे यवन लोकांत लिपीचा प्रवेश B. C. ९०० पासून B. C. १२०० च्या कालांत केव्हां तरी झाला, असें निरनिराळ्या शोधकांचें मत आहे. तेव्हां पाणिनि अशा कालीं झाला असला पाहिजे कीं, ज्या कालीं यवनांमध्यें लिपीचा प्रवेश झाला नव्हता, किंवा झाला असल्यास, तुरळक संबंधामुळें त्याची माहिती पाणिनीला नव्हती. असा काळ B. C. ५३८ च्या पूर्वीं कोणता होता, तें निश्चित समजलें ह्मणजे पाणिनीचा काल ठरला.

(७) पालि, महाराष्ट्री वगैरे भाषांचा वाचक जो प्राकृत शब्द तो त्या अर्थीं पाणिनीच्या अष्टाध्यायींत येत नाहीं. प्राकृतसापेक्ष जो संस्कृतभाषावाचक संस्कृत शब्द तो हि त्या अर्थीं पाणिनि योजीत नाहीं. पाणिनि ज्या भाषेचें व्याकरण लिहितो तिला तो भाषा हा शब्द योजितो. वैदिक भाषेला छंदस् असें तो ह्मणतो. अपभ्रष्ट ऊर्फ अस्पष्ट भाषणाला तो म्लेच्छ हा शब्द लावितो. परंतु स्वतंत्र प्राकृत भाषा त्याला कांहीं माहीत नाहींत. म्हणजे भारतवर्षांत स्वतंत्र प्राकृत भाषावाचक प्राकृत हा शब्द प्रचलित होण्याच्या पूर्वीं पाणिनि झाला, हें निश्चित दिसतें. गौतमबुद्ध पालिनामक प्राकृतांत बोले. ती प्राकृत भाषा गौतमाच्या पूर्वीं कांहीं शतकें उत्पन्न झाली असली पाहिजे. पिप्रव्हा येथील कमंडलूवर जी प्राकृत कोरिली गेली ती प्राकृत तत्पूर्वीं कित्येक शतकें त्या प्रांतांत बोलली जात असावी.

(८) अष्टाध्यायींत बुद्धाचें नांव नाहीं. उक्थादि गणांत दुसरा शब्द लोकायत आहे. लोकायत म्हणजे चार्वाक. तेव्हां चार्वाकांचें पाखंडमत चालूं असतां व बुद्धाचें पाखंड सुरू होण्यापूर्वीं पाणिनि झाला. बुद्धाची हयात B. C. ५६३ पासून B. C. ४८३ पर्यंत सरा-

सरीनें धरतात. म्हणजे B. C. ५६३ च्या पूर्वी पाणिनि झाला असला पाहिजे. आतां कुमारः श्रमणादिभिः ( २–१–७० ) ह्या सूत्रांत कुमारी अशा श्रमणांचा उल्लेख आहे. लहान पोरींना श्रमणा करण्याची चाल बौद्ध व जैन लोकांत होती. तेव्हां कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, पाणिनि बुद्धानंतर झाला. परंतु सनातन धर्मांत व हिंदूंत कुमारश्रमणांची चाल होती, असें म्हणतां येतें. पुष्कळ स्त्रिया आजन्म अविवाहित राहिल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. लग्न न झालेल्या स्त्रिया त्या कुमारी. कुमारी दहा बारा वर्षांची च असली पाहिजे असें नाहीं. अविवाहित अशा वयस्क किंवा प्रौढ स्त्रियांना हि कुमारी ह्मटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. गार्गी, धारिणी व सुलभा मैत्रेयी ह्या श्रमणदीक्षा किंवा संन्यासदीक्षा घेतलेल्या प्रसिद्ध आहेत. श्रमण हा शब्द हि बौद्धांच्या पूर्वींचा आहे.

( ९ ) अरण्यान्मनुष्ये ( ४–२–१२९ ) ह्या सूत्रांत पाणिनि सांगतो कीं अरण्य ह्या शब्दाला वुञ् प्रत्यय लागून आरण्यक असा तद्धित शब्द बनतो व त्याचा अर्थ रानांतला माणूस असा होतो. आरण्यक ह्या शब्दाचा ह्याहून दुसरा अर्थ पाणिनीला माहीत नाहीं. कात्यायन ह्या च सूत्रावर

**पथ्यध्यायन्यायविहारमनुष्यहस्तिषु इति वाच्यं ।**

असें वार्तिक रचून सांगतो कीं आरण्यक ह्या शब्दाचे ( १ ) रानवाट, ( २ ) ब्राह्मणाचा भाग, ( ३ ) रानवट न्याय, ( ४ ) रानांतले बौद्ध विहार, ( ५ ) रानमाणूस व ( ६ ) रानहत्ती असे एकंदर सहा अर्थ होतात. पाणिनीला एक च अर्थ माहीत होता, तर कात्यायनाला सहा अर्थ माहीत आहेत. पैकीं बौद्धांचा विहार हा जो आरण्यक शब्दाचा अर्थ तो प्रकृत स्थलीं विशेष लक्ष्यांत घेण्यासारखा आहे. पाणिनीला बौद्ध विहार माहीत नव्हते व कात्यायनाला होते, असा अर्थ सूत्र व वार्तिक यांतील भेदांपासून निघतो. ह्मणजे बौद्ध विहार निर्माण होण्यापूर्वी पाणिनि झाला व ते निर्माण झाल्यानंतर कात्यायन झाला. तात्पर्य, पाणिनि बुद्ध व बौद्ध विहार यांच्या पूर्वी ह्मणजे B. C. ४८३ च्या पूर्वी किंवा B. C. ५६३ च्या पूर्वी झाला.

तसें च, ब्राह्मणाच्या एका भागाला आरण्यक ही संज्ञा आहे, हें कात्यायनाला ठाऊक होतें; परंतु पाणिनीला नव्हतें. ह्या भेदावरून हि पुष्कळ अनुमानें निघण्यासारखीं आहेत. परंतु, सध्यां त्यांचा प्रपंच मी येथें करीत नाहीं. इतकें च लिहून ठेवतों कीं पाणिनि ब्राह्मणभागवाचक आरण्यक शब्द अस्तित्वांत येण्यापूर्वीं अथवा खुद्द आरण्यकें च अस्तित्वांत ह्मणजे रचण्यांत येण्यापूर्वीं होऊन गेला असावा. ह्मणजे B. C. १००० किंवा B. C. १२०० च्या सुमारास किंवा पूर्वीं पाणिनि होऊन गेला असावा.

( १० ) B. C. ४७९ मध्यें झालेल्या Platæa च्य लढाईंत दार्युवुस् ( Darius ) चा सेनापति Mardonius याच्या सैन्यांत हिंदू सैनिक होते. त्यांना यवन लोकांचे राजे, यवन लोकांचा जनपद व यवन लोकांची लिपि ह्यांची माहिती खास झाली असली पाहिजे व तद्द्वारा ती भारतवर्षांत पसरली असली पाहिजे. पाणिनि जर B. C. ४७९ च्या सुमारास असता तर त्याला हि माहिती होण्याचा फार संभव होता. तेव्हां B. C. ४७९ किंवा B. C. ५०० च्या पूर्वी पाणिनि झाला असला पाहिजे. Platæa च्या लढाईच्या

वेळीं माकेडोनिया, स्पार्टा वगैरे संस्थानांत राजे होते. तसेंच Asiatic Ionia च्या कांहीं नगरांत संस्थानिक ऊर्फ Tyrants होते.

( ११ ) कात्यायनाला शक शब्द माहीत होता, हें कंबोजादिगणावरून उघड आहे. पाणिनीला तो शब्द म्हणजे राजवाचक जो शक शब्द तो माहीत नव्हता. कंबोजादिगणांतील यवन शब्दावरून एवढें सिद्ध झालें च कीं, शक, यवन, केरल, चोल, हे लोक पाणिनीला माहीत असतील; इतकेंच कीं, हे शब्द तद्राजवाचक आहेत हें त्याला माहीत नव्हतें. पर्शु लोकांत राजे होते, हें पाणिनीला माहीत होतें. ह्या पर्शूंच्या च जवळ राहणारे शक ऊर्फ Skythian लोक होते. त्यांची माहिती पाणिनीला अवश्य असली पाहिजे. कां कीं, पाणिनि ज्या प्रदेशांत जन्मला व वाढला, त्या प्रदेशाला लागून च शकांचें राज्य B. C. ७०० पासून B. C. ५५० पर्यंत होतें. ह्या लोकांचें राज्य कुरुस् (Kyrus) यानें म्हणजे पाणिनीला माहीत असलेले जे पर्शुलोक त्यांच्या राजानें B. C. ५५० च्या सुमारास जिंकिलें. तेव्हां, ह्या शक लोकांच्या राजाचें सामान्य नांव पाणिनीनें खरें म्हटलें असतां द्यावयाचें, परंतु तें तो देत नाहीं, परंतु कात्यायन देतो. म्हणजे कात्यायन B. C. ७०० च्या नंतर झाला व पाणिनि B. C. ७०० च्या पूर्वी झाला, असा अर्थ होतो. शकांच्या पहिल्या राजाच्या पूर्वी झाल्यामुळें शकांच्या राजाचें सामान्य नांव पाणिनि देईल, हें संभवत च नाहीं. B. C. ३५० च्या सुमारास कात्यायन झाल्यामुळें तो शकांच्या राजाचें सामान्य नांव देतो. शकराजांची याद येणेंप्रमाणेः—

B. C. 700 Deioces
„ „ 647 Frawarti
„ „ 625 हुवक्षतर
„ „ 585 इष्टुवेगु
„ „ 550 शकराज्य कुरुस् यानें जिंकलें.

वरील प्रमाणांचें संकलन केलें असतां खालील विधानें प्राप्त होतात. पाणिनि

( १ ) नंद, अलेक्झांडर व कात्यायन यांच्या पूर्वी झाला;
( २ ) B. C. ३५० च्या पूर्वी झाला;
( ३ ) B. C. ५३८ त असुरांचें राज्य बुडालें तत्पूर्वी झाला;
( ४ ) बुद्धाच्या पूर्वी झाला;
( ५ ) पालि वगैरे प्राकृत भाषांच्या पूर्वी झाला;
( ६ ) असुर व पर्शु ह्या आयुधजीवि लोकांचा समकालीन होता;
( ७ ) यवनानी हा शब्द यवनस्त्रीवाचक जेव्हां होता तेव्हां झाला;
( ८ ) यवनानी हा शब्द लिपिवाचक होण्याच्या पूर्वी झाला;
( ९ ) शकराज जो Deioces ( B. C. ७०० ) त्याच्या पूर्वी झाला;
(१०) ब्राह्मण भागार्थी आरण्यक शब्द प्रचलित होण्याच्या पूर्वी झाला.

तात्पर्य, ख्रिस्तपूर्व ७०० च्या अलीकडे पाणिनीला बिलकुल ओढतां येत नाहीं.

( १२ ) यवन शब्द ग्रीक Ion या शब्दापासून आलेला आहे. Ion हा Ionian लोकांचा कल्पित मूळपुरुष. हे Ionian लोक Phrygia तून Asia Minor मध्यें आले

व तेथून ग्रीसच्या पूर्वप्रदेशांत शिरले. तो काल B. C. २००० पासून B. C. १००० पर्यंतचा समजतात. Phrygia ला ग्रीक लोक Brugoi ( भृगु, भृगवस् ) ह्मणत. ट्रोजन युद्ध B. C. १२०० त झालें. तदनंतर Ionian लोक इतिहासांत स्पष्ट दिसूं लागले. ह्या B. C. १२०० नंतरच्या यवनांचा पाणिनि उल्लेख करीत असावा. B. C. ६०० च्या अलीकडे ग्रीक लिपीला ह्मणजे Alphabet ला कोणी ओळीत नाहीं. तेव्हां कदाचित् B. C. ६०० च्या पूर्वी व B. C. १२०० च्या नंतर पाणिनि केव्हां तरी झाला, असें ह्मणण्यास वाव सांपडतो.

---

# शाक्य.

नट, निच्छिवि, वगैरे व्रात्य क्षत्रियजाति ज्या प्रांतांत रहात होत्या त्याच प्रांतांत शाक्य नांवाचे व्रात्यक्षत्रिय रहात असत. मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाचा ४४ वा श्लोक येणेंप्रमाणें आहेः–

पौंड्रकाश्चौड्रद्रविडाः कांबोजा यवनाः शकाः ।

पारदाः पह्नवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥ ४४ ॥

( वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥ ४३ ॥ )

वृषल म्हणजे व्रात्य. सगरराजाच्या काळीं ह्या शक वगैरे क्षत्रियजाति व्रात्य झाल्या. पैकीं शकक्षत्रियोत्पन्न जे शाक्य व्रात्यक्षत्रिय त्यांपैकीं कांहीं लोक समानशील अशा नट, निच्छिवि वगैरे व्रात्यक्षत्रियांच्या प्रांतांत येऊन राहिले. ह्या शाक्यव्रात्यक्षत्रियांत गौतमबुद्धाचा जन्म झाला. महावीर जसा नटव्रात्यक्षत्रिय होता, तसाच बुद्ध शाक्यव्रात्यक्षत्रिय होता. व्रात्यत्वामुळें गौणता आली. तच्छमनार्थ शुद्धक्षत्रियांच्या व शुद्धब्राह्मणांच्या विरुद्ध ह्या दोघांनीं जैन व बौद्ध धर्म काढिले. ते शकादि व्रात्य जातींत अर्थातच फार प्रिय झाले. शुद्ध चातुर्वर्णिकांत ह्या वर्णसंकरकारक धर्मांचा शिरकाव झाला नाहीं. शकोऽभिजनोऽस्य शाक्यः ( ४–३–९२ ). शण्डिकादिभ्योऽण् ( ४–३–९२ ) ह्या सूत्रांत जो शण्डिकादिगण सांगितला आहे त्यांत खालील शब्द आहेतः—शण्डिक, सर्वसेन, सर्वकेश, शक, शट, रक, शंख, बोध. गर्गादिभ्यो यञ् ( ४–१–१०५ ) ह्यांतील गर्गादिगणांत हि शक शब्द आहे. ह्या दोन सूत्रांत अभिजनो अस्य व गोत्रापत्ये शाक्य असें रूप होतें म्हणून सांगितलें आहे. तद्राजार्थी रूप काय होतें तें पाणिनि सांगत नाहीं. गौतमबुद्ध ऊर्फ शाक्यमुनि तर राजपुत्र होता म्हणून प्रसिद्ध आहे. तेव्हां पाणिनि बुद्धापूर्वी झाला.

वि. का. राजवाडे.

# नट आणि निच्छिवि.

जैनधर्माचा संस्थापक महावीर हा नट जातीचा होता, हें प्रसिद्ध आहे. ह्या नट जातीचा उल्लेख मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या २२ व्या श्लोकांत केला आहे. व्रात्यक्षत्रियापासून सवर्ण ह्मणजे क्षत्रियस्त्रीच्या ठाईं जी प्रजा होते तिला नट ही एक संज्ञा अ-

सलेली मनुसंहितेंत वर्णिली आहे. तेव्हां ह्या व्रात्यक्षत्रियजातींत महावीर जन्मला हें सांगावयाला नकोच.

ही नटजाति वैशाली नगराजवळ रहात असे. ह्या वैशालीनगरींत लिच्छवि नामक क्षत्रियांचें त्या कालीं वास्तव्य असे. लिच्छवि म्हणजे मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या २२ व्या श्लोकांत उल्लेखिलेली निच्छिविनाम व्रात्यक्षत्रियांची जात होय. निच्छिवि ह्या शब्दांतील नि च्या ठिकाणीं लि आदेश होऊन लिच्छिवि हा प्राकृत शब्द निष्पन्न झाला. प्राकृतांत असा न चा ल होतो. उदाहरणार्थ निंब ( संस्कृत )=लिंब ( प्राकृत ). ह्या प्राकृत लिच्छिवि शब्दाचा लिच्छवि हा अपभ्रंश किंवा पर्याय आहे.

ह्या लिच्छवि जातींतील कुमारदेवीशीं शक २२० च्या सुमारास गुप्तवंशाचा आदिपुरुष जो पहिला चंद्रगुप्त त्यानें लग्न लाविलें ( V. A. Smith's Early History of India, Chap. XI ).

ह्या निच्छिवि शब्दाचा भारतांतील शिबि, शिवि ह्या देशवाचक व तद्देशराजवाचक शब्दाशीं संबंध असलेला दिसतो. शिविदेशाच्या जवळील जो प्रदेश तो निच्छिवि. शिविदेशांतील शिविनामक शुद्धक्षत्रियापासून जे व्रात्यक्षत्रिय झाले त्यांचा जो देश तो निच्छिविदेश.

निच्छिवि, लिच्छिवि ऊर्फ लिच्छवि व्रात्यक्षत्रियांचें नेपाळांत शक ५५७ च्या सुमारास राज्य सुरू झालें.

ह्या लिच्छवि जातीचें नांव गौतमबुद्धाच्या चरित्रांत आति येतें.

वि. का. राजवाडे.

## ब्रह्मयाचें देऊळ कां नाहीं ?

य एव देवा हंतारस्ताँल्लोकोऽर्चयते भृशम् ।
हन्ता रुद्रस्तथा स्कन्दः शक्रोग्निर्वरुणो यमः ॥ १६ ॥
हन्ता कालस्तथा वायुर्मृत्युर्वैश्रवणो रविः ।
वसवो मरुतः साध्या विश्वेदेवाश्च भारत ॥ १७ ॥
एतान्देवान् प्रणंस्यन्ति प्रतापप्रणता जनाः ।
न ब्रह्माणं न धातारं न पूषाणं कथंचन ॥ १८ ॥

ह्या श्लोकांत ब्रह्मा, धाता, व पूषा या देवतांची सौम्य म्हणून लोक पूजा करीत नाहींत, असें शांतिपर्वाच्या पंधराव्या अध्यायांत सांगितलें आहे. हिंदुस्थानांत ब्रह्मयाचें, धात्याचें किंवा पूषाचें देऊळ क्वचित् सांपडतें. शिव ( रुद्र ), स्कंद ( कार्तिकस्वामी ), वगैरेंचीं देवळें फार.

## राष्ट्रिय, राष्ट्रक, राष्ट्रिक.

### ( १ )

राष्ट्रिय या तद्धित शब्दाचे तीन अर्थ होतात. ( १ ) सोऽस्य निवासः ( ४-३-८९ ) ह्या सूत्राप्रमाणें राष्ट्रं निवासो अस्य राष्ट्रियः । म्हणजे राष्ट्रांत संप्रति जो रहातो तो राष्ट्रिय. निवासो नाम संप्रति यत्रोष्यते । ( भाष्यं ). ( २ ) अभिजनश्च ( ४-३-९० )

ह्या सूत्राप्रमाणें राष्ट्रं अभिजनोऽस्य राष्ट्रियः । म्हणजे ज्याचे पूर्वज राष्ट्रांत राहिले किंवा जो पूर्वजापासून राष्ट्रांत रहातो तो राष्ट्रिय. ( ३ ) भक्तिः ( ४-३-९५ ) ह्या सूत्राप्रमाणें राष्ट्रं भक्तिरस्य राष्ट्रियः । म्हणजे राष्ट्र ज्याच्या भक्तीचें स्थान आहे तो राष्ट्रिय. येणें-प्रमाणें राष्ट्रिय या शब्दाचे तीन अर्थ पाणिनीला संमत आहेत. पहिल्या अर्थी यूरोपियन भाषांत A man who has acquired citizenship by residency in a state असा संयुक्त शब्द आहे. तिसऱ्या अर्थी यूरोपियन भाषांत a born citizen असा शब्द आहे. आणि तिसऱ्या अर्थी यूरोपियन भाषांत patriot हा शब्द आहे. हे तिन्ही यूरोपियन शब्द राष्ट्रिय शब्दाचे हुबेहुब अन्वर्थक नाहींत. आधुनिक यूरोपियनांनीं Citizen हा शब्द ग्रीक व रोमन लोकांपासून Civis या शब्दावरून घेतला आहे. ग्रीक व रोमन लोकांत City हें च राष्ट्र समजत. ह्या पलीकडे राष्ट्राची त्यांची कल्पना गेली नव्हती. राष्ट्र शब्दाला जर State हा यूरोपियन प्रतिशब्द मानला, तर Statizen असा शब्द यूरोपियन भाषांत निर्माण केला पाहिजे. Patriot हा हि शब्द असा च व्यंग आहे. देश, पितृदेश, पूर्वजदेश असा Patria ह्या शब्दाचा अर्थ आहे. म्हणजे Patriot या शब्दाचा अर्थ पूर्वजदेशस्थ, अभिजनस्थ असा होतो. म्हणजे राष्ट्रिय शब्दाचा दुसरा अर्थ Patria शब्दानें कांहींसा व्यक्त होतो, असें म्हटलें असतां चालेल. कांहींसा म्हणण्याचें कारण एवढें च कीं Patria म्हणजे राष्ट्र नव्हे, निव्वळ पितृदेश. राष्ट्रिय शब्दाचा जो तिसरा अर्थ राष्ट्रभक्त तो सध्यां यूरोपियन Patriot या शब्दाचा अर्थ झाला आहे. परंतु तो हि राष्ट्रिय शब्दाच्या अर्थाचा वाचक नाहीं; केवळ पितृदेशभक्त या शब्दाच्या अर्थाचा वाचक आहे. असा मूळ अर्थ असल्यामुळें French patriot, English patriot, German patriot असे सविशेषणशब्द विशिष्ट देशभक्तवाच्यतार्थ बनवावे लागतात. परंतु इतकें हि करून राष्ट्रिय शब्दांतील राष्ट्र या अर्थाची आपत्ति ह्या सविशेषण patriot शब्दांत येत नाहीं ती नाहीं च. राष्ट्र या शब्दाला यूरोपियन भाषांत शब्द नाहीं तेव्हां, राष्ट्रनिवासी, राष्ट्राभिजनवान् व राष्ट्रभक्त या अर्थी तीन शब्द यूरोपियन राजधर्मशास्त्रज्ञांनीं नवीन बनविले तर कार्य होणार आहे.

राष्ट्रार्थी Nation हा हि शब्द यूरोपियन लोक योजतात. Nation या शब्दाचा अर्थ मूळचा अभिजन असा आहे. त्यांत राज्ययंत्राचा अंतर्भाव होत नाहीं. Nationalist ह्मणजे अभिजनभक्त, आभिजनीय.

State ह्या यूरोपियन शब्दाचा अर्थ संस्थान, राज्याधिकारी संस्था असा सध्यां करतात. State हा अर्थ Nation हून निराळा, Patria हून निराळा, City हून निराळा, आणि People हून निराळा.

राष्ट्र या शब्दाचा अर्थ राजाचें राज्य ज्या स्वदेशावर चालतें तें राष्ट्र. सर्वधातुभ्यः ष्ट्रन् ( उणादिसूत्र ६०८ ). राजाचें राज्य ज्या स्वेतरदेशांवर चाललें ते देश राष्ट्र नव्हत. म्हणजे राजा व प्रजा धर्मानें, गोत्रानें, भाषेनें व देशानें समान जेथें असतात त्या देशाला राष्ट्र ही संज्ञा प्राप्त होते. अशा देशांत भक्तिपूर्वक पिढ्यानपिढ्या जो रहाणारा तो राष्ट्रिय. राष्ट्रिय शब्दाचे तीन अर्थ आहेतः— ( १ ) राष्ट्रांत रहाणारा, ( २ ) राष्ट्र अ-

भिजन ज्याचा आहे तो, व ( ३ ) राष्ट्रावर भक्ति ज्याची आहे तो. हे तीन अर्थ राष्ट्रिय ह्या शब्दाचे पाणिनीच्या काळीं होते.

Citizen या यूरोपियन शब्दावरून व राष्ट्रिय ह्या संस्कृत शब्दावरून दिसून येतें कीं प्राचीन यूरोपांत ( ग्रीक व रोमन ) Cities ऊर्फ पुरें हीं च राजाचीं राज्य करण्याचीं देशमानें होतीं व प्राचीन भारतवर्षांत ( पाणिनिकालीन ) राष्ट्र हें राजाचें राज्य करण्याचें देशमान होतें. म्हणजे पुरराज्यें ज्या काळीं यरोपांत उद्भवलीं त्याच्या फार पूर्वी भारतवर्षांत राष्ट्रराज्यें उद्भवून बराच काळ गेला होता. Citizen ह्या शब्दाला योग्य संस्कृत शब्द पौर हा आहे.

वरील विवेचनाचा मथितार्थ येणेंप्रमाणें:—

पौर = Citizen
अभिजन = Nation
स्वदेशभक्त = Patriot
राष्ट्र = Kingdom
राष्ट्रिय = State-loyalist, Kingdomist
राज्य = Government
राज्यमर्यादा = Jurisdiction of Government
जन = People
जनपद् = People's Country
राज्यसंस्थान = State

(२)

राजते असौ राजा. राजृ दीप्तौ. चमकतो तो राजा. शौर्यादिगुणांनीं जो चमकतो तो राजा, गोत्र रक्षणारा पुढारी, असा मूळ शब्दार्थ आहे. राज्ञो भावः राज्यं. राजाचा अंमल म्हणजे राज्य व ज्या अभिजनांवर चालतें तें राष्ट्र. राष्ट्रांतील लोक राष्ट्रिय. नुसते लोक जन. ते राहातात तो जनपद.

| | | |
|---|---|---|
| जन<br>जनपद्<br>प्रजा | : | राष्ट्र<br>राजा<br>राज्य<br>राष्ट्रिय |

अशा दोन निरनिराळ्या कोट्या आहेत.

(३)

– तत्र नियुक्तः ( ४–४–६९ )—तत्रेति सप्तमी समर्थान्नियुक्त इत्येतस्मिन्नर्थे ठक् प्रत्ययो भवति ( काशिका )— ह्या सूत्रावरून राष्ट्रे नियुक्तः राष्ट्रिकः असें रूप होतें. राष्ट्रांत कोणता हि अधिकार जो बजावतो तो राष्ट्रिक. भृगुसंहितेंत हा शब्द येतो. अशोकाच्या शिलालेखांत रास्तिक, रास्टिक, असा शब्द येतो, तो राष्ट्रिक ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. दंडकारण्यांत आर्यांनीं वसाति केल्यावर त्या देशांत ज्यांनीं अधिकार चालविला ते राष्ट्रिक. मोठा अधिकार ज्यांनीं चालविला ते महाराष्ट्रिक. जसें सामन्त,

महासामन्त; किंवा महाभोजाप्रमाणें महाराष्ट्रिक. महाराष्ट्रिकांचा जो देश तो महाराष्ट्र. ह्या राष्ट्रिक अधिकाऱ्यांवरून किंवा अधिकारापन्न क्षत्रिय जातीवरून देशाला महाराष्ट्र हें नांव मिळालेलें दिसतें. स्वार्थे कप्रत्यय लागून महाराष्ट्रक असें रूप होतें. रट्रक असें हि रूप येतें ( मानसेरा version of अशोक ), तें राष्ट्रक या रूपाचा अपभ्रंश आहे.

वि. का. राजवाडे.

## कुळंबी.

मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायांतील ११९ वा श्लोक व त्याची कुल्लूकव्याख्या अशी आहेः—

दशी कुलं तु भुंजीत विंशी पंच कुलानि च ।
ग्रामं ग्रामशताध्यक्षः सहस्राधिपतिः पुरम् ॥ ११९ ॥

"अष्टागवं धर्महलं षड्गवं जीवितार्थिनां । चतुर्गवं गृहस्थानां त्रिगवं ब्रह्मघातिनां" इति हारीतस्मरणात् षड्गवं मध्यमं हलं इति तथाविधहलद्वयेन यावती भूमिर्वाह्यते तत्कुलं इति वदति । तद्दशग्रामाधिपतिर्वृत्त्यर्थं भुंजीत । एवं विंशत्यधिपतिः पंच कुलानि शताधिपतिर्मध्यमं ग्रामं सहस्राधिपतिर्मध्यमं पुरम् ॥ ११९ ॥

एकेक नांगर सहा बैलांनीं ओढावा; अशा नांगराला षड्गव नांगर ह्मणतात. अशा दोन नांगरांनीं जेवढी जमीन वाहिली जाते तेवढीला कुल अशी संज्ञा आहे. अशी कुल्लूकभट्टांनीं कुल ह्या शब्दाची शक्ति सांगितली. तात्पर्य कुल व वाहणें हे दोन शब्द मनुसंहितेपासून किंवा तत्पूर्वीपासून भारतवर्षांत प्रचलित आहेत. सहा बैलांनीं जेवढी जमीन नांगरिली व वाहिली जाते तिचें नांव कुल. ह्या कुल शब्दाचा उच्चार मराठींत आदेशप्रक्रियान्वयें कुळ असा होतो. कुल शब्द जसा संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे तसाच कुळ शब्द मराठींत नपुंसकलिंगी आहे. लहानशा खेड्यांतील लागवडीखालील जमीन पांच सहा कुळें असते व मोठ्या गांवांत पांचपंचवीस कुळें असते. एकेका कुलाचा म्हणजे सहा बैलांनीं वाहिल्या जाणाऱ्या जमिनीचा जो कर्ता त्याचें नांव कुलपति. कुलपति ह्या संस्कृतशब्दाचें महाराष्ट्रीरूप कुलवइ; आणि कुलवइ ह्या महाराष्ट्री शब्दाचें मराठी रूप प्रथमारंभीं कुळवी व नंतर कुणबी. ह्या शब्दाचे कुळंबी, कुनबी असे हि अपभ्रंश सध्यां आहेत. पूर्वीं कुणबी ही जात नव्हती, केवळ धंदा होता. तो सध्यां जात झाला आहे. प्रायः शूद्र जमीन वाहतात; म्हणून शूद्रांना सध्यां कुणबी अशी संज्ञा महाराष्ट्रांत प्राप्त झाली आहे. जमीन वाहणारा जर मराठा क्षत्रिय किंवा धनगर किंवा महार किंवा कुंभार असेल, तर सरकार किंवा सावकार त्या मराठ्याला किंवा धनगराला किंवा महाराला किंवा कुंभाराला आपलें कुळ म्हणतात. कुळें दोन प्रकारचीं— मिराशी किंवा उपरि. वंशपरंपरेनें जमीन वाहणारीं जीं तीं मिराशी व एका मोसमापुर्तें जमीन वाहणारीं जीं तीं उपरि. सारांश कुलपति, कुलवइ, कुळवी, कुणबी, कुळंबी हा शब्द फार पुरातन आहे.

वि. का. राजवाडे.

# कायस्थ.

## ( १ )

कायस्थ, कायथ, काइत, काइथ, हा शब्द काय व स्थ यांच्या संहितेपासून निघाला आहे. क्षत्रियात् शूद्रायां जातः कायस्थः। काय म्हणजे मूळ धन. त्यावर उपजीविका करणारा जो तो कायस्थ. काये, कायेन वा तिष्ठति यः स कायस्थः। ह्याचा मूळ धंदा व्याजबट्टा करण्याचा दिसतो. नंतर लेखन, चित्रकर्म हीं कामें ह्याला नेमून दिलीं, असें दिसतें.

## ( २ )

अथवा–

बोटांचीं शेवटें म्हणजे काय. त्याच्या साहाय्यानें उपजीविका करणारा जो तो कायस्थ. हाताच्या बोटांच्या शेवटांनीं लेखन, चित्रकर्म साधावयाचें. तेव्हां लेखन, चित्रकर्म हा मूळ धंदा. तदनंतर इतर धंदे. कायस्थांना प्रभुपणा महाराष्ट्रांतच, विशेषतः कोंकणांत मिळालेला आहे. कोंकणांत, ब्राह्मण, शेणवई, मराठे हे प्रभु आहेत, तसे च कायस्थ हि प्रभु झाले. हे मूळचे उत्तरहिंदुस्थानांतील आहेत, यांत संशय नाहीं. महाराष्ट्रांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हि उत्तरहिंदुस्थानांतून च दक्षिणेंत आले. इतकें च कीं कायस्थ इतरांच्या बरे च नंतर आले. यांची संख्या महाराष्ट्रांत फार थोडी आहे. बंगाल, बहार, काशी, प्रयाग इकडल्यासारखी फार नाहीं. जर ब्राह्मण क्षत्रियादिकांच्या बरोबर हे आले असते, तर त्यांच्या बरोबरीनें ह्यांची लोकसंख्या असती. तशी नाहीं, त्या अर्थी हे इतरांच्या बरे च नंतर आले, असें म्हणणें रास्त दिसतें. बाकी, नक्की केव्हां आले, तें निश्चयानें सांगतां येत नाहीं. गुप्ते, कर्णिक, राजे, समर्थ वगैरे आडनांवांतील गुप्ते या आडनांवावरून ह्याचा संबंध गुप्तांशीं म्हणजे उत्तरहिंदुस्थानांत शक ३०० पासून ५०० पर्यंत राज्य करणाऱ्या राजांशीं कित्येक लावितात. तसा संबंध असेल; मात्र होता च असें म्हणतां येत नाहीं. हे क्षत्रियोत्पन्न आहेत. इतकें च कीं मूळीं शूद्रक्षेत्राचे ठाईं उत्पन्न झालेले आहेत. हा प्रश्न धर्मशास्त्र, आर्यवंशशास्त्र, इतिहास, यांचा आहे. व तो सविस्तर विवेचिण्याचा येथें हेतु नाहीं. फक्त व्युत्पत्ति करण्याचा मानस आहे. दोन व्युत्पत्त्या दिल्या आहेत. पैकीं दुसरी व्युत्पत्ति बरी दिसते. कारण, धर्मशास्त्रांतर्गत जातिविवेकप्रकरणांत दिलेल्या लेखनकर्माशीं ह्या दुसऱ्या व्युत्पत्तीचा मेळ चांगला बसतो. मनुसंहिता, याज्ञवल्क्य, मुद्राराक्षस व मृच्छकटिक यांत हा शब्द येतो. कायस्थ इति लघ्वी मात्रा ( मु. १; मृ. ९; या. १–३३६ ).

वि. का. राजवाडे.

# खंमीर, हंमीर.

शौरसेनींत काश्मीर ह्या शब्दाचें कम्हीर असें रूप होतें. हकार ककाराला जुडून खमीर, खम्मीर, वगैरे रूपें तदनंतरचीं; ख चा केवळ ह होऊन हमीर झालें. हमीरचें हंमीर. प्राकृतिक हिंदी भाषा सुरू झाल्यावर हम्मीर झाला. तेव्हां त्याचें नांव प्राकृतिक आहे ह्यांत नवल नाहीं.

वि. का. राजवाडे.

## सायण व मायण.

मात्रज्ञ ह्या संस्कृत शब्दाचें मात्तन्न असें प्राकृत रूप होतें. त्याचें प्राकृतिक रूप मायण्ण. त्याचें मायण.

तसेंच,

सर्वज्ञ ह्याचें सायण.

सायण व मायण हे दोन्ही शब्द प्राकृतिक आहेत. द्राविडी प्राकृतापासून द्राविडी प्राकृतिक. सायणाचार्य प्राकृतिक भाषा सुरू झाल्यावर झाले.

वि. का. राजवाडे.

## मम्मट व बामह ऊर्फ भामह.

मन्मथ ह्या शब्दाचें अपभ्रंशांत वम्मह असें रूप होतें. व चा ब होऊन बम्मह आणि म्म च्या दैर्घ्यामुळें ब चा बा होऊन बामह. बामह ह्या प्राकृतिक शब्दाचें संस्कृत संस्करण भामह.

मन्मथ ह्या च शब्दाचें न्म चें म्म व थ चें ट होऊन मम्मट.

प्राकृतिक ह्मणजे मराठी वगैरे भाषा सुरू झाल्यावर हे दोघे ग्रंथकार झालेले आहेत, हें पाहिलें ह्मणजे मम्मट व भामह हीं नांवें प्राकृतिक आहेत, हें तेव्हांच ओळखतां येतें.

वि. का. राजवाडे.

# कांहीं शब्दांची व्युत्पत्ति.

वि. का. राजवाडे.

(१) **नाँ ?**

बाजारांत जावयाचें नाँ ! (हाटं प्रति गम्यते नाम)
येथें नामपासून नाँ निघाला आहे.
नाम = नावँ = नाँ.

(२) **ओवाळ**

आपल्या कर्माला ओवाळ (अत्तणो जोवणं उवालह)
उपालंभस्व = उवालह = ओवाळ (दोष दे).

(३) **उबगणें**

उपगमन = उबगअण = उबगण = उबगणें.

(४) **जणु**

जणु इवार्थे अपभ्रंशे. तो जणु आला.

(५) **इठी**

स्त्री = इट्ठी = इठी (कुणबी स्त्रियेचें विशेषनाम).

(६) **आउक्ष**

आयुष्य = आउक्ष.

(७) **चाळ**

शाला = साळ = चाळ.

(८) **चमचा**

चमस = चमच = चमचा (पुल्लिंग).

(९) **चुई**

सूचि = चूई = चुई.

(१०) **सुई**

सूचि = सुइ = सुई.

(११) **पिचणें**

पिष् = पिस् = पिच् = पिचणें वा पिसणें.

(१२) **मिचणें**

मिष् = मिस् = मिच् (मिचणें).

(१३) **वाचणें**

भाष् = भास् = वाच् (वाचणें).

(१४) **डचणें**

दश् = डस् = डच् (डचणें).

**(१५) कभिन्न, कफलक**

कपालक = कभल्लक ( अर्धमागधी ) = कफल्लक.

कभल्ल = कभिल्ल = कभिन्न

काळाकभिन्न म्हणजे कापालिकासारखा काळा.

**(१६) भीम**

बिंब = भिंब ( अर्धमागधी ) = भीम

ठाण्याच्या बिंबदेवाला भीमदेव असें हि म्हणतात.

**(१७) बेंबल**

विव्हल = ( महाराष्ट्री ) भेंबल = बेंबल.

**(१८) पापिटल ( ला–ली–लें )**

पापिष्ट = पापिट्ट = पापीट

पापीट + ल = पापिटल.

**(१९) खारट**

क्षारिष्ट = खारिट = खारट.

**(२०) धूत् !**

धूर्त = धुत्त = धूत् !

हा मराठींत उद्गारवाचक शब्द झाला आहे.

**(२१) गड्डा**

( स्त्री. ) गर्ता = गड्डा ( पु. ).

**(२२) खोटें–टा–टी**

सरेंकुडें असा जोडशब्द मजजवळील मुकुंदराजी ज्ञानेश्वरींत येतो. कचा ख होऊन व डचा ट होऊन, कुड = खुट = खोट ( टा–टी–टें ). डचा र होऊन खुर ( रा–री–रें ) सरेंखुरें.

**(२३) आणि–आण्–आन्–न–नि**

मराठींत कित्येक वक्ते असे प्रयोग करतातः—

( १ ) अश्या प्रकारची व्यवस्था आणि सरकारानें केली.

( २ ) तो आणि तसा वागेल, हें संभवत नाहीं.

( ३ ) ब्राह्मण नि दारू पिईल, हें होणार नाहीं.

ह्या स्थलीं आणि, नि, हे शब्द हन्त, हान, ह्या शब्दांचे अपभ्रंश आहेत.

( सं. ) हन्त = ( ज्ञानेश्वर ) हान = हानि = आणि = णि = आन् = न = नि. हान शब्द ज्ञानेश्वर असाच योजतोः—

ह्मणोनि उदकीं हान रसु ।

कां पवनि जो स्पर्शु ॥ ७ । ३२ ॥

**(२४) किनी**

किणो प्रश्ने प्राकृते.

मी किनी ( अगर, कनी ) तेथें गेलों होतों.

किंनु = किणो = किण = किणी = किनी = कनी
प्रश्नशक्ति जाऊन केवळ पादपूरकता आली.

**(२५) मणे, म्हणे**

मणे विमर्शे प्राकृते.
मन्ये = मणे = म्हणे
तो मणे ( अगर, म्हणे ) पळाला.

**(२६) ए**

अयि = अइ = ए ( संभावनायां )
ए बाई !

**(२७) की**

तो आला की; मी चाललो की; तू नीट वाचतोस की; असे प्रयोग की चे मराठीत हमेश होतात. रामदासाच्या बखरींत तर हा की शब्द फार आढळतो. पुणें प्रांतांत व देशावर हा की फार योजतात. कोंकणांत की चा प्रचार कमी. हा की संस्कृत किल चा अपभ्रंश आहे.
किल = किर = की
मराठीच्या पिढीजाद स्वभावाप्रमाणें ह्या की वर अनुनासिक विकल्पानें यावा.
( सं. ) स आगतः किल = ( म. ) तो आला की.

**(२८) देवाचार, देवचार**

देवाप्सरसः = देवअचार = देवाचार = देवचार.
कोंकणांत ह्या शब्द फार ऐकूं येतो.

**(२९) बिंजारी**

विध्याधरिन् = विंज्झयाहरी = बिंझारी = बिंजारी = बंजारी.

**(३०) भिसे**

भिषक्=भिसाओ=भिसा ( ए. ). भिसे ( अ. )
वैद्य, भिसे हीं महाराष्ट्रांत आडनांवें झालीं आहेत.

**(३१) दाठर**

दृढतर = दढअर = दढार = दाठर.

**(३२) होंट**

ओष्ठ = ओट्ट = ओठ = वोठ.
अधरोष्ठ = अहरुट्ट = हउट्ट = होट
होट व वोठ हे दोन भिन्न शब्द आहेत. खालचा ओठ तो होट.

**(३३) लोधा**

लुब्ध = लोद्ध = लोध ( धा-धी-धें ).

**(३४) घट्ट**

घृष्ट = घट्ट.

(३५) **आहेर**

आभर (ण) = आहर = आहेर

मंगलकार्यसमयीं दिलेले वस्त्रालंकार.

(३६) **वळचण**

वलभीस्थान = वलइचाण = वळीचाण = वळचाण = वळचण. वळचाण असा उच्चार गांवढे अजून करतात.

(३७) **आळवणें.**

आलपनं = आळवणं (णें).

(३८) **पखळण**

प्रक्षलन = पक्खलन = पखळण.

(३९) **उजळण**

उज्ज्वलन = उज्जळण = उजळण.

(४०) **हकारुनि**

आकार्य्य = हक्कारिअ = हकारुनिया.

(४१) **ताठ**

दृढ = तड्ढ = ताठ.

दृढतर = तड्ढअर = ताठार = ताठर.

(४२) **सांघणें-सांगणें**

संख्यापनं = संघवण = सांघणें.

(४३) **डोंबल**

दौर्बल्य = डोब्बल = डोंबल

डोंबल तुझें = दौर्बल्य तुझें.

मराठींत लहान माणसावर रागावून हे शब्द मोठीं माणसें योजतात.

(४४) **कावाडकष्ट**

कर्वतकष्ट = कव्वटकष्ट = कावाडकष्ट.

(४५) (चंदनाची) **वाटी, वटी**

वर्त्तिका = वट्टिआ = वटी, वाटी.

(४६) **उटी, उटणें**

उद्वर्तन = उवट्टण = ऊटणें = उटणें.

उद्वर्त्ति = उवट्टि = ऊट्टी = उटी.

(४७) **चोलणें, चोदणें**

चोदन = चोदणें = चोलणें.

(४८) **रुंद**

वृंद = वुंद = रुंद.

वृंदिष्ट = वुंदिट्ट = रुंदट.

(४९) **निरुंद**

निर्वृंद = निवुंद = नीरुंद = निरुंद.

(५०) **वाहणा**

उपानहौ = पाहणाओ ( स्थाणगसुत्त ) = वाहणा.

वाहणा हें रूप वस्तुतः द्विवचनात्मक असून, मराठींत अनेकवचनीं योजतात.

(५१) **ओपणें**

अर्पणं = ओप्पणँ = ओपणें.

(५२) **सोंपणें**

समर्पणं = सोप्पणँ = सोंपणें.

(५३) **सांठवणें**

संस्थापनं = संठ्ठावणँ = सांठवणें.

(५४) **आंठवण, आठवण**

आस्थापन = आठ्ठावण = आठवण, आँठवण.

(५५) **सढळ**

श्रद्धावत् = सड्ढाल = सढाळ = सढळ.

सढाळ असा प्रयोग गांवढे लोक करतात.

(५६) **मैंद**

महेंद्र = महिंद = मइंद = मैंद.

इंद्रासारखा सुखावलेला, आळशी, मंद.

(५७) **खो**

क्षोभ = खोह = खोअ = खो ( अडथळा, उत्पात, खीळ ).

(५८) **फंद**

स्पंद = फंद ( सेतुबंध, ८–२५ ).

(५९) **न्यारें**

अन्यतर = अन्यअर = न्यारँ–रें.

(६०) **मात**

मात्रा = मत्त = मात = मातु ( गोष्ट, वृत्त, धन ).

(६१) **आंबिल**

आम्ल = आंबिल ( पाली ).

(६२) **उभ** ( भा–भी–में )

उर्ध्द्व = उब्भ ( पाली ) = उभ ( भा–भी–में ).

(६३) **गवर**

गव्हर = गब्भर ( पाली ) = गब्वर = गवर.

(६४) **सबर**

सत्वहर = सव्वअर = सब्वार = सबार = सबर.

सबार उबार गांवढे करितात.

(६५) **चकण ( णा-णी-णें )**
चक्षुष्काण=चक्कुआण=चक्काण=चकण ( णा-णी-णें ).

(६६) **दंव**
द्रव=दव=दँव.

(६७) **दिवड**
द्विपद्=दिवड.

(६८) **तुथ्थ**
तुष्ट=तुट्ठ=तुथ्थ ( मंद ).

(६९) **दुट्टें**
दुष्ट=दुट्ठ=दुट्ट ( ट्टा-ट्टी-ट्टें ).

(७०) **धूण**
धावन=धोन=धूण.

(७१) **नेट**
नेत्र=नेट्ट=नेट.

(७२) **निपजे**
निपद्यते=निपज्जए=निपजे.

(७३) **पिळणें**
पीडन=पीळण=पिळणँ-णें.

(७४) **पेच ( चा-ची-चें )**
प्रेत्य=पेच्च=पेच ( मेलेलें )=( लेचे ) पेचें.

(७५) **बुबुळ**
बुद्बुद=बुब्बुल=बुबुल.

(७६) **भंपक**
भव्यक=भब्बक=भंपक.

(७७) **रस्सी**
रश्मि=रंसि=रस्सी.

(७८) **शहाण ( णा-णी-णें )**
शिक्षाज्ञ=सिहाणु=सिहाण ( णा-णी-णें )
=शहाण ( णा-णी-णें ).

(७९) **दोसण ( णा-णी-णें )**
दोषज्ञ=दोसण्णु=दोसण ( णा-णी-णें )
सिहाण व दोसण, हे दोन शब्द ज्ञानेश्वर व दासोपंत योजतात.

(८०) **उठवणें**
उत्थापन=उट्ठावण=उठावणँ-णें.

(८१) **वठवणें**
प्रस्थापन=पट्ठावण=वट्ठावण=वठावणें=वठवणें.

(८२) ढेंकुण

दंशकृमि=डंसकुण=डंखुण=ढेंकुण.

(८३) मत्कुण

मृत्कृमि=मृत्कुण=मत्कुण.

(८४) अरबट

अपभ्रष्ट=अरबट्ट=अरबट.

(८५) सुरवाडणें

सुवर्धनं=सुवड्ढण=सुरवाडणें.

निर्वर्धनं=निर्वड्ढण=निरवाडणें.

निरूच्या धर्तीवर सुर्.

(८६) अपर (रा-री-रें)

अल्पतर=अप्पअर=आपर=अपर (रा-री-रें).

(८७) पटकुर

पट्टकुल=पटकूर (दासोपंत).

(८८) पुंड

पुंड्र=पुंड=पुंड

पुंड्रक हा शब्द जातिवाचक असून ऐतरेय ब्राह्मणांत आला आहे.

(८९) कन्हें (न्हा-न्ही-न्हें)

(हत्तीण) करेणु=कन्हें (उंट).

हत्तीचा वाचक शब्द उंटाला लावूं लागले. कदाचित्, पूर्वी हा शब्द दोन्हींला लावीत असतील.

(९०) गार

गौरवाय=गारवाअ

गुरु=गार (स्तब्ध, थंड).

(९१) सोटभैरव

स्वस्ति भैरवाय=सोट्ठिबाहिरवाअ=सोटबहिरव=सोटभैरव.

सध्यां हा शब्द दुर्वचन झाला आहे.

(९२) हळू, हळुवार

लघु=हलु=हळू.

लघुतर=हलुअर=हळुवर=हळुवार.

(९३) थिल्लर

शिथिलतर=थिलअर=थिलर=थिल्लर.

(९४) सातवण

सप्तपर्ण=सत्तवण्ण=सातवाण=सातवण.

(९५) भोसल (ला-ली-लें)

भोज+ल=भोजल=भोसल

भोज हा शब्द अशोकाच्या शिलालेखांत आला आहे.

( ९६ ) **दंडाराजपुरी**

दंडक = दण्डअ = दंडा ( राजपुरी ).

दंडा प्रांतांतील राजपुरी.

( ९७ ) **आळुमाळु, आलमाल**

अलं अलं = अलमल = आलुमालु = आळुमाळु = आलमाल.

( ९८ ) **जेठी**

युधिष्ठिर = जहिट्ठिल = जेठिल = जेठी

जगद्युधिष्ठिर = जगजेठी.

( ९९ ) **आणा**

( कार्ष ) आपणक = आअणअ = आणा.

( १०० ) **सुद्धां**

सार्धं = सद्धिँ ( जैनमहाराष्ट्री ) = सद्धँ ( महाराष्ट्री ) = सुद्धँ = सुद्धां.

येथें महाराष्ट्री किंवा अपभ्रंश अचा उ झाला आहे.

( १०१ ) **चांद्राते**

चंद्रात्मन् = चंदरत = चाँद्रात = चांद्राते ( अनेकवचन ).

ज्यांच्या घरीं चांद्रात झडते ते चांद्राते, अशी व्युत्पत्ति हि होईल.

( १०२ ) **उजेड**

उद्द्यित = उजइड = उजेड.

( १०३ ) **उजाड**

उद्यात्र = उज्जाड = उजाड.

( १०४ ) **खटनट**

खट कांक्षायां व नट नृतौ

हा शब्द महाराष्ट्रांत सामान्य स्त्रीपुरुषांच्या बोलण्यांत हमेश येतो,

( १०५ ) **खट्याळ**

खट + आल = खटाल = खट्याल.

( १०६ ) **नाठाळ**

अनास्थ = अनाट्ठ + आल = नाठाळ.

प्रारंभींच्या अ चा लोप.

( १०७ ) **नारू**

नहारु ( पाली ) = ण्हारू ( जैनमहाराष्ट्री ) = नारू ( रोगविशेष ).

पालींत नहारू = स्नायु.

स्नायूच्या वेटाळ्यासारखा ज्या कृमीचा आकार तो नारू.

( १०८ ) **निंबोळ्या**

निंबगुलिका = निंबऊलिआ = निंबोळ्या.

( १०९ ) अळणी

अलवण = अळण ( णा–णी–णें )

मीठ नसलेला किंवा कमी पडलेला पदार्थ.

( ११० ) गोरागोरा पान

( गौरक गौरक ) पांडर = पाणअ = पाण = पान.

गौर = पांडर = पान.

पाण असा हि उच्चार कोणी करतात.

( १११ ) गोरागोरा पाक

येथें पाक हा शब्द फारसी आहे.

( ११२ ) भीतर

अभ्यंतर = अब्भितर = भीतर.

प्रारंभींचा अ लोपतो.

( ११३ ) भिजणें

अभ्यंजन = अब्भिज्जण = भिजणें.

अ चा लोप.

( ११४ ) भिडणें

अभ्यटण = अब्भिटण = भिडणं ( भिटण ).

( प्रयोजक ) भेटणें ( जवळ येणें ).

( ११५ ) हातुल्यो

हत्थुल्लो ( हस्त, हात ).

कित्येक खेळांत अटींतून सुटावयाचें असलें, ह्मणजे पोरी किंवा पोरें हा शब्द उच्चारतात. हा शब्द प्राकृत आहे. थुल्ल्यो, असें हि रूप आढळतें.

( ११६ ) खांबुल्यो

ख.बुल्लो ( खांब, स्तंभ )

हा हि शब्द खेळ.त योजतात. प्राकृत आहे.

( ११७ ) इटीदांडू

यष्टिदंड = इट्टिदंडु = इटीदाँडू.

( ११८ ) नंतर

अनंतर = नंतर.

येथें प्रारंभींच्या अचा मराठींत येत.ना लोप होतो.

( ११९ ) लगोरी

लग्नगोलि = लग्गगोरी = लगोरी.

( १२० ) मलखांब

मल्लस्तंभ = मलखांब.

( १२१ ) मुर्दुंग्या

मुर्दंगिक = मुर्दुंगिअ = मुर्दुंग्या.

( १२२ ) **मिथणें**

मिथ् ( मिळणें ).

( १२३ ) **आंधळीकोशिंबीर**

" अंधा कौशांची " नांवाचा खेळ कौशांबी नामक नगरींत खेळत. कौशांबी शब्दाला र जोडला आहे. असा र लंडनांतील कनिष्ठ लोक शब्दाच्या शेवटीं जोडतात. कोशिंबीर ह्या वनस्पतीचा वाचक शब्द हि सुचला.

१ इटीदांडू, २ लगोऱ्या, ३ मलखांब, ४ जोडी, ५ चाक, ६ गद्गाफरी, ७ दंड, ८ नमस्कार, ९ उठाबशा, १० घोडी, ११ पाळणा, १२ झोंबी, १३ जेठी, १४ कुरघोडी, १५ आट्यापाट्या, १६ आंधळी कोशिंबीर, १७ हुतूतू, १८ हमामा, १९ झिम्मा, २० फुगडी, २१ कोंबडा, २२ गोट्या, २३ गल, २४ सागरगोटे, २५ टिपरी, २६ फांसा, २७ सोंकटी किंवा सोंगटी, २८ चिंचोके, २९ खडे, ३० कानीं खडा, ३१ वाघमेंढ्या, ३२ टाळी, ३३ लोण, वगैरे शेंकडों शब्द प्राकृतांतून मराठींत आले आहेत.

( १२४ ) **निपुत्रिक**

अपुत्रक = नपुत्रक = निपुत्रिक.

नकारार्थी नि.

( १२५ ) **निंपुसक**

बायका असा उच्चार करतात.

नकारार्थी नि.

( १२६ ) **निबाप्या**

अवप्तक = नवप्तृक = निबप्पक = निबाप्या.

नकारार्थी नि.

( १२७ ) **निकाम्या**

अकर्मिक = नकर्मिक = निकाम्या.

नकारार्थी नि.

( १२८ ) **निगरगट्ट**

निररघट्ट = निगरगट्ट.

नकारार्थी नि.

र बद्दल ग.

( १२९ ) **निलाजिर ( रा–री–रें )**

णिल्लज्जिरं = निलाजिर ( रा–री–रें ) निलाजर.

नकारार्थी नि .

( १३० ) **निनावी**

निर्नामिक = निनाव्या.

( १३१ ) **नामर्द**

नामर्द, नाहक्क, नापास, वगैरे शब्दांतील ना-नकारार्थी फारसी आहे.

(१३२) तांतड

तंति = तांत + ड = तांतड.

गाथासप्तशतींत ३-७३ त तंति शब्द आला आहे.

(१३३) पित्त्या

पित्रीय = पित्तीअ = पित्त्य ( त्त्या-त्त्यी-त्त्यें ).

(१३४) अंडगडी

अंतर्गडी = अंडगडी.

(१३५) उजवणें, उजावणें

उद्यापन = उज्जावण = उजावणें-उजवणें.

(१३६) पारध

प्रार्थन = पारधन = पारध.

(१३७) धड

दृढ = दढ = धड.

(१३८) इन् मिन् तिन्

इँ, मीँ, तीँ = हीं, मीं आणि तीं.

अनुनासिकाचा अनुस्वार उच्चारिला.

तीन ह्या संख्यावाचक शब्दांशीं तीँ या सानुनासिक शब्दाचा घोंटाळा करून अर्थनिष्पत्ति केली आहे.

(१३९) विझावणें, विझवणें

विध्मायते = विझ्झाअतो = विझावतो, विझवतो.

(१४०) जाड

जड एव जाडः = ( हलक्याच्या उलट ).

(१४१) भप्प, भप्पकन

बाष्प = बप्फु = भप्प.

भप्प + कन = भप्पकन (जाळ झाला ).

(१४२) गाळी

गल्हिका = गल्हिका = गाळ्ही = गाळी ( निंदा ).

(१४३) पेंढारी, पेंढार

पिंडार = पेंडार = पेंढार, पेंढारी

पिंडार ( गाईम्हशींचे कळप घेऊन जाणारे आहीर वगैरे ).

(१४४) चंची

चंच ( पांच बोटें रुंदीचें माप ) भर लांब पिशवी.

चंची (स्त्रीलिंग ).

(१४५) चकाट्या

चकाट ( लुच्चा, सोदा ) = चकाट.

**( १४६ ) सरड**

शरट = सरड ( डा–डी–डें ).

**( १४७ ) चोख**

चोक्ष = चोक्ख = चोख.

**( १४८ ) वारी**

वर्या ( स्वयंवरा बाला ) = वऱ्या = वारी.

वारी हें मराठींत स्त्रीविशेषनाम आहे.

**( १४९ ) वर्त्तक**

जमाबंदीचा कारकून.

**( १५० ) पावटा**

प्रवटक = पवटा = पावटा.

प्रवटक ( गहूं, एकप्रकारचें धान्य ).

**( १५१ ) बंधुला**

बंधुलक ( दासीपुत्र ) = बंधुला.

**( १५२ ) जनी**

जानकी = जाणइ = जाणी = जणी = जनी.

**( १५३ ) पिस्कारणें**

अपस्किरणं = पिस्करणें, पिस्कारणें ( प्रयोजक ).

**( १५४ ) परवड**

प्रपत्ति = परबडी = परवडी = परवड.

**( १५५ ) हंतरी, हंतरूण**

आस्तरण = अथ्थरण = आँथरुण = हांतरूण, हंतरी ( आ[illegible] )

**( १५६ ) शेमणें**

( सं. ) शेव = ( प्रा. ) शेम = ( म. ) शेमणें ( पुल्लिंग ).

**( १५७ ) विहीर**

विवर = विअर = वीर = विहीर.

विवर ( नपुंसक. ) = विहीर ( स्त्री. ).

**( १५८ ) फासणें**

स्पर्शनं = फंस्सणं = फांसणें–णी–णा.

**( १५९ ) आंबवणी**

आम्लपानीयं = आंबवणी.

**( १६० ) धाम**

धर्म = धम्म = धाम ( कामधाम ).

**( १६१ ) इटेकरी**

यष्टिकर = इष्टिकर = इट्टिकर = इटीकर = इटेकर–री.

**( १६२ ) डुकर**

डुःकर = डुकर.

डुः डुः शब्दं करणारा प्राणी.

**( १६३ ) ठी**

स्थिति = ट्ठि = ठी.

**( १६४ ) विरजण**

विजण ( अमरकोश ) = विरजण
र मध्यें च घुसडला आहे.

**( १६५ ) मायदेव**

सिंघणयादवाच्या इ. स. १२१५ तल्या एका ताम्रपटांत मायीदेव पंडित असें विशेषनाम आलेलें आहे.

**( १६६ ) जगदळे**

सिंघणयादवाच्या इ. स. १२२२ तल्या एका लेखांत **जगदळ पुरुषोत्तम** असें एका अधिकाऱ्याचें नांव आलें आहे.

**( १६७ ) जोगदेव**

ह्याच लेखांत **जोगदेव** हा **दंडनायक** होता, असें ह्मटलें आहे.

**( १६८ ) बाजीराव**

इ. स. १२४१ त बाचीराज कर्नाटकांत अधिकारी होता. च चा ज होऊन बाजीराव हें आधुनिक नांव निष्पन्न झालें.

**( १६९ ) ग्वाल्हेर**

गोपालगिरी = गवालिरी = ग्वालिरी = ग्वालेर = ग्वालियर = ग्वाल्हेर.

**( १७० ) वाढ**

उपपाद्य = उववाडअ = वाड = वाढ.
अन्नं उपपाद्य = अन्न वाढ.

**( १७१ ) कलाल**

कल्लपाल ( सीयडोणी शिलालेख ) = कल्लवाल = कल्लआल = कलाल.

**( १७२ ) कोतवाल**

कोट्टपाल = कोटवाल = कोतवाल.

**( १७३ ) कालवड**

कलभटी = कलहडी = कलअडी = कलवडी = कालवड.
येथें लचा ळ झाला नाहीं.

**( १७४ ) फसवणें**

पक्षवादन = पच्छवाअण = फसवाण = फसवणे ( णं ).

**( १७५ ) मण्यारी**

मणिकार = मणिआर = मण्यार = मण्यारी.

**( १७६ ) बडवा**

बटुकक = बडुअअ = बडुआ = बडवा.

**( १७७ ) आळ**

अलीक = अलीअ = अळी = आळी = आळ.

( १७८ ) डाव

द्रम्म = दाम = डावँ = डाव.

पैसे लाऊन खेळणें = डाव खेळणें.

पैसे टाकून खेळणें = डाव टाकणें.

( १७९ ) मोगर ( रा–री–रें )

मुद्गर = मोग्गर = मोगर ( रा–री–रें ).

( १८० ) ओशट, ओशेट

अवशिष्ट = ओशिट्ट = ओशेट = ओशट.

( १८१ ) छप्पापाणी

शस्त्रकपाणि + छप्पअपाणि = छप्पापाणी.

( १८२ ) मण

मनह् ( a Babylonian weight of 40 lbs. avoirdupois ).

( १८३ ) रती

रक्ति ( गुंज, १·७५ ग्रेन ).

( १८४ ) चर्या

चरितानि = चरिआइँ = चर्या.

अनेकवचनाचें एकवचन झालें आहे; व नपुंसकलिंगाचें स्त्रीलिंग झालें आहे.

( १८५ ) निसरडें

निःसरत् = निसरड ( डा–डी–डें ).

( १८६ ) वारूळ

वामलूर = वाँरूळ = वारूळ.

र च्या स्थलीं ळ व ळ च्या स्थलीं र, असा वर्णविपर्यय झाला आहे.

( १८७ ) आणीक

सेतुबंध काव्याच्या नवव्या आश्वासकाच्या ८६ व्या पद्याच्या टिकेंत रामसेतु-प्रदीपकार येणेंप्रमाणें लिहितोः—

" आणिक्क तिर्यगर्थे देशी "

मराठींत हि आणीक ह्या शब्दाचा प्रयोग तिरकें, वाकडें, कांहींच्याबांहीं, ह्या अर्थी करतात; उदाहरणार्थ,

त्याचें तर पहाणें आणिकच आहे.

आणिक्क = आणीक, आणिक.

( १८८ ) जाऊं देणें

" एक्को वि कालसारो ण देइ गन्तुं "

–गाथासप्तशती १–२५.

( १८९ ) दूण

( सं. ) द्विगुण = ( महाराष्ट्री ) दुउण = ( मराठी, दूण ).

एक दूण दोन.

बे दूण चार.

**( १९० ) पिचकारी**

अपस्किरी = पिसकरी = पिचकरी = पिचकारी.

स चा च झाला.

**( १९१ ) सचकार**

सत्यंकार = सचँकार = सचकार.

**( १९२ ) दूणी बीणी**

द्वि ह्या संस्कृत शब्दाची दुण्णि व बिण्णि अशीं नपुंसकलिंगी प्रथमेचीं व द्वितीयेचीं रूपें महाराष्ट्रींत होतात.

**( १९३ ) दुधार ( रा-री-रें )**

द्विधाकार = दोधार = दुधार ( रा-री-रें ).

**( १९४ ) शीण**

स्विन्न = सिण्ण = सीण = शीण.

सीण असा उच्चार कित्येक करतात.

**( १९५ ) ( गल्ली ) कुच्ची**

कुत्सित = कुच्चिअ = कुच्ची.

गल्ली कुच्ची = कुत्सित, घाणेरडी गल्ली.

**( १९६ ) मरढें**

सातारा प्रांतांत लिंबगोव्याजवळ मरढें गांव आहे.

महाराष्ट्रं = मरढँ = ढें.

देवराष्ट्रें गांव मरढ्यापासून ३० मैलांवर आहे.

**( १९७ ) धणंतर, धनत्तर**

धन्वंतरी = धणंतरी = धणंतर = धनत्तर.

धणंतर, धनत्तर ह्या शब्दाचा अर्थ सध्यां मराठींत समर्थ असा आहे.

**( १९८ ) अंबाडा**

आम्रातक = अंबाडअ = अंबाडा ( डी-डें ).

**( १९९ ) गंधवाटी**

गंधवर्त्ति = गंधवट्टी = गंधवाटी.

**( २०० ) किटकिटणें**

कीर्त् = किट्ट; द्विरुक्तीनें किटकिटणें.

कान किटणें.

**( २०१ ) पवनविजय**

जुन्या मराठींत पवनविजय नामें ग्रंथ आहे. त्याचें मूळ नांव पवँणविजय असें आहे.

प्रमाण = पवँण.

प्रमाणविजय = पवँणविजय = पवनविजय.

**( २०२ ) बामणोली**

ब्राह्मणपल्ली = बामणोली.

माहोली, दापोली, वगैरे ळीकारान्त ग्रामनामें पूर्वी पल्लीआ, पल्ल्या होत्या.

---

# तुकारामाचा एक अभंग.

## वि. का. राजवाडे.

मजजवळील तळेगांव येथील एका जुन्या त्रुटित वहींत कोण्या अल्पशिक्षित साक्षर खेडाळूच्या हातचा तुकारामाचा एक अभंग आहे. त्यांतील पाठ प्रचलित छापील पाठाहून सरस दिसतात. अभंग येणेंप्रमाणें:—

का र नअठवेसी । कुपाळु जयांसी[1] ।
पोसीतो जनांसी[2] । येकलाची ॥ १ ॥
त्यांन[3] तुझी काही । केली अस चींता ।
हे त्या अनंता । अठवनी ॥ २ ॥
बाळां[4] हे दुधाची । केलीस वुत्पत्ती ।
वाडवी श्रीपती । सर्वे[5] रोन्ही ॥ ३ ॥
वीर्ष्णुमासे[6] काळी । फुटती तरुवरु ।
त्यासी जीवनु । कोन घाली ॥ ४ ॥
*बाँपड चाताकु । नेन भुमीजळा ।
वरसतो वुन्हाळा । त्या मेवु ॥ ५ ॥
तुका ह्मन त्यचं । नाव वीसबँरु[7] ।
करा नीरंतरु[8] । ध्यन त्याचँ ॥ ६ ॥

ह्या पाठाची छापील पाठाशीं तुलना करितां दिसेल कीं हा पाठ अस्सल आहे. तळेगांवदाभाड्यास तुकारामाचे भक्त फार. संताजी जगनाड्याचे वंशज तळेगांवीं राहतात. छापील प्रतीचे पाठ ब्राह्मणी झालेले आहेत व पुष्कळ अनर्थावह झालेले आहेत. तुकारामाच्या अभंगांचा खरा पाठ संपादावयाचा असेल, तर तुकारामाच्या खेडाळू शिष्यांनीं लिहिलेले पाठ जमवून च तो संपादितां येईल.

वि. का. राजवाडे.

## अथ कस्तुरीपरीक्षा.

जिचा केतकी ऐसा परिमळ ॥ वर्ण पीत ॥ स्वाद तिखट कि कडवट ॥ तुकें हाळु ॥ मर्दितां चिकण ॥ जाळितां भस्म होय ॥ चर्मगंध ये ॥ चिटचिटी अंगावरि घालितां ॥ चिमचिमी हातांत मुहूर्त १ धरिजे ॥ पाणीं घालून भिजुं दीजे ॥ भिजालियां आरक्त होये ॥ अथवा पिवळी होएं ॥ ययीं गुणीं असे ते शुध्धोत्तम मृगनाभिची जाणावी ॥ ये परीक्षे-विरहित ते करणींची जाणावी ऐसी परीक्षा असे ॥ जाणिजे ॥

वि. का. राजवाडे.

---

१ देवासी. २ जगासी. ३ तेणं तुझी काय । नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता । आटवूनी ॥ ४ बाळा दुग्ध कोणी । केलेंसे उत्पत्ती । ५ सर्वे. ६ फुटे तरुवर । उष्णकाळमासीं । जीवन तयासी । कोण घालीं ॥ * हा चरण छापील प्रतींत नवनीतांत नाहीं. ७ विश्वंभर. ८ निरंतर.

**निरंजन, पंढरपूरकर**-- ह्या निरंजनाची गणेशगीता संस्कृत मूळ व मराठी ओवी-छंदांत टीका सांपडली आहे. टीकेच्या शेवटीं यानें आपला काल असा दिला आहेः--

अंगिरानाम संवत्सर। श्रावण शुद्ध भौमवार।
एकादशी द्वितीय प्रहर। स्वातीसार नक्षत्र ॥ ७३ ॥
सिद्धयोग पंढरपुरीं। गीता महाराष्ट्रभाष्येंवरि।
बैसविला प्रीतिपुरस्कारिं। नरनारी पहावया ॥ ७४ ॥

शक १५५४ श्रावण शुद्ध एकादशीस मंगळवार पडतो. शक १५५४ श्रावण शुद्ध ११=इ. स. १६३२ जुलै १८. ह्यानें आपली गुरुपरंपरा अशी दिली आहेः- १ शंकराचार्य, २ हस्तामलक, ३ भास्कर, ४ लयानंद, ५ सिद्धानंद, ६ आनंदानंद, ७ परमानंद, ८ काशीराज, ९ निरंजन ( गणेशगीता मराठी करणारा ). गणेशपुराणांत गणेशवरेण्यसंवादरूप गणेशगीता असून तिचे अकरा अध्याय आहेत. अकरा हा आंकडा गणपतीला पूज्य आहे. ग्रंथ खेड येथें कचेश्वरबोवांच्या संग्रहाला होता.

वि. का. राजवाडे.

**गोसावीनंदन**-या कवीचें नांव पुढील श्लोकांत आढळतें:-

नेत्रीं दोन हिरे प्रकाश पसरे अत्यंत ते साजिरे।
माथा शेंदुर पाझरे वरि वरे दुर्वांकुराचे तुरे ॥
माझें चित्त विरे मनोरथ पुरे देखोनि चिंता हरे।
गोसावीसुत वासुदेव कवि रे त्या मोरयाला स्मरे ॥ १ ॥

या कवीचें नांव वासुदेव.

वि. का. राजवाडे.

**साग्र प्राकृत महाभारत**-( मुकेश्वर व विष्णुदासनामाकृत).

मौजे उदापूर ( जि. पुणें जुन्नरापासून ३ कोस अंतरावर ओतूररस्ता ) येथील प्रभाकरपंत जोशी यांचे घरीं महाभारताचीं १८ पर्वें पाहिलीं त्यांची माहिती. पहिलीं ४ पर्वें मुकेश्वरांनीं केलेलीं आहेत. व ११ वें सौप्तिक पर्व हि मुकेश्वरांचें आहे. बाकीचीं सर्व पर्वें विष्णुदास नामा यांनीं केलेलीं आहेत. हें पहिल्या व शेवटच्या ५।५ ओव्या खालीं दिल्या आहेत त्यांवरून समजेल.

॥ उद्योगपर्व ॥

ऐका कथा पुण्यवानन ॥ भारथींचा इतिहास जाण ॥ उद्योगपर्वीची येथून ॥ कथा असे चालिली ॥ १ ॥ श्लोक ॥ १९ ॥ संस्कृत ( व्यासोनाशार० शेवटला ) टीका ॥ वैशंपायण म्हणे गा भारथा ॥ राया परीक्षिती सुता ॥ परीस तु पूर्वजाची कथा ॥ परी तेणें ब्रह्महत्या महादोष नाशती ॥ २ ॥ तव ह्मणे परीक्षीती सुत ॥ जी हे वचन येथार्थ ॥ जे पर्वीं ब्राह्मण उठे मृत्य ॥ कापड एक हात शुद्ध होय ॥ ३ ॥ उद्योगपर्वीची कथा ॥ वैशंपायन होय सांगता ॥ ते जन्मेजयो श्रोता ॥ कथा परीसत ॥ ४ ॥ मग ह्मणे वैशंपायन ॥ परीस गा राया वचन ॥ पांडवीं केला होता पण ॥ तो नेला सिद्धी ॥ ५ ॥

॥ शेवट ॥

मळणी जालीयावरी ॥ आसार सांडुनी उपणीजे दुरी ॥ तेथें माप कीजो निर्धारी ॥ ऋषी व्यासे ॥ ३६ ॥ येथूनि युद्धप्रसंग ॥ कैसा मांडिला उद्येग ॥ पडतील वीर अने-

क ॥ नामार्थीले ॥ ३७ ॥ मग ह्मणे वैशंपायन ॥ राया उद्योगपर्व जाले येथून ॥ तरी उदै-क तुजलागून ॥ सांगो भीष्मपर्व ॥ ३८ ॥ ऐसे रुषी बोलिला ॥ तव रवी अस्तमाना गेला ॥ रावें पाहे तंव मृत्य ब्राह्मण उठिला ॥ कापड शुद्ध जाले एक हात ॥ ३९ ॥ थोर सुख जाले उभयतासी ॥ तरी आतां कथा काय सांगेल रुषी ॥ तरी तेंचि सांगो श्रोतयासी ॥ ह्मणे नामा विष्णूदास ॥ १४० ॥ अध्याय ६ एकंदर पर्वाच्या ओव्या ८६० ॥

## ॥ भीष्मपर्व ६ ॥

ऐका कथा पुण्यपावन ॥ भारतीचा इतिहास जाण ॥ भीष्म पर्वीची येथून ॥ कथा असे चालिली ॥ १ ॥ उद्योगपर्व संपता ॥ पुढें भीष्मपर्वीची चालिली कथा ॥ मग राजास जाला सांगता ॥ व्यासमुनी ॥ २ ॥ मग रुषी ह्मणे जन्मेजया ॥ हे पूर्वजाची कथा परीस राया ॥ ब्रह्महत्या विलया ॥ जाती जेणें ॥ ३ ॥ तरी हेंचि कथा पाहे ॥ धृतराष्ट्र संजया पुसत आहे ॥ तो दुरी श्रावण ब्राह्मण होये ॥ ह्मणुनी कथा सांगे कुरुक्षेत्रीची ॥ ४ ॥ राजा पुत्रें मोहित ॥ ह्मणोनि कथा ऐकत ॥ जन्मेजयाचे दोष जात ॥ कथा परीसत म्हणूनिया ॥ ५ ॥

॥ शेवट ॥

असा बोलिला वैशंपायन ॥ तव सविता झाला अस्तमान ॥ प्रेतींतील उठिला ब्राह्मण ॥ कापड जाले शुद्ध हात ॥ ९५ ॥ ऐसे देखोनि तयाला ॥ रावो मनीं हरुषला ॥ मग नमस्कार केला ॥ रायें रुषीस ॥ ९६ ॥ मग म्हणतसे तुमचें वचन ॥ प्रचित होय मजलागून ॥ स्वामी थोऱ्या पतनापासून ॥ सोडविले मज ॥ ९७ ॥ ऐसें बोलोनिया वचन ॥ आसनीचे उठिले दोयेजण ॥ मग रावो रुषी जाण ॥ मंडपी असती पहूडले ॥ ९८ ॥ उदईक द्रोणपर्वीची कथा ॥ व्यास सांगेल परीक्षिती सुता ॥ तेंचि श्रोतियाप्रती आतां ॥ नामा सांगे विष्णुदास ॥ ३९९ ॥ अध्याय १४ सर्व पर्वाची ओवीसंख्या अजमासें १९००।२००० असावी.

## ॥ द्रोणपर्व ॥

ऐका कथा पुण्यपावण ॥ भारतीचा इतिहास गहन ॥ द्रोणपर्वीचे येथून ॥ कथा असे चालिली ॥ १ ॥ श्लोक १२ टीका ॥ कर्मुनी ते निसीला ॥ जव पूर्वे दिनकरु उगवला ॥ तव रावो रुषी सिद्ध जाला ॥ बैसले आपुले आसनी येउनी ॥ २ ॥ मग व्यास ह्मणे जन्मेजया ॥ हे पूर्वजाची कथा परीस राया ॥ तेणें ब्रह्महत्या विलया ॥ जाती जाण ॥ ३ ॥ तव रावो असे विनविंतु ॥ जी तुमचे वचन यथार्थ ॥ येणें प्रतेही प्रचीत ॥ मज होय स्वामीया ॥४॥ परी येकी विनंती परियेसी ॥ जे काळीं संपता भीष्मपर्वासी ॥ मज स्वामीनें कृपा केली कैसी ॥ जे उदइक सांगेन द्रोणपर्व ॥ ५ ॥

॥ शेवट ॥

मग या देवाचिया बोला ॥ पार्थ उगाचि राहिला ॥ तव निवांत दोहीं सैन्याला ॥ तेथें जाले राया ॥ १३० ॥ यापरी पाहे ॥ द्रोणपर्व संपले आहे ॥ तरी आतां उदैक पाहे ॥ तुज कर्णपर्वीची कथा सांगेन ॥ ३१ ॥ असे रुषी बोलिला वचन ॥ तव रवी झाला अस्तमान ॥ मृत्यजा उठले ब्राह्मण ॥ कापड जाले शुद्ध हात ॥ ३२ ॥ ऐसा तो चमत्कार देखोनि ॥ रावो थोर हरुषला अंतःकरणीं ॥ मग राव रुषी दोन्ही ॥ असनीं असती उठीले ॥३३॥ आतां कथा येथून ॥ काय सांगेल वैशंपायन ॥ तेंचि कथा श्रोतियालागून ॥ नामा सांगे विष्णुदास ॥ १३४ ॥ अध्याय ९ एकंदर ओवीसंख्या अजमासें १५०० ॥

## ॥ कर्णपर्व ॥

ऐका कथा पुण्यपावन ॥ भारतीचा इतिहास गहन ॥ कर्णपर्वीची एथून ॥ कथा असे चालिली ॥ १ ॥ श्लोक १२ टीका ॥ मग ह्मणे रुषी व्यास ॥ राया पुढती कथा परीस ॥ जे

णें होय नाश ॥ महापातकांचा ॥२॥ ऐसे ऐकोनी वचन ॥ थोर हरुषला परीक्षितीनंदन ॥ ह्मणे साच जी वचन ॥ तुमचे स्वामिया ॥ ३ ॥ जी प्रत्यही प्रचीत ॥ मग असे जी होत ॥ मृत्य ब्राह्मण उठत ॥ कापड हात शुद्ध होय ॥ ४ ॥ ऐसे थोर कथेचे महिमान ॥ ते न वर्णवे मजलागून ॥ मग पुन्हा वचनेंकरून ॥ काय असे विनवीत ॥ ५ ॥

॥ शेवट ॥

ऐसें हरी वचन बोलिला ॥ तेथें थोर रचकू कौतीस पडला ॥ मग त या शोकाला ॥ निवांत केलें ॥११०॥ राया यापरी पाहे ॥ कर्णपर्व संपले आहे ॥ तरी येथूनि पुढती पाहे ॥ कथा चालेल शैल्यपर्व ॥ ११ ॥ असे व्यास रुषी बोलिला ॥ तेथें रवी अस्तमाना गेला ॥ मग रुषीस नमस्कारु केला ॥ आणी सोडुनी आसनाला ॥ राव रुषी उठियेला ॥ १२ ॥ तेथें थोर हरुष रायाला ॥ आणि रुषीसी नमस्कारू केला ॥ आनी सोडुनी आसनाला ॥ रावो रुषी उठियेले ॥ १३ ॥ ते आतां येथूनी शैल्यपर्वाची कथा ॥ रुषी सांगेल परीक्षिती सुता ॥ तरी तेची श्रोता ॥ नामा सांगे विष्णुदासु ॥ १४ ॥

अध्याय ८ ओव्या सुमारें १०००।११००

शल्यपर्वाचे शेवटीं-इति श्रीभारते शल्यपर्वणी नामदेवकृतटीकायां समस्तकौरवनिधनं नाम षष्ठमोध्याय गोडहा ॥

गदापर्वः-नामदेवकृत-ओव्या सुमारें ६००।७००

सौप्तीकपर्वः-अध्याय दुसऱ्याचे शेवटीं-व्यासगुरुच्या प्रसादें ॥ भारतनिरूपण विश्वांभरवरदें ॥ मुक्तेश्वर करीत परमानंदें ॥ संतसज्जनीं ऐकावें ॥

तिसऱ्या अध्यायाचे शेवटीं:-विश्वंभरांघ्रीपद्म भ्रमर ॥ विनवी मुक्तेश्वर कवि किंकर ॥ कथा चाले तो बडीवार ॥ संतसज्जन संगतीचा ॥ इ० हें पर्व मुक्तेश्वरकृत सर्व आहे.

स्त्रीपर्वः-मग व्यास ह्मणे परीक्षितीसुता ॥ उदईक शांतीपर्वाची कथा ॥ ते विष्णुदास नामा श्रोता ॥ सांगेल कथा मनोहर ॥ अध्याय ८ ओव्या सुमारें ११०० ॥

शांतीपर्वः-येथूनी अनुशासनासी ॥ व्यास सांगेल जन्मेजयासी ॥ ते कथा वर्तली कैसी ॥ ह्मणे नामा विष्णुदासु ॥ अध्याय ७ ओव्या सुमारें ९००।१०००

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुशा० पर्व- | अध्याय | ३ | ओव्या | सुमारें ९०० | नामदेवकृत. |
| आश्रमपर्व-- | अध्याय | २ | ओव्या | २३० | नामदेवकृत. |
| मौसलपर्वः- | अध्याय | २ | ओव्या | २१६ | नामदेवकृत. |
| प्रस्थानप० | अध्याय | २ | ओव्या | २७७ | नामदेवकृत. |
| स्वर्गारोह० | अध्याय | २ | ओव्या | २४६ | नामदेवकृत. |

काशीनाथ नारायण साने.

# शेंदुर्णी येथील खोलेश्वराच्या देवळांतील शिलालेख.

वि. का. राजवाडे.

खानदेशांत कायगांवकर दीक्षितांचें शेंदुर्णी नांवाचें एक दुमदार जहागीरगांव आहे. त्या गांवच्या ओढ्याच्या किंवा नदीच्या पलीकडे डगरीवर खोलेश्वरनामक महादेवाचें देऊळ आहे. देवळाचा आकार यादवकालीन आहे. देवळाच्या बहुतेक प्रत्येक दगडावरील कपरे झडून गेले असल्यामुळें, आंतून देऊळ कात टाकलेल्या डुकराच्या कातडीच्या रंगासारखें दिसतें व बाहेरून हवापाण्याच्या तडाक्यामुळें काळसर दिसतें. गाभारा व सभामंडप कायम आहेत. बांधणी कांहींशी राष्ट्रकूटी व कांहींशी हेमाडपंती आहे. देऊळ पूर्वाभिमुख असून त्याची पाठ नदीकडे आहे. पश्चिमेच्या भिंतीवर सभामंडपांत जमिनीपासून चार फूट उंचीवर शिलालेख आहे. लेखव्याप्त शिला दोन आहेत. लेखाची रुंदी १॥ फूट असून, उंची २॥ फूट असावी. ओळी १६ आहेत. अक्षरांची उंची १। इंच सरासरीनें असून, वळण यादवकालीन आहे. कपरे निघून लेख बहुतेक नाहींसा झाला आहे. वीस पंचवीस वर्षांपूर्वी लेख शाबूत होता, म्हणून सांगतात.

गेल्या महिन्यांत मीं तो लेख पाहिला, तेव्हां फक्त १, १०, ११, १२, १३, व १४ या सहा ओळींतील कांहीं अक्षरें राहिलीं होतीं. तीं येणेंप्रमाणें:—

१ ॐ नमः सिवाय : + + + + + + + + + + + + + +

१० + + + समानसंज्ञः ॥ ९ ॥ + + + + + + + + +

११ + मिहस्वी कांत्रपादांकुरद् + + + + + + + + +

१२ + भरितस्वात्मापराध्यापि + + + + + + + + + +

१३ र्म्मनिरतः कात्रोजि + + + + + + + + + + +

१४ तोषाति खुरवीर ॥ मूर्ती सू + + + + + + +

तेराव्या ओळींतील कात्रोजि हें एक विशेषनाम पुरुषवाचक दिसतें. बाकी देऊळ कोणीं बांधिलें वगैरे गोष्टींचा बोध होण्याला कांहीं च सोय नाहीं. ह्या देवळाला खोलेश्वराचें देऊळ ह्मणतात. तेव्हां, त्यावरून, मात्र, एक अनुमान करतां येतें. सिंघण यादवाचा ( शक ११३२–११६९ ) खोलेश्वर नांवाचा एक पराक्रमी ब्राह्मण सेनापति होता. त्यानें किंवा तत्प्रीत्यर्थ किंवा स्मरणार्थ त्याच्या पुत्रानें हें खोलेश्वराचें देऊळ बांधिलें असावें. शेंदुर्णी हें गांव देवगिरीच्या पाठीमागें फर्दापूरच्या लेण्यापासून ५ कोसांवर आहे. तेव्हां खोलेश्वराला शेंदुर्णी हें गांव जहागीर असावें व तेथें त्याच्या पुत्रानें किंवा पौत्रानें हें देऊळ बांधिलें असावें. खोले हें आडनांव देशस्थ ब्राह्मणांत अद्यापि हि आहे. शेंदुर्णी हा शब्द सेंद्रकपर्णी ह्या नांवाचा अपभ्रंश असावा. कन्नड तालुक्यांत नेवापुराजवळ सेंद्र ह्मणून एक गांव आहे. तें सेंद्रकांचें मूळ गांव किंवा गांव असावें. सेंद्रक राजे शक ४०० पासून शक ८०० पर्यंतच्या काळांत आढळतात. त्यांच्या हातून शेंदुर्णी हें गांव यादवांच्या किंवा राष्ट्रकूटांच्या हातीं गेलें व सिंघणाच्या कालीं खोलेश्वराच्या ताब्यांत गेलें, असें दिसतें.

वि. का. राजवाडे.

श्री.

## निंबगांव येथील खंडोबाचे देवळासमोरील दीपमाळेवरील शिलालेख.

१ श्री गजानन
२ श्री मार्तंड
३ चरणी तत्प
४ र खंडेराव
५ सुत मल्हा
६ र राव गाय
७ क वाड नी
८ रंतर सक
९ १६९५ वि
१० जय संव
११ त्सरे

श्री.

## निंबगांव येथील खंडोबाच्या देवळाच्या पाठीवरील शिलालेख.

सदर शिलालेख सध्यां बुजून गेलेला आहे. फक्त पहिल्या तीन ओळी, खंडोबाच्या देवळाच्या पाठीला चिकटून बांधलेल्या म्हाळसेच्या देवळाच्या गच्ची खालीं लोपून गेलेल्या नाहींत. ह्या तीन ओळींतील हि कांहीं अक्षरें म्हाळसेचें देऊळ बांधणाऱ्या गवंड्यांनीं फोडून टाकिलीं आहेत. जीं अक्षरें दिसतात त्यांत

" सिद्धार्थी नाम संवत्सरे

" भीमातीरीं "

एवढीं अक्षरें दिसतात. यावरून देऊळ शक १६६१ त बांधलें गेलें असें दिसतें. बांधणार, अर्थात् थोरले मल्हारराव असावेत. आणि दीपमाळ बांधणारा दुसरा मल्हारराव समजावा.

(१)

## शेलपिंपळगांव येथील शिलालेख.

मौजे शेलपिंपळगांव, तालुका खेड, जिल्हा पुणें, भीमातीर, येथें गांवकुसूं आहे. त्याच्या उत्तरदरवाज्याच्या बाहेरल्या बाजूस, उजवीकडे सात फूट उंचीवर एक मराठी शिलालेख आहे. त्याच्या सात ओळी असून, दगडाची लांबी एक फूट व रुंदी एक फूट आहे. लेख येणेंप्रमाणें:—

१ स्वस्ति श्रीशालिवाहन शके १७०७
२ विश्वावसुनाम संवत्सरे मौजे पिं

३ पळगांव तरफ खेड येथील उत्तरे
४ कडिल व पश्चिमेकडिल दोनि द
५ रवाजे चिमणाजि खंडेराव वि
६ न मोरो मल्हार मेंडजोगी जोसि कु
७ ळकर्णी मौजे मजकुर यानि बांधिले

चिमणाजी खंडेराव मेंडजोगी व खंडो मोरेश्वर मेंडजोगी व मोरो मल्हार मेंडजोगी हे विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांचे मुजुमदार होते. हे मेंडजोगी पानिपतच्या लढाईत होते. त्यांनीं हे दोन दरवाजे बांधिले. बाकीचें कुसूं पुरातन होतें. त्या मेंडजोगियांनीं पिंपळगांवीं भीमेस घांट बांधिला आहे. ह्या घांटाच्यासमोर शेलगांवाच्या किनाऱ्यास आठवले यांचें सुंदर शिवालय आहे. घांट, दरवाजे व मंदिरें मराठी घांटाचीं आहेत. पिंपळगांवच्या मारुतीच्या देवळापुढें सात आठ वीरांचे पुतळे आहेत. त्यांच्यापैकीं दोन पुतळ्याखालीं लेख आहेत. पैकीं एक लेख थोडाबहुत शाबूद आहे. त्याचीं आद्याक्षरें अशीं:—

दत्ताजी पतंगराव दंवडकर

पैकीं कित्येक वीर घोड्यावर ढालतरवार घेतलेले व त्यांचीं घोडीं मोतद्दारानें धरलेलीं असे कोरले आहेत; व कित्येक दंपत्यें कोरिलीं आहेत. ज्या वीरांच्या बायका सती गेल्या त्यांचीं दंपत्यें कोरिलीं आहेत. दरवडेखोर, परचक्रें, वगैरेपासून गांवचें संरक्षण शौर्यानें करतांना ज्यांचे देह खर्चीं पडले त्या वीरांचे पुतळे करून ठेविण्याची चाल महाराष्ट्रांत गांवगन्ना आहे. हे पुतळे ओबडधोबड असून, दगड पावसापाण्यानें दरवर्षी झडून जातात, त्यामुळें हि झिजलेले दिसतात. दरवाज्यावरील शिलालेख हि असा अगदीं झिजून गेला आहे. तो मीं किंचित् प्रयासानें लाविला आहे. पिंपळगांवांत मोहित्यांची वसती प्राधान्यें करून असल्यामुळें, गांवाला मोहित्यांचें पिंपळगांव म्हणतात.

वि. का. राजवाडे.

## खेडच्या सिद्धेश्वराच्या देवळातील व दीपमाळांवरील व पुष्करणीवरील शिलालेख.

### (१)

### देवळांतील शिलालेख.

देवळाच्या गाभाऱ्याच्या दरवाज्यावर गणपतीवर आहे तो येणेंप्रमाणें:—

१ सिद्धेश्वरस्यालयमत्र पूर्ण
२ गुरौ मघावादितिथौ च खेटे
३ विश्वावसौ सप्तयुगर्तुभूमौ
४ कर्ता वणिग्त्र्यंबकमध्वनामा

( २ )

एका दीपमाळेवरील शिलालेख येणेंप्रमाणें:—

१ श्रीसिद्धेश्वरचरणि रत र
२ घो जि चवान दिपमाळ विरचि
३ त शके १६९५ विजय नाम स
४ वत्सर कार्तिकमास सुध ५
५ स बुधवासर मूळनक्ष-
६ त्र + + + + + − + + +
७ + + + +

( ३ )

## दुसऱ्या दीपमाळेवरील शिलालेख.

१ सिद्धेश्वरचरणि
२ आबाजी बाजी भ + +
३ र याची दीपमाल
४ + + समत १७५९

( ४ )

पुष्करणीवरील शिलालेखाच्या मुळीं ११ ओळी होत्या त्या सर्व फुटून गेल्या. कांहीं अक्षरें राहिलीं तीं येणेंप्रमाणें:—

१ स्वस्तिश्री रघोजि + + + + + + + +
२ + + + + + राक्षेस नाम संवत्छरे + + + +
३ + + + + त्र्यंबकसेट मदवे + + + +
४ रचीला उरसाकारणें जाला + + + + +

५
६
७
८ } ( ओळी गहाळ. )
९
१०
११

( ५ )

पुष्करणीच्या ओवरीच्या पहिल्या खणाच्या भिंतीवर जो शिलालेख आहे तो सर्व छिन्न-भिन्न झाला आहे. एक हि शब्द नीट लागत नाहीं. अक्षरें दोनशें वर्षांपूर्वीचीं बाळबोध च आहेत व सुवाच्यं होतीं; परंतु फुटल्यामुळें शब्द लागत नाहींत.

देऊळ त्र्यंबकशेट मदवे लिंगायत यांणें शक १६८७ त बांधिलें हें पहिल्या शिलालेखा वरून उघड आहे. ह्या मदव्यांचें घराणें अद्याप खेडांत आहे.

वि. का. राजवाडे.

## मसूर येथील *जटाशंकराच्या देवळाजवळील थडग्यावरील दोन शिलालेख.

### पहिला शिलालेख.

१ परित्राणाय साधुनां : विनाशाय च दुष्कृतां :
२ धर्मसंस्थापनार्थाय : संभवामि युगे युगे :

### दुसरा शिलालेख.

१ श्रीजटाशंकर श्रीरामजयरामजयराम
२ नरसोजी बीन कुमाजी देसाई जग
३ दूले कसबे मसुर याचे वडीलाचे जुने थडग्यासग
४ व केला. सुलतानजीचा लेक माधाजी देसाईने

## मसूर येथील भवानीच्या देवळाबाहेरील रस्त्याच्या कोंपऱ्यावरील थडग्यावरील शिलालेख.

### शिलालेख.

१ रुद्राजी कदम शके
२ १६७ हेमलंबी
३ सवछरे

## मसूर येथील एका पोथीवरील श्लोक.

पुस्तकं वडवा बाळा परहस्तगता गता ॥
कदाचित्पुनरायाता नष्टा भ्रष्टा च मर्दिता ॥ १ ॥

वि. का. राजवाडे.

---

* जटाशंकराचें देवालय मुसलमान कालीन आहे.

६

# पांगूळ.

१. ह्या नांवाचे भिक्षेकरी देवाचें नांव घेत मोठ्या पहांटेस भिक्षा मागण्यास येतात. त्यांस लोक दाणे किंवा पैसा देतात.

२. पांगूळ ह्या नांवाची उत्पत्ति व साधारणतः दंतकथा आहे ती अशीः—हे एका पांगळ्याचे वंशज. त्या पांगळ्याच्या आईबापांस प्रथम मूल होईना. मूल होण्याचें वय होऊन गेल्यावर त्यांस शंकराच्या प्रसादानें पांगळा मुलगा झाला. तेव्हां त्यांनीं शंकराच्या सेवेस त्याचें अर्पण केलें, आणि त्या पांगळ्यापासून पुढें जी उत्पत्ति झाली ते ' पांगूळ ' नांवानें प्रसिद्ध आहेत.

३. अशी दंतकथा पांगूळ यांच्या उत्पत्तीची आहे खरी. तथापि एका शोधक पुरुषानें ह्या नांवाची उपपत्ति सांगितली ती विचारणीय आहे. पांगूळ यांचा धंदा पहांटेस ह्मणजे अरुणोदयीं सर्वांस जागृत करण्याचा. ह्या कामाचा मोबदला त्यांस दाणे किंवा पैसा देऊन करावयाचा. ह्या त्यांच्या मोबदल्यास आतां धर्म अथवा भिक्षा असें समजतात ! तथापि पांगूळ उशिरां ह्मणजे सूर्योदय झाल्यावर आला असतां, " ही काय पांगुळाची येण्याची वेळ ? " असा भिक्षा घालणारे आक्षेप घेतात.

४. सूर्याचा सारथि जो अरुण तो पांगळा (पंगुल) आहे. म्हणून " पांगूळ आला ! पांगूळ आला ! " असें हा भिक्षुक ओरडत जातो. " पांगूळ आला " म्हणजे अर्थात् अरुण वर आला, अरुणाचा उदय झाला, उठा, असें सांगून तो देवाचें नांवही घेऊं लागतो. ही त्याची वतनी कामगिरी लोक विसरले आणि पांगूळही विसरले ! आणि पांगूळ ह्यांची गणना शुद्ध भिकाऱ्यांत होऊं लागली.

**काशीनाथ नारायण साने.**

### अंबाबाईचें नवरात्र.

आश्विनशुद्धपक्षीं अंबा बैसे पद्मासनीं ॥
प्रतिपदेपासुनी घटस्थापना करुनी ॥
मूळमंत्र करुनी भोंवते रक्षपाळ ठेउनी ॥
ब्रह्मा विष्णु महेश तुझें पूजन करिती ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा यमाबाई माउलीचा वो ॥
आनंदें नाचती काय वर्णूं महिमा हिचा वो ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ १ ॥

दुसरिये दिवसी मिळोनि चौसष्टी योगिनी ॥
सकळां मध्यें श्रेष्ठ परशरामाची जननी ॥
कस्तूरीमळवट भांगीं सेंदूर भरुनी ॥
उदोकार बोलती समस्त चामुंडा मिळोनी वो ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ २ ॥

तिसरिये दिवसीं अंबेनें सोनगा मांडिला ॥
स्वळीव पातळचोळी वरता भार मुक्ताफळा ॥
कंठींचीं पदकें कासे पीतांबर पीवळा ॥
अष्टभुजा मिरवती बाईची सुंदर लीळावो ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ ३ ॥

चतुर्थीचे दिवर्सी विश्वव्यापक भवानी वो ॥
नवरात्रें करिती निराहार निर्वाण वो ॥
त्यांसी तूं पावसी जगन्माता मनमोहिनी ॥
भक्तांची रसनाकोटी येती लोटांगणी ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ ४ ॥

पंचमीचे दिवसीं व्रत उपांगललिता ॥
भक्तिपुरस्कारें तूझें पूजन करती ॥
रात्रीचे समईं करिती जागरण कथा ॥
आनंदें नाचती प्रेम आलें भक्तां कुळां ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ ५ ॥

षष्टीचे दिवसीं भक्तां आनंद वर्तला ॥
करीं दिवट्या घेउनी ह्मदो गोंधळ घाली बाळा ॥
कवडीचा दर्शन कंठीं हार मुक्ताफळा ॥
जोगवा मागतां प्रसन्न जाली भक्तां कुळां ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ ६ ॥

सप्तमीचे दिवसीं सप्तशृंगगडावरी वो ॥
तेथें राहासी भंवती पुष्पें नाना परी वो ॥
जाई जुई सेवंती पूजा रेखिली कुसरी वो ॥
पडणी पडतां झेलुन घेसी वरच्या वरी वो ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ ७ ॥

अष्टमीचे दिवसीं अष्टभुजा नारायणी ॥
शेषाद्रिपर्वतीं उभी देखिली भवानी ॥
मन माझें मोहिलें शरण गेलों तीजलागुनी वो ॥
स्तनपान घेउनी सुखी जालों अंतःकरणीं वो ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ ८ ॥

नवमीचे दिवसीं नवा दिसांचें पारणें वो ॥
सप्तशतीचा जप होम हवन करोनी वो ॥
पक्वान्नाचा नैवेद्य करिती कुमारीपूजन वो ॥
आचार्या ब्राह्मणा तृप्त केलें जगदंबेनें वो ॥
उदो ह्मणा उदो ह्मणा ॥ ९ ॥

दशमीचे दिवसीं अंबा निघे शिलंगणा ॥

## मंत्र, तंत्र व जादू टाणेटोणे.

हिंदुस्थानांत व महाराष्ट्रांत मंत्रतंत्र व जादू टाणेटोणे यांचें प्राबल्य पूर्वीपासून आहे. सध्यां हि फारसें कमी झालेलें नाहीं. जास्त च झालेलें आहे, असें ह्मणण्यास आधार आहे. उदाहरणार्थ, आकल्टिझम, थियासॉफी, स्पिरिट न्यापिंग, टेबल टर्निंग वगैरे. ह्म

णजे जुन्या लोकांत जुनीं खुळें होतीं. नव्या इंग्रजी शिकल्यासवरल्या लोकांत यूरोपियन धूर्तांच्या शिकवणीनें व भूलथापांनी नवीं खुळें माजत आहेत किंवा जुन्या खुळांच्या नव्या आवृत्त्या निघत आहेत. म्यांडाम ब्लाव्हट्स्कीच्या Isis Unveiled या बाडांत असलीं खुळें फार आहेत. तोंडांत मंतरलेला एक गोटा धरून ह्या बाईनें आशियांतून यूरोपांतील कांहीं शहरें प्रत्यक्ष पाहिलीं, वगैरे चार्गट कथा पंचवीस तीस वर्षांपूर्वी त्या पुस्तकांत मीं वाचल्या. तेव्हां मला अनावर हंसूं कोसळलें. पुणें येथें मीं जुन्या बाडांचा व ग्रंथांचा जो संग्रह केला आहे त्यांत मंत्रतंत्रांचीं व जादूटोण्यांचीं बाडें बरीं च आहेत. पैकीं परवां नुकतें च एक बाड माझ्या हातीं आलें. बाड सुमारें १००।१५० वर्षांपूर्वीचें आहे. त्यांतील कांहीं उतारे पांचचारशें वर्षांपूर्वीचे असावे, असा त्यांच्या भाषेवरून तर्क होतो. ह्या बाडांत क्वचित् इंग्रजी आंकडे घातले आहेत त्यावरून असें दिसतें कीं, हें बाड कोण्या इंग्रजी शिकलेल्यांच्या हातीं पडलें असावें. इंग्रजी आंकड्यांची शाई निराळी आहे. ह्या बाडांतील कांहीं चमत्कार करमणुकीकरितां आपल्या पुढें मांडतों.

(१)

## धान्याभिवृद्ध्यर्थं तोडगा.

वीशाखा : नक्षेत्रीं अब्याचा वृक्ष आपणापासी : असलीयां : धान्ये-
रासीमध्ये घातलीयां : धान्येरासीस अभीवृद्धी होयें : ॥ १ ॥

पाऊसपाण्याशिवाय व मेहनतमशागतीशिवाय धान्याभिवृद्धि झाल्यावर, शेतकऱ्याला शेतांत भुतांची बाधा होण्याचा संभव असतो. त्यावर,

(२)

## भूतबाधाहरणाचा तोडगा.

मृगनक्षेत्रीं : वेलबुराचा वृक्ष आनुन
हातीं बांधावा : भुतबाधा हरे : ॥ २ ॥

बिचाऱ्या शेतकऱ्याची भूतबाधा हरल्यावर, वाटेल त्या मनःकामना त्याच्या मनांत उठण्याचा फार संभव... सबब

(३)

## मनःकामनापूरणाचा तोडगा.

मूळनक्षेत्रीं : पाडळीचा वृक्ष घेईजे : सन्नीध
असलीयां : जे चींती ते काम होये : ॥ ३ ॥

ह्या एका तोडग्यानें काम नाहीं झालें तर,

(४)

## मनःकामनापूर्तीचा दुसरा तोडगा.

मघानक्षेत्रीं मांदाराची मुळीं घेऊन अंगुष्टप्रमान
गनेश कीजे : मनोरथ सीद्धीस पावतील : अर्चन

पूजा कीजे : गुलाल व सेंदुर वं पुस्पें नवेद
राखवीजे : वीडा मंत्रुन : मंत्र : ॐ : नमो
गनपतीयं नमः सर्व कार्ये सिद्धी जाती : परीपुर्णय
भलते मनुशानें : येने मत्रे पुजा कीजे : पुजा
करुन जवळी असो द्यावा : ॥ ४ ॥

हे मनःकामनेचे तोडगे करतां करतां शेतकन्याच्या अंगातोंडाला सुरकत्या पडून वलीपलित रोग होण्याची भीति असते. सबब

(५)

## वलीपलितावर तोडगा.

भरनी नक्षेत्री अबीयाचा वृक्ष घेईजे :
सिध्धी होये : तो ची दुधेसि घेतलीयां
वळीतपळीत जाये : ॥ ५ ॥

(६)

## दुसरा तोडगा.

आश्विनीनक्षेत्री आवळीचा वृक्ष घेईजे :
जवळ असलीयां सर्व जन वेश होये :
तेची दुधेसि घेतलीयां वळीतपळीत जाये : ॥ ६ ॥

वळीतपळीत गेलें असतां व त्यांतल्या त्यांत सर्व जन वश्य झालें असतां, सर्वांहून शहाणे होण्याची आकांक्षा शेतकन्याच्या हृदयांत उद्भवली तर तिचा

(७)

## प्राज्ञेचा तोडगा.

रुईचा वृक्ष दुधेसि प्यालीयां नीकी प्राज्ञा होये : ॥ ७ ॥

मनमुराद धान्य आलें, भुतें मेलीं, रोग गेले व शहाणपण आलें आणि बायकोच्या पोटांत बारा वर्षें सल राहिलें तर त्या पीडेला पारावार नाहीं. शेत करावयाला व संसाराचा गाडा पिढ्यानपिढ्या हांकावयाला व दुष्ट राजांना षष्ठांश नव्हे द्वितीयांश कर द्यावयाला संतति पाहिजे. तदर्थ उपाय

(८)

## सल वाढावयास तोडगा.

Δ Δ

कोराटीयाचे मूल दुधेसि वाटुन घेईजे : सल वाढे : ॥ ८ ॥

सल वाढीस लागून संतति झाली ह्मणजे तिला जास्त व अखंड संपत्तीची जोड पाहिजे, अत एव

( ९ )

## श्रीचा तोडगा.

मनसीळ भांगरा : गोरांचन येकत्र
करुन : त्यानें श्रीचे नांव लेहोन :
अग्नीवर सेकीजे : श्री घरासी ये : ॥ ९ ॥

लांच नव्हे, आंच देऊन संपत्ति घरास आली कीं शत्रू उत्पन्न होतात, हें सांगावयाला नको च. सबब

( १० )

## लोकवशीकरणाचा तोडगा.

वैद्योकरन : गोरोचन : मासियाचे
पीत दोन्ही : उजवे हातीचे : करागुळीनें
उगाळुन टीळक कीजे : त्रीलोक वैश
होये : ॥ १० ॥

लोक वश झाले तरी त्यांजवर सतत नजर ही ठेविली पाहिजे. तेव्हां दृष्टि शाबूद हवी, अर्थात् डोळ्याच्या रोगांवर औषध हवें. त्यापेक्षां तोडग्याचा गुण शतपट, ह्मणून

( ११ )

## नेत्ररोगावर तोडगा.

सेवगीयाची मुळी नीबरसेसि
उगाळुन डोळा घालीजे : तवग
तुटे : ॥ ११ ॥

( १२ )

## दुसरा तोडगा.

आघाडीयाचे बीज व सुपली हळदीचे :
त्रिकुट करने : चुर्न करुन : डोळा
घालीजे : तरळ जाये : ॥ १२ ॥

हे सर्व उपद्व्याप करावयाचे कशाकरितां तर ह्या दुःपूर पोटाकरितां. त्याची खळी भर्तां भरतां नाकी नव येतात. सबब,

( १३ )

## क्षुधाहरणाचें औषध.

॥ ॥ ॥

कोळस्त्याचे बीज : ह्मसिच्या दुधे राधीजे :
आनी मदेसि सेवीजे : क्षुधा न लागे : ॥ १३ ॥

क्षुधाहरणांचा सोपा उपाय सांपडला आणि संतति, संपत्ति व लोकसंग्रह झाला, तत्रापि चोरचिलटांचा उपद्रव कांहीं सुटत नाहीं. तेव्हां त्यावर हि कांहीं मात्रा पाहिजे, नसल्यास मंत्र तरी पाहिजे.

( १४ )


## चोरनिर्फलीकरणमंत्र.

आरी-चोर-कफलस्य ः ब्रह्मंदसवरशेच:
तस्ये स्मरनमात्रेनं चोर भंवंती नीर्फळं ॥ १४ ॥

मंत्र जवळ असून हि अगदीं चोरी व्हावयाची च नाहीं, असें कांहीं ह्मणतां येत नाहीं, सबब

( १५ )

## गतवस्तुलाभमंत्र.



कार्तीकवीर्ये भजुनाम ः राजा बाहुसहस्रवा ः ॥
तस्ये स्मरनमात्रेन ः गतं वस्तु च लभ्येते ॥ १६ ॥

अनिवार लोकसंग्रह करावयाला गेलें ह्मणजे मोठमोठ्या पातशाहांना हि कर्ज होतें, मग सामान्य माणसाला झाल्यास नवल काय ! त्यावर हि तोडगा आहे.

( १६ )

## ऋणापनोदनानुष्ठान.

श्रीगणेशायेनमाः

ॐ ऐं ऱ्हीं श्रीं ऱ्हीं ग्लौं
मंगळाय नमोः रुणापन्नोदनं कुरु कुरु ॥
धनं देहि सर्वमनोरथान् साधय साधय श्वाहाः ॥
मुळेन षडंग विधाय ॥
भूमीपुत्र मम रुण हर हर ॥
मम धनं देहि देही ॥ श्वाहा ॥
जलांत खदीरोल्मुकेनं ॥
लक्षसंखे रुनकृते ॥
ऐकविंशति रेखा कृत्वा ॥
वामपादेन मार्जयत् ॥
दुःखदौर्भाग्यनाशाय ऋणत्रयविमुक्तये ॥
ऋणसंख्याकृता रेखा वामेन परीमार्जयत् ॥
संकल्परेखापरीमार्जनः मंत्रस्य विरुपाक्षरुषीः ॥

रुणहर्ता मंगळो देवता ॥ अनुष्टुप् छंदः
रुणरेखापरीमार्जने विनियोगः ॥ १६ ॥

आतां ऋणापनोदनमंत्रानें ऋणपरिहार झाला व सावकाराच्या टांचीचें भय निवारलें. तत्रापि अंगावरच्या फडक्याला सुद्धां वाटमाऱ्यांचें व ठगांचें भय आहे च. तें हि नाहीं असें धरलें, तरी वाघाचें भय आहे, कडाक्याच्या पावसाचें भय आहे, डंखाचें भय आहे. तेव्हां,

( १७ )

## मार्गरक्षण मंत्र.

श्रीगोपाळ : पंचभैरवरक्षेन ॥
दार चोर न ढुंके ॥
वाघ न खाय ॥
काल न वरसे ॥
डंखे न खाय ॥
रक्षा करे श्रीगोरखनाथ : ॥
याची क्रिया खडे सात घेने :
मार्गी मंत्रुन टाकने ॥ १७ ॥

प्रवासास जावयाचें ह्मणजे पुढील मार्गांत ह्या मंत्रानें रक्षण होईल; परंतु मागल्या घराची व्यवस्था काय ? सबब,

( १८ )

## घररक्षेन मंत्र.

आड बांधो थड बांधो बांधो तुंबा ताई ॥
चौऱ्यासी लख जिव जंत बांधो : जति गोरखक्रि दाही : ॥
खडे सात सात वेळा मंत्रुन २१ घरा भोवते टाकावे फीरोन
वस्त न नेत : सुखि नीजावे : ॥ १८ ॥

या मंत्रानें घर रक्षण झालें व सुखानें ढाराढूर निजलें तर कधीं तरी विंचू चावतो, ह्मणून

( १९ )

## विंचाचा मंत्र.

येकाला खादले वीचाने :
येका मड्याला पाजले पानी :
सातदा पानी मंत्रुन पाजने : ॥ १९ ॥

( २० )

## इंचाचा मंत्र दुसरा.

उज्याड खेडे :
वाहा विचुका थारा :

सोनेका घोडा :
काळा बिचु :
ढवळा बिचु :
लाल बिचु :
तेलीया बिचु :
हळद्या बिचु :
सुफेद बिचु :
सात भांत के सात बिंचु :
बीचु बीचु उत्तर :
आयेगा मोर :
खावेगा तोर :
उतर गुरुकि दाहि :
ना उतरस तर काळभैरवाची दाही :
ना उतरस तरी विरा हनवंताची दाही : ॥ २० ॥

दुःखें तीन प्रकारचीं:—आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक. पैकीं कांहींवरचे तोडगे येथपर्यंत दिले. आतां एका आधिदैविक दुःखावरचा तोडगा देतों. चोरांचें निवारण केलें, भुतांचें केलें, दारिद्र्याचें केलें. परंतु, एवढें हि करून व इतकें हि जपून, म्हणतात नाहीं, उचकी येऊन किंवा ठेंच लागून मरण येतें. तशांतलाच प्रकार उसणीचा आहे. उसण भरावयाला तर कांहीं दुसरें कोणी येत नाहीं. ती आपल्या आपणासच भरते. तेव्हां तिजवर उपाय अवश्य हवा.

## ( २१ )

## उसणीवर मंत्र.

तिन तीरुख गेले झाटा :
तेथे होती म्हईस :
तिच्या काहाडल्या अंत्रमाळा :
त्या गांवचें निघाले धावने :
तेथे होते तळे :
कुटुन मारुन खादले :
तुझ्या गुरुची आन :

शत्रू वारंवार मंत्रतंत्रादि पीडा करितात. तेव्हां त्यांना हि जमीनदोस्त केले पाहिजेत. सबब

## ( २२ )

## मूठ मारण्याचा मंत्र.

ॐ न्मो आदेस गुरुकु :
नागबेल : कुमेरीपान :
जीसे देउ सो तजे प्रान :
छाड छाड माये और बाप छाड :
अन ब्याहा भाई भाई छचाड :

७

सबकु छचाड :
म्हारे पाछे लाग :
म्हारे हातका काळ खायेके लेये :
मुजे छोड भवर मन कर :
तुरत छचाती फाटकर मरे :
गुरुकी शक्त :
मेरी भक्त :
फुरो मंत्र :
ईश्वरी बाच्या :

एथवर सर्व उपाय शेतकऱ्यापुरते झाले. त्याच्या बायकोचें अथवा ह्मशीचें किंवा गाईचें थान गुंतलें तर

## ( २३ )

## थान गुतलेयाचे उपाय.

झुटीचा काढा करुन, त्यांत तेल मेलउन मरदन कीजे थानासी लेप कीजे थान उतरेल ॥

बायकोची सोय झाल्यावर, पोराची हि सोय पाहिली पाहिजे. त्याला मरदुमी आणली पाहिजे.

## ( २४ )

## मरदुमीचें अवसद.

रुईच्या पानाचा रस तोले २
लवंगा मासे ३
जायेपत्री ३
रुईच्या रसांत भीजवने दीवस तीन ३
रोज यक खाने रोज सांत ॥ ७ ॥
नर क्षमी होईल

पोराबाळांच्या मर्दुमीचें औषध तयार झाल्यावर त्यांच्या सर्व अवयवांचें रक्षण करण्याचा मंत्र अवश्य हवा, एतदर्थ,

## ( २५ )

## सर्वरक्षाकरणमंत्र.

ॐ नमो आदेस गुरुको ॥
पग राखे पताळ ॥
जिव राखे काल ॥
मस्तक राखे निरंकार ॥
अकासीं मृत्तिका ॥
पाताळि मृत्तिका ॥
तिहिं ताळीं मृत्तिका ॥
ऐसा कोण बळी है ॥

हैसासूर मारे तो कलेजा फोड ॥
चूके तो मतभंग ॥
मेरी भक्त ॥
गुरुकी सक्त ॥
फुरो मंत्र ॥
फट् स्वाहा ॥
ईस्वरी बाचा ॥ २४ ॥

पोरांच्या सर्व बाह्य अवयवांचें मंत्रानें रक्षण केलें तरी त्यांच्या पोटांत कवलु म्हणून एक रोग होत असतो, त्यावर औषध जवळ असल्यास उत्तम; सबब,

( २६ )

## कवळास वोखद.

हा अघा योठांजाअ वोंतून
ज्ञानवल्लीप्रमाणें छघाणुन
त्यांत साकर मेळवुन
मग
पीत जावें ऐसें रोज ७
कवळ दुर होये ॥ पथ्य कीजे
रोज १५

औषधें सामान्य रोजच्या खाण्यापैकीं च असतात. त्यांचा| उल्लेख लौकिक लिपीनें केला असतां तीं अतिपरिचयास्तव अवहेलनेस पात्र होतात, सबब वरील औषधांच्या यादीची पहिली ओळ सांकेतिक लिपींत लिहिली आहे. ती जरूर असेल त्यानें उकलावी.

शेतकाम करतांना पोरांस सरदी झाली, तर

( २७ )

## सरदीस वोखद.

करडकांगोणीचें तेल काढोन पानासिं
खावें व शरिरास लावावें सरिं कळा
राहेत ॥ तेल काढायाचा प्रकार येणेंप्रमाणें:—
यअदयांळोणायें जांब साणून
जाआय घातायें सालअ वोंतायें
त्काया गेच ढांताम डेहून टें ढांत
मुकीमओअ यांपाट यानघरें येंघायें
म्नेह बआ होए मत्क ॥ २५ ॥

उष्णकाळीं पाणी अति पिऊन सर्दी होते, त्यावर

( २८ )

कचुरा, हीरडा, येळा, वाळा, अवळकठी, काथ,
येसी ६ ही समभागें चूर्ण करुन यकत्र पोटळी बांधोन
उदकामध्यें टाकिजे. अत्यंत वास लागे ॥ २६ ॥

( २९ )

## कुसळ दूर होण्यास.

पिंपळाचि पारंबि शणवारिं अंवतिजे रविवारिं आणीजे
गुगुळ धुप राविजे ॥ २७ ॥ लमळरांजामा जांढावे. सालअ
हजआं चआवे. यमळ ङअ होके ॥

( ३० )

## मोहनीचा तोडगा.

समुद्रफळ उदकें टीळा किजे ॥ ओहण जहटेय होके ॥ २८ ॥

( ३१ )

## स्त्री वांझ होण्यास.

तांदुळज्यार्चे मूळ तांदुळाचे धुवणीं रुत आलीयां
वाटुन घेईजे ॥ ञा घांब होके ॥ २९ ॥

( ३२ )

## गर्भ स्थिर होण्यास.

कुंभाराचे हातची मृत्तिका, सेळीचें दुध, मधु, हे ३
दीजेत ॥ ळर्झ ठाओ मंशक णाही ॥ ३० ॥

( ३३ )

## गर्भारणीस रक्त पडे त्यास.

पारव्याची इष्टा तांदळाच्या पाण्यासि दीजे ॥
लओडआम अक्त चहट सामेग टें आहे ॥ ३१ ॥

( ३४ )

## गर्भ रहाण्यास.

पळसबिज मधु यकत्र करून मांत्राम गेच यओण
बोर्अ अैढ़न यआर्थे ॥ गर्भ राहे सत्य ॥ ३२ ॥

( ३५ )

## वंध्या होण्यास.

रुतसमई जासवंदीचें फुल वाटुन कांजियेसि दीजे ॥
धंढ़का होके ॥ ३३ ॥

( ३६ )

## स्त्रीवशीकरण.

१ चील, २ चंदन, ३ मधु, ४ नरकपाळ हे ४ उगाळुन स्वहस्तास लेप करावा ॥ स्त्री हातीं धरिल्यां वैस्य होये ॥ ३४ ॥

( ३७ )

## दगड न लागण्यास तोडगा.

कानफोडी, कातमांडा, लज्जाळु, उरबीली, यैसी ४ मुळें शनवारीं आंवतुन रविवारीं चौमुळांच्या रसें कुमारिसुत भिजविजे तें सुत जवळि आसल्यां दगड न लागे सत्य सत्य ॥ ३९ ॥

## वादिपराजमंत्र

ऊर्फ

## यक्षणीबाळादिनिमंत्र.

ॐ र्‍हीं र्‍हीं क्रुं क्रुं स्वाहा ॥ ० ॥ यर्व जपसंख्या १०८ यकर्शे अठ प्रतिदिनि कीजे ॥ साचनाम घाडां योन्ही ण बांया ॥ ३६ ॥

( ३९ )

## अष्टमासिध्धीयक्षणीप्रयोग.

ॐ क्लीं पद्मावति स्वाहा ॥ यर्व अष्टाक्षरि मंत्रजप
कीजे संख्या लक्ष दोन ॥ २००००० ॥ मंत्र सीध्ध होये ॥
दशांशें होम किजे संख्या सहस्र १०००० ॥ ३७ ॥

( ४० )

## आथ पिशाच्य-जंखीणी-मंत्रसाधन केल्यां भुतप्रेतपिशाच्यादि सकळ हि सेवा करतिल.

ॐ र्‍हं आं क्लीं नमः ॥ यर्व मंत्र शडाक्षरि पिंपळाखाले बैसोन नित्यानि जप करीत जावा ॥ संख्या सहस्र २२००० ॥ तुप दुध नैव्येद्य आपणास हि आहार तो च ॥ संख्या पुर्ण जाल्यां मंत्र सीध्ध होये ॥ मग तुप क्षीर ( खीर ) पंचखाद्य यकत्र येसी ३ यकत्र करोनि दशांशें होम किजे संख्या शत २२०० ॥ ३८ ॥

( ४१ )

## सर्पाचा मंत्र.

कान्होजी २ ॥ पान लागलें
जाय पळ उतर बैहोंया
लाग पाठी ॥ गु ॥ मे ॥ फु ॥ ॰ ॥
कर्णी ऐकतां नामाभिधान पुसोन जपत जावा आवर्ती ३५०
मंत्र सीकतां नइनोरकीं जपसंख्या ३५०० ॥
साडे ३ सहस्र करुन दशांशें ३५० गुग्गुळाचें कीजे

( ४२ )

## देवता प्रसन्न.

वेमीशुनाप्रिय स्वाहा ॥
यर्व अष्टाक्षरि मंत्र प्रतिदिनि
वटवृक्षातळी संध्याकाळीं जपसंख्या
१००० दीप लावोनि करावा दशांशें
हावन करित जावें ॥ पुजा व हावन—
सामुग्री येणेंप्रमाणें —
१ भात, २ दधी, ३ पुड्या, ४ सुपारी, ५ मद्ये,
६ पान, ७ वडा, ८ फुलें, ९ मांस.

या च सामुग्रीनें पुजा करावी ॥ व या च द्रव्यें हावन करावें ॥
येसें रोज सात कीजे ॥ देवता प्रसन्न होये ॥

तोडगे, मंत्र, प्रयोग व ओषधी मिळून चाळीस बाबी वरती दिल्या आहेत. त्यांची आतां मीमांसा करूं. गृहरक्षण करण्यास पोलीस समर्थ नसला म्हणजे गृहरक्षणमंत्र लागतो. राजपुरुष राजमार्ग सुरक्षित ठेवीत नसले, म्हणजे मार्गरक्षणमंत्र करणें ओघास येतें. वैद्यशास्त्र सशास्त्र नसलें, म्हणजे साप, विंचू यांचे दंश मंत्रानें उतरून घेण्याची बुद्धि होते. पोटभर अन्न मिळालें नाहीं, म्हणजे क्षुधापनोदनाचे खोटे तोडगे सुचतात. विद्वत्तेच्या अभावीं मंत्रानें वादिपराजय करण्याची दुर्बुद्धि उपजते. तात्पर्य, वाईट राजा, वाईट वैद्यक, वाईट पोलीस, वाईट कृषिज्ञान, वाईट अन्न, देशांत असलें, म्हणजे असले क्षुद्र व भ्रांत तोडगे करण्याकडे प्रवृत्ति होते. असली प्रवृत्ति आपल्या ह्या देशांत फार प्राचीन काळापासून म्हणजे अथर्ववेदकाळापासून आहे. त्यावरून लोकस्थितीचा अंदाज अंशतः करतां येण्यासारखा आहे. स्त्रीवशीकरण अक्षता फेंकून करणाऱ्या द्रविडाचें वर्णन बाणानें केलेलें पुष्कळांना आठवत असेल. तसले च तोडगे वर दिलेले आढळतील.

वि. का. राजवाडे.

## भडोच व बडोदा व पाद्रा.

भरुकच्छ, कच्छ, हे शब्द अष्टाध्यायींत – येतात कच्छाग्निवक्त्रवर्त्तोत्तरपदात् ( ४–२ –१२६ ), कच्छादिभ्यश्च ( ४–२–१३३ ) · कच्छ म्हणजे कांठचा प्रदेश; आणि भरु म्हणजे पाणथळ प्रदेश, दलदल, समुद्र. तेव्हां

(१) भरुकच्छ = समुद्रकांठचा प्रदेश

भरुकच्छ = भडुअच्छ = भडुच = भडूच = भडोच = भरूच.

सिंधुकच्छ, नदीकच्छ, पर्वतकच्छ वगैरे शब्द पहा.

(२) पद्र म्हणजे खेडें, गांव.

भरुपद्र = समुद्रकांठचा, दलदलींतला गांव.

भरुपद्र = भडुअद्र = भडूद्र = बडूद्र

= बडोद्र + ( क = अ ) = बडोद्रा ( गुजराथी )

= बडोदें ( मराठी ), बडोदा.

☞ वटोदर ही व्युत्पत्ति निराधार आहे.

(३) पद्रक = पद्रा = पाद्रा

(४) कच्छमंडपिका = कच्छमांडवी.

वि. का. राजवाडे.

## कर्णाटक.

ह्या देशवाचक शब्द कसा बनला, या संबंधानें कोणीं कोठें हि विवेचन केलेलें नाहीं. मनुस्मृतीच्या दशमाध्यायाचा २२ श्लोक येणेंप्रमाणें आहेः—

झल्लो मल्लश्च राजन्याद् व्रात्यान् निच्छिविरेव च ।
नटश्च करणश्चेव खसो द्रविड एव च ॥ २२ ॥

कुल्लूकव्याख्याः—

क्षत्रियाद् व्रात्यात् सवर्णायां झल्ल–मल्ल–निच्छिवि–नट–करण–खस द्रविडाख्या जायन्ते ॥ एतानि अपि एकस्य एव नामानि ।

म्हणजे—

व्रात्याराजन्यापासून सवर्ण स्त्रीचे ठाईं जी प्रजा होते तिला देशपरत्वें झल्ल, मल्ल, निच्छिवि, नट, करण, खस, द्रविड अशीं नांवें आहेत. हीं एका च संकरजातीचीं निरनिराळीं नांवें आहेत.

येथें एका ऐतिहासिक वृत्ताचा उल्लेख केला पाहिजे. भारतीय आर्यांत चातुर्वर्ण्य सुरू झालें तेव्हां फक्त चार वर्ण होते; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र. पुढें कालान्तरानें सं-

कर होऊन संकरजाति निर्माण झाल्या. ह्या संकरजातींपैकीं कांहींना समाजांतील निरनिराळीं कारुकर्में ऊर्फ धंदे पिढीजाद् नेमून दिले व क्षत्रियव्रात्योत्पन्न झल्लमल्लादींना आर्यावर्ताच्या आसपासचे प्रदेश नेमून दिले. ज्या प्रदेशांत हे व्रात्यक्षत्रिय राहावयास गेले त्या प्रदेशांना त्यांचीं नांवें मिळालीं.

झल्लांवरून झालरापट्टण, झालगांव, झालवाडी.
मल्लांवरून मलठाण, मालगांव, मालवाडी, मलवडी.
लिच्छिविंवरून लिछिविदेश ऊर्फ नेपाल.
खसांवरून खाशिया.
द्रविडांवरून द्रविडदेश.

त्याचप्रमाणें करणांवरून व नटांवरून करणनटदेश हें देशवाचक नांव निघालेलें दिसतें. न चा ण होऊन,

करणनट=करणणट असें रूप झालें. आणि स्वार्थे क प्रत्यय लागून, करणाटक असें रूप बनलें. करणाटक म्हणजे करण व नट ह्या व्रात्य क्षत्रियांचा देश. करणाटक ह्या शब्दाचें कन्नड असें कानडी रूप आहे.

तें तर

१ करणनट =
२ करण्णट =
३ कण्णड =
४ कन्नड

अशा परंपरेनें बनलेलें दिसतें. कन्नड हा शब्द मूळचा अव्युत्पाद्य शब्द नाहीं; उघड उघड साधित शब्द आहे. करण व नट लोक ह्या प्रांतांत वसाहत व राज्यें करावयास आल्यापासून कर्णाटक, कन्नड हें नांव ह्या प्रांताला मिळालेलें दिसतें. रामायणांत व महाभारतांत तुंगभद्रेच्या भोंवतालील प्रदेशास करणाटक, कन्नड हें नांव नाहीं; निराळें च नांव आहे.

करण शब्दावरून करणगांव, कर्णोली, करणूल ( र )
व
नट शब्दावरून नडिया, नडियाद, नाटोर

हीं देशनामें, पुरनामें, पल्लीनामें व ग्रामनामें झालेलीं आहेत.

वि. का. राजवाडे.

## गांधारी—गंधार—खंदार.

गंधर्व या शब्दाचें प्राकृत गांधार अथवा गंधार. गंधार या शब्दाचें पैशाची प्राकृत खंदार. खंदार हा शब्द मराठी ऐतिहासिक पत्रांतून व बखरींतून येतो. गांधारी हा शब्द प्राकृत आहे. तो भारतांत येतो. त्या अर्थीं प्राकृत भाषा प्रचलित झाल्यावर भारत झालें हें स्पष्ट आहे.

वि. का. राजवाडे.

## अजमीर.

अजमीढं हीं जनपद्वाचक शब्द आहे. अवृद्धादपि बहुवचन विषयात् ( ४–२–१२५ ) ह्या सूत्रावरील व्याख्यानांत अवृद्धाज्जनपदावधेः । आजमीढकः । असें वाक्य आहे. त्यांत अजमीढ हा जनपद्वाचक शब्द आला आहे. ढचा अपभ्रंश ऱ्ह व ऱ्ह चा अपभ्रंश र होऊन अजमीर ह्या शब्द निष्पन्न झाला आहे.

## पत्तन.

पत्तन हा शब्द संस्कृत नाहीं, प्राकृत आहे. प्रस्थान ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश पट्टण व त्याचा अपभ्रंश पत्तन असावा. पट्टण व पत्तन हे दोन्हीं अपभ्रष्ट प्राकृत शब्द पुढें संस्कृतांत जसेचे तसे घेतले गेले, असें दिसतें.

**वि. का. राजवाडे.**

## प्रस्थ = पत.

सोनपत, पानपत, बागपत या दिल्लीच्या उत्तरेस असणाऱ्या शहरांच्या नांवाचें उत्तरपद जें पत तें प्रस्थ ह्या पाणिनिकालीन शब्दाचा अपभ्रंश आहे.

सोनपत = सुवर्णप्रस्थ किंवा शोणप्रस्थ.

पानपत = पर्णप्रस्थ.

पर्ण हें जनपद व तत्रस्थ लोक यांचें नांव असावें. आपर्णानि कुलानि ( गाथासप्तशती ).

बागपत = वर्कप्रस्थ.

तसें च इंद्रप्रस्थ ह्या शब्दाचा अपभ्रंश इंद्पत असें व्हावें; परंतु हा अपभ्रंश सध्यां प्रचलित नाहीं. कां कीं, तें शहर बुडून नामशेष झालें. दिल्लीला इंद्रप्रस्थ केवळ लक्षणेनें ह्मणतात. सोनपत, पानपत, बागपत व इंद्रप्रस्थ हीं चार नगरें कुरुक्षेत्रांत होतीं. प्रस्थपुरवहान्ताच्च ( ४–२–१२२ ).

**वि. का. राजवाडे.**

## पलदी व कौशांबी.

पाणिनीय गणपाठाच्या चवथ्या अध्यायांत **प्रस्थोत्तरपदपलद्यादिकोपधादण्** ( ४ – २ – ११० ) ह्या सूत्रांतील **पलद्यादिगण** दिला आहे. पलद्यादिगण बहुवचनी आहे. त्यांतील पहिले तीन शब्द पलदी, परिषद् व रोमक हे आहेत. पैकीं पलदी हा शब्द ग्रामवाचक आहे. हा शब्द महाराष्ट्रांतील ग्रामाचा वाचक सध्यां सांपडतो. खानदेशांत पाचोरा स्टेशनाच्या पूर्वेस व जळगांवाच्या दक्षिणेस पहुर गांवाजवळ पलधी, पालधी या नांवाचें गांव सध्यां आहे. हा शब्द पलधी पलदी ह्या पाणिनीय शब्दाचा अपभ्रंश दिसतो. आर्य उत्तरेकडून दक्षिणेकडे आले असतां त्यांनीं जीं गांवें वसविलीं त्यांना उत्तरेकडील आपापल्या गांवांचीं नांवें दिलीं. जळगांवापासून चार पांच मैलांवर कुसुंबें, ह्मणून खेडें आहे. त्याचें नांव कौशांबी या शब्दाचा अमभ्रंश दिसतो. ह्यावरून असें दिसतें कीं कुसुंबें व पलधी हीं गांवें कौशांबी प्रांतांत रहाणाऱ्या आर्यांनीं वसविलीं.

**वि. का. राजवाडे.**

## परखंडी.

वांईशहराच्या जवळ परखंदी, परखंडी नांवाचें एक लहानसें खेडें आहे. ह्याचें पूर्वीचें पुरातन नांव प्रगंडी. प्र चें पर व ग चा ख होऊन परखंडी असें रूप झालें. प्रगंडी ह्मणजे दुर्गप्राकारभित्तौ शूराणां उपवेशनस्थानम्. हा शब्द भारताच्या शांतिपर्वाच्या अडुसष्टाव्या अध्यायाच्या सत्तेतालिसाव्या श्लोकांत ( कुंभकोणप्रत ) आला आहे.

प्रगंडीः कारयेत्सम्यगाकाशजननीस्तदा ।

ह्या परखंदीस जुन्या कोटाचीं अवशेषें अद्याप आहेत.

वि. का. राजवाडे.

## उमरावती.

नद्यां मतुप् ( ४-२-८५ ) ह्या पाणिनिसूत्रांत नदीवाचकशब्दांना चतुरर्थी मतुप् प्रत्यय लागतो. जसें उदुंबरावती, मशकावती, इक्षुमती.

उदुंबरावती = उंबरावती ( प्राकृत )

= उमरावती.

कित्येक लोक वऱ्हाडांतील उमरावतीनामक नगरवाचक शब्दाचा अमरावती असा उच्चार करतात; परंतु तो अपभ्रष्ट होय.

वि. का. राजवाडे.

## धोम

वांईजवळ धोम महाबळेश्वर ह्मणून गांव आहे. तें धौम्य ऋषीनें वसविलें अशी आख्यायिका आहे. वस्तुतः हा शब्द धूम ह्या देशवाचक शब्दावरून निघालेला दिसतो. धूमादिभ्यश्च ( ४-२-१२७ ). वुञ् प्रत्यय लागुन धौमक होतें. त्याचें प्राकृत धोम. दक्षिणेंत वसाहती करतांना उत्तरेकडील देशनामें प्रचलित झाल्याचें हें उदाहरण आहे.

वि. का राजवाडे.

# १ हसन गंगो बाह्मणी.

सर्वत्र महशूर च आहे कीं इ. स. १३४७ त गुलबुर्ग्यास ज्यानें ब्राह्मणी पातशाहत स्थापिली त्याचें नांव हसन गंगो बाह्मणी. फेरिष्त्यानें आपल्या दक्षणच्या इतिहासांत असें लिहिलें आहे कीं ज्या ब्राह्मणाच्या पदरीं हसन पूर्ववयांत होता, त्याच्या स्मरणार्थ राज्यारूढ झाल्यावर त्यानें गंगो बाह्मणी अशी पदवी आपल्या नांवाला व वंशाला जोडिली. फेरिष्ता विजापुरास बहुत वर्षे होता, तेथें त्याला विश्वसनीय माहिती दक्षिणच्या मुसुलमानांसंबंधानें चांगली मिळण्यासारखी होती व तो मुसुलमानधर्माभिमानी होता, ह्या तीन बाबी लक्ष्यांत घेतां, फेरिष्त्यानें दिलेली हकीकत विश्वसनीय मानण्याकडे प्रवृत्ति होते, व ती तशी आतांपर्यंत लोक मानीत आले ही. अलीकडे कित्येक मंडळीनें बाह्मणी या शब्दाचा अर्थ इराणचा बहमन बिन इस्कंदियार असा करून, ब्राह्मणाशीं हसनचा कांहीं एक संबंध नव्हता, अशी सिद्धि करण्याचा घाट घातला आहे. (J. Bengal R. A. S. 1904, Extra No. "Notes on the Bahmanî Dynasty" by Major Wolseley Haig, I. A.). बाह्मणी ह्या शब्दाची अशी वासलात जी लावितां आली तिला कित्येक तवारिखांचा आधार हि त्यानें (Haig) दिला आहे. परंतु फेरिष्ता दक्षिणेंत राहिलेला होता व इतर लेखक राहिलेले नव्हते, ही बाब लक्ष्यांत घेतां, असें ह्मणावें लागतें कीं फेरिष्त्याची च हकीकत जास्त विश्वसनीय आहे. ह्याला दुसरें प्रमाण असें कीं बाह्मणी या शब्दाची यद्यपि हेगनें वासलात लाविली, तत्रापि गंगो किंवा गंगू या शब्दाची आडकाठी त्याला दूर करतां येई ना. ती दूर करण्याचा प्रयत्न मौलवी अबदुल वली यांनीं (J. Bengal R. A. S. 1911, November) केला आहे. A. S. B. च्या संग्रहालयांत हफ्त इक्लीम या हस्तलिखित बाडांत (D|347) حسن کا کویہ हसन काकूया असें हसनचें नांव सदर मौलवी यांस आढळलें. त्यावरून کیکاوس केकावूस या शब्दाचा तर तो काकूया हा शब्द दक्षिणी अपभ्रंश नसेल अशी मौलवीना शंका आली व ती शंका मान्य करून ते हसन गंगू याचें नांव "अलाउद्दीन हसन कैकावुस बहमनी" असें असावें अशी सूचना करते झाले. ह्या सूचनेंत कैकावुस ऊर्फ काकूया हें हसनच्या बापाचें नांव आहे व बहमन हें इराणच्या बहमन बिन इस्कंदियार या इराणी पातशाहाचें नांव आहे, असें मौलवी ह्मणतात. परंतु, हें म्हणणें टिकेल असें दिसत नाहीं. कां कीं कैकावुसचा अपभ्रंश कैकुस असा दक्षिणेंत होतो, काकूया असा होत नाहीं. س काढून टाकिला असतां कैकावुस کیکاوس चा उच्चार कैको, कंको, कंकू, गंगू, काकू असा होतो म्हणून मौलवी सुचवितात. परंतु س कां काढून टाकावयाचा त्याचें कारण ते सांगत नाहींत. शिवाय गंगू असा उच्चार केवळ फक्त हिंदू लेखक करतात असें नाहीं, तर तो अस्सल मुसुलमान लेखक ही करतात. त्यांना कैकावुस चें गंगू करण्यांत कांहींच मतलब नव्हता. सबब मौलवींची ही व्युत्पत्ति खालीं पडते. अर्थात्, हसनच्या बापाचें नांव कैकावुस नव्हतें, असें स्वच्छ बिनधोक ह्मणतां येतें. हसनची खरी हकीकत ज्या बखरींत दिली आहे अशी एक बखर श्रीमंत रा. रा.

आबासाहेब मुजुमदार, पुणें, यांनीं माझ्या स्वाधीन नुकती च केली. ती मलिकंबराच्या नंतर लिहिलेली आहे ह्मणजे सुमारें इ. स. १६२५ च्या नंतर लिहिलेली आहे. तींत रामदेवराव जाधव व बेदरास विरापाल राजा, भालकीस भालेराव, गुष्टिकापुरीस भास्करराऊ, व कल्याणीस कल्याणदास गरूरराव व चालकापुरीस चालकराव, ऐसे शिवभक्त राजे मुसुलमानांच्या पूर्वीं राज्य करीत होते, असें लिहिलें आहे. ह्या बखरींत अशी हकीकत आहेः—हसन हा एक उत्तरेकडून दक्षिणेंत आलेल्या व मिरजेस राहिलेल्या फकिराचा पोरगा होता. त्याला मिरजेचा देशपांड्या **गंगरसपंत** यानें फकिराच्या मृत्यूनंतर वाढविलें. गंगरसपंतानें त्याला पुढें दोन घोडे देऊन दिल्लीस पाठविलें. तेथें चढत चढत तो शेवटीं राजपदवीस पोहोंचला. नंतर आपल्या आश्रयदात्याचे उपकार कायमचे स्मरण्याकरितां त्यानें आपलें नांव **हसन गंगो बाह्मणी** असें ठेविलें. हसनचा बाप जो फकीर तो मिरजेस अल्लाउद्दीनच्या स्वारीच्या कालीं दक्षिणेंत आला. मुसुलमान लोक शिपाई ह्मणून महाराष्ट्रांत मुसुलमानी राज्य होण्यापूर्वीं राहूं लागले होते. असो. हसनची हकीकत इ. स. १६२५ च्या सुमारास ह्मणजे हसननंतर ( १३४७ ) तीनशें वर्षांनीं लिहिली आहे. ती एका मुसुलमान सरदाराकरितां किंवा पातशहाकरितां लिहिलेली आहे व ती त्या कालीं अनेक लोकांना खरी भासत असावी. तात्पर्य, ह्या बखरींतील हकीकत चांगली विश्वसनीय आहे व हिच्या च सारख्या एखाद्या तवारिखेवरून फेरिष्त्यानें आपली हकीकत उतरून घेतली आहे. प्रस्तुत बखर एका पारशी बखरीचा उतारा आहे, असें लेखक शेवटीं ह्मणतो.

**वि. का. राजवाडे.**

## २ लेखनप्रशस्ती.

१ शक १५९६ त राज्याभिषेकाच्या समयीं शिवाजीनें अनेक मुलकी, लष्करी, धर्माधिकरणी, न्यायाधिकरणी, वगैरे कायदे केले. त्यांना पद्धती ह्मणून ह्मणत. जुने शिलशिले पाहून व तत्कालीन रीतरिवाज पाहून, ह्या पद्धती तयार केल्या गेल्या. अशा पद्धतींपैकींच लेखनप्रशस्ती म्हणून एक पद्धती शिवछत्रपतींच्या आज्ञेवरून बाळाजी आवजी चिटणीस व इतर मुत्सद्दी मंडळी ह्यांच्या विचारानें रचली गेली. शक १२४० पासून शक १५९६ पर्यंत ह्मणजे सुमारें तीन साडेतीनशें वर्षें महाराष्ट्रांत मुसुलमानांचा अंमल होता. खरें म्हटलें असतां शहाजीनें अहमदनगरची पादशाही बुडविली त्या वेळेपर्यंत म्हणजे सुमारें शक १५५८ पर्यंत जो ३१८ वर्षांचा काळ गेला तोंपर्यंत मुसुलमानांचें राज्य ह्या देशावर होतें. त्या अंमलाखालीं देशांत इतर बाबींत मुसुलमान रिवाजांचा जसा जारीनें शिरकाव झाला तसाच लेखनप्रशस्तींत हि झाला. बिन्न, वल्लद, मुषफिक् मेहेरबान, हे किताबत्, तेरीख, माहे, सुरुसन, वगैरे फारशी व आरबी शब्द पत्रलेखनांत हमेशा येऊं लागले. शक १२४० च्या पूर्वीं हेमाद्रीनें म्हणजे हेमाडपंतानें पत्रें व सरकारी कागद लिहिण्याच्या ज्या पद्धती घालून दिल्या होत्या त्याचीं भाषान्तरें फारशींत होऊन नवीन मुसुलमानी मायने प्रचारांत आले. सारांश, येथून तेथून सर्व लेखनप्रशस्ती यवनभाषामय झाली. ही यावनी लेखनप्रशस्ती शिवाजीनें तोरणा किल्ला घेतल्यापासून म्हणजे शक १५६८ पासून शक १५९६ पर्यंत चालूच होती. राजकार-

णाच्या विवंचनेमुळें व लढायांच्या गडबडीमुळें ह्या तीस वर्षांत लेखनप्रशस्तीकडे लक्ष देण्यास शिवाजीला जसा अवकाश सांपडावा तसा सांपडला नाहीं. परंतु त्या गडबडीच्या अवधींत राजव्यवहारकोश तयार करवून यावनी शब्दांच्या ऐवजीं संस्कृत शब्द प्रचारांत आणण्याची व्यवस्था त्या धोरणी मुत्सद्यानें करून ठेविली. अशा हेतूनें कीं पुढें मागें व्यवस्थित रीतीनें सर्व मायने शुद्ध मराठी भाषेनें लिहिण्याची पद्धती सौकर्यानें प्रचलित करतां यावी. यावनी पद्धती आस्ते आस्ते मोडून टाकून शुद्ध निर्भेळ मराठी पद्धती चालू करण्याला राजव्यवहारकोश व लेखनप्रशस्ती हीं जीं दोन साधनें शिवाजीनें निर्माण केलीं त्यांपैकीं राजव्यवहारकोश छापून प्रसिद्ध झाला आहे; लेखनप्रशस्ती झाली नाहीं. ही पद्धती काय होती व हींत मजकूर काय होता त्याचा तपशिल पुढें दिला आहे. ही लेखनप्रशस्ती जशीची तशी सबंद सांपडलेली नाहीं. परंतु तींतील बहुतेक बराच मजकूर एक दोन जुन्या बाडांत लिहिलेला आढळला, त्यांवरून खालील तपशिल दिला आहे.

२ शिवाजीनें प्रचलित केलेल्या लेखनप्रशस्तीचा उपोद्घात खालील मतलबाचा होता. स्वराज्य सुरू होऊन इतकीं वर्षें झालीं असतां, राज्यांतील अधिकारी, मुत्सद्दी, कामगार व इतर लोक राजास व परस्परांस लिहितांना मनास येईल तो मायना योजतात; त्यामुळें एक शिस्त रहात नाहीं; सबब ही प्रशस्ती उपरिनिर्दिष्ट कामगारांच्या उपयोगार्थ प्रसिद्ध केली जात आहे. ह्या उपोद्घात झाल्यावर, हेमाडपंताच्या कालीं पत्रलेखनाच्या प्रशस्त्या होत्या असें विधान करून, नंतर मुसुलमानी अंमलांत त्यांच्यांत फेरफार झाले, हें सांगितलें आहे. हें राज्य हिंदूंचें असल्यामुळें मुसुलमान पातशाहा व अधिकारी जे मायने योजीत ते मायने जसेचे तसे घेणें अशक्य आहे, तेव्हां मुसुलमानांच्या पूर्वीं शिलशिला काय होता तें पाहून व मुसुलमानी मायन्यांतून घेण्यासारखें असेल तेवढें घेऊन, देशकालवर्तमानानुरूप नवी लेखनप्रशस्ती प्रचलित केली पाहिजे, अशा मतलबाचीं वाक्यें पुढें आहेत· उपोद्घात व पूर्ववृत्तान्त लिहून नंतर मुख्य विषयाचा उपन्यास केला आहे.

३ पत्रें दोन प्रकारचीं असत, खासगी व सरकारी. हीं दोन्ही प्रकारचीं पत्रें कागदावर लिहावीं लागतात आणि लिहितांना प्रथमारंभीं रेघ काढावी लागते. मराठी मोडी लिहावयाचें ह्मणजे प्रथम रेघ काढल्याशिवाय गत्यंतरच नसतें. ती रेघ विवक्षित स्थळीं कशी काढावी व विशेषतः मायन्यांत कशी काढावी, हें ह्या प्रशस्तींत सांगितलें आहे. प्रशस्ती रचण्याचा मुख्य हेतु मायने कसे लिहावे हा आहे; तेव्हां निरनिराळ्या मायन्यांच्या रेघा कशा काढाव्या ह्याचेंच वर्णन प्रशस्तींत प्रथमतः येणें रास्त आहे. रेघा अथवा रेषा ह्यासंबंधीं हेमाडपंती नेम खालील श्लोकांत सांगितला आहेः–

मित्राणां त्रितया रेषा द्वे भृत्यस्य रिपोरपि ।
षड्गुरोः स्वामिनः पंच एकैकं पुत्रकन्ययोः ॥

शंकराचार्यादि गुरूंना सहा, राजाला पांच, मित्राला तीन, सेवक व शत्रु ह्यांना दोन, आणि पुत्रकन्यादि मंडळीला एक रेषा द्यावी असा हेमाडपंती निर्बंध होता. कोणत्या दर्ज्याच्या मनुष्याला मायन्यांत किती रेघा काढून मान द्यावा ह्याचा तपशील येथपर्यंत झाला. आतां कागद मोडल्यावर श्रींकाराच्या खालील पहिली ओळ किती

तऱ्हेनें काढतां येते तें सांगतों. कागद उजव्या बाजूनें मोडून त्याचे चार रकाने पडतात. रेघ चार रकाने ओढली ह्मणजे तीस सबंद रेघ ह्मणतात. तींत पहिल्या रकान्यांत एका अक्षराची जागा कोरी ठेविली ह्मणजे तिला दफे ह्मणतात; दोन अक्षरांची ठेविली ह्मणजे दफाते ह्मणतात; तीन अक्षरांची ठेविली ह्मणजे कर्ते ह्मणतात; व चार अक्षरांची ठेविली ह्मणजे महजर ह्मणतात. पहिल्या दोन रकान्यापुरतीच तेवढी रेघ ओढली ह्मणजे तीस पहिली जिल्हे ह्मणतात. नुसत्या तिसऱ्या व चवथ्या रकान्यापुरतीच रेघ ओढली व पहिले दोन रकाने मोकळे ठेविले ह्मणजे त्या रेघेस दुसरी जिल्हे ह्मणतात. मधील दुसरा व तिसरा, असे दोन्ही रकाने भरून शिवाय पहिल्या व चवथ्या रकान्यांतील दोन दोन् अक्षरांची जागा घेऊन रेघ ओढली ह्मणजे त्या रेघेला बीत ह्मणून संज्ञा आहे. ह्याच बीत रेघेस अकार प्रारंभीं लाविला ह्मणजे त्या रेघेला अज् ह्मणण्याचा सांप्रदाय आहे; एकार लाविला ह्मणजे एकूणूहतू ह्मणतात. बाक देऊन बीत रेघेचा प्रारंभ केल्यास वासूलात् ह्मणण्याचा परिपाठ आहे. मायन्याची पहिली रेघ ओढण्याचे कारणपरत्वें इतके प्रकार आहेत. ह्या सर्व प्रकारांहून आणीक तीन प्रकारची रेघ आहे. रेघेच्या प्रारंभीं दकार काढला ह्मणजे दकारी रेघ सिद्ध होते. कित्येक वेळां रेघेच्या प्रारंभीं एक शून्य देतात; व कित्येकदां दोन उभ्या रेघा देतात. ह्याविषयीं हेमाडपंती श्लोक येणेंप्रमाणें:--

> खं ब्रह्म निर्गुणं प्रोक्तं रेषे हरिहरद्वयोः।
> दकारेण स्नेहमाप्नोति; तावल्लक्ष्मीः स्थिरा भवेत्॥

ह्मणजे शून्य दिलें असतां ब्रह्माचा निर्देश होतो; दोन उभ्या रेघा दिल्या असतां हरिहरांचा उल्लेख होतो; व दकार काढला असतां मित्रत्वाचा आविष्कार होतो. ह्या सर्व रेघा कशा काढावयाच्या तें खालील आकृतीवरून कळेल.

| | पहिला रकाना | | दुसरा रकाना | | तिसरा रकाना | चवथा रकाना |
|---|---|---|---|---|---|---|
| | दफे | दफाते | कर्ते | महजर | | |
| सबंद रेघ | —— | —— | —— | —— | —— | —— |
| दफे रेघ | ……—— | —— | —— | —— | —— | —— |
| दफाते रेघ | …… | …… | —— | —— | —— | —— |
| कर्ते रेघ | …… | …… | ……—— | —— | —— | —— |
| महजर रेघ | …… | …… | …… | …… | —— | —— |
| थति रेघ | ……—— | —— | —— | —— | —— | —— |
| अज रेघ | ३]—— | —— | —— | —— | —— | —— |
| एकूणहत रेघ | ◡—— | —— | —— | —— | —— | —— |
| वासलात रेघ | ◡—— | —— | —— | —— | —— | —— |
| ख रेषा | ०—— | —— | —— | —— | —— | —— |
| दुरेघी रेषा | ॥—— | —— | —— | —— | —— | —— |
| दकारी रेघ | [illegible]—— | —— | —— | —— | —— | —— |
| दुरेघी दकारी | ॥ [illegible] | —— | —— | —— | —— | —— |
| पहिली जिल्हे | —— | —— | —— | —— | | |
| दुसरी जिल्हे | …… | …… | …… | …… | —— | —— |

ह्या पंधरा रेघांखालीं सर्व प्रकारच्या लहान मोठ्या रेघा पडतात. ह्या सर्व रेघा हेमाडपंताच्या वेळेपासूनं आहेत. कित्येकांचीं शुद्ध संस्कृत नांवें जशींचीं तशींच राहिलीं आहेत; व कित्येकांचीं फारशीच नांवें तेवढीं प्रचलित आहेत.

४ रेघा कशा काढाव्या ह्याचा खुलासा करण्यापूर्वी रेघा ज्या यंत्रानें काढावयाच्या त्या लेखणीचें स्वरूप व ज्या द्रव्यानें काढावयाच्या त्या शाईची कृती प्रथम देणें उचित

होतें. नाचण्याचें शिरें करून व तें काजळानें घोटून काळी शाई करण्याचा परिपाठ महाराष्ट्रांत फार पुरातनचा आहे. लाखी, लोखंडी वगैरे इतर हि आणीक शायांचे प्रकार आहेत. परंतु कारकुनांच्या मोडी लिहिण्याला सर्वत्र काजळानें घोटून तयार केलेल्या काळ्या शाईचाच उपयोग महाराष्ट्रांत हमेशा होई. लेखण्या प्रायः बोरूच्या करीत. मोडी अक्षर लिहिण्याळा बोरूखेरीज दुसऱ्या कोणत्याही लांकडाचा उपयोग करीत नसत. बोरूची लेखणी एक–मजली किंवा दोन–मजली करीत. लेखणीच्या उतारांत खांचा, खोचा व मेहरपी हि करणारे कित्येक कुशल कारकून असत. उतारावर आंतील भेंडाचें टेंगूळ ठेवण्याचा हि कोठें कोठें प्रचार असे. बोरू दोन प्रकारचे असतः साधे व कळक्ये. कळक्या बोरूंना विस्तवावर भाजून काळे चट्टे पाडण्याचा हि संप्रदाय कोठें कोठें असे. श्रीमंतांच्या मुलांना लिहिण्याकरितां ज्या लेखण्या करीत त्यांच्यावर सोन्याचा वर्क चढवीत. गरीबांच्या मुलांची ही हौस रुपेरी किंवा सोनेरी बेगडीवरच भागविली जाई. उत्तम लेखणी म्हटली म्हणजे तिचा उतार सरळ असावा, डावीकडे किंवा उजवीकडे झुलूं नये. नाहीं तर,

वामनेत्रा स्त्रियं हंति । उन्नेत्रा मतिभ्रंशका ॥
दक्षिणेन तु नेत्रेण । राजा भवति निश्चयात् ॥ १ ॥

( अ ) पत्रें दोन प्रकारचीं असत–खासगी व सरकारी. पैकीं सरकारी पत्रें कोणत्या रेघांनीं लिहावीं तें प्रथम सांगितलें पाहिजे. वर ज्या पंधरा प्रकारच्या रेघा सांगितल्या आहेत त्यांतील सबंद रेघ ह्मणजे चार–रकानी रेघ काढून छत्रपतींचीं आज्ञापत्रें लिहिलीं जात. आज्ञापत्रें लिहिण्याचें व त्यांवर छत्रपतींचा शिक्का करण्याचें काम चिटणिसाचें असे. ' सुज्ञ असा ' अशीं अक्षरें छत्रपतींच्या स्वदस्तुरचीं आज्ञापत्राच्या शेवटीं असल्यास शिक्का करीत नसत. खालील लहान अंमलदारांस हि छत्रपतींचीं आज्ञापत्रें शिक्क्याशिवाय चाररकानी जातः——

१ जातपाटील यांस लिहिणें तें त॥ ह्मणोन.

२ खिजमतगारांस म॥ ह्मणोन.

कुळकर्णी, जकाते वगैरे तिरगुळ, गोळक यांस र॥ ह्मणोन.

( आ ) दकारी तीनरकानी पत्रें छत्रपतींचीं जमीदार पे॥ देशमुख देशपांडे यांस मशरूल अनाम ह्मणोन.

( इ ) बीतरेघी पत्रें ब्राह्मण, गोसावी, बैरागी, भिक्षुक, पंडित वगैरेंस.

( ई ) पदा[illegible]ारी संस्थानिकांस मथळ्यावरील श्रीच्या खालीं बीतरेघ काढून ' सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य ' येथपर्यंत दकारपूर्वक लेहून, नंतर राजश्रीच्या पुढें जसें ज्याचें वैभव तशी कमजास्त जागा सोडून, नांव, आडनांव, मरातब लेहून ' गोसावी यांसि ' काढून पहिल्या किंवा दुसऱ्या जिल्हेंत दुसरी ओळ पुरी करावी. तिसऱ्यां तीनरकानी ओळींत स्ने॥ आपलें नांव रामरामपूर्वक घालावें. हेमाडपंताच्या वेळीं जोहारपूर्वक आपलें नांव घालीत असत.

( उ ) (१) शिलेदार, (२) बारगीर नामधारक, (३) हषमलोक मानकरी, (४) सर्व-

शूद्रपरस्परें, (५) किल्लेकरी, हवालदार, कारकून अखंडित पासून मायना काढून थीत रेघ व एक जिल्हा एवढ्यांत मायना आटपीत असत.

( ६ ) श्रीनजीक दोन-रकानी रेघेंत ' राजश्री आडनांव गोसावी यांसि ' येवढा मजकूर घालून, नंतर चौरकानींत स्नेहांकित ह्मणोन मजकूर जमीदार, ठाणेदार वगैरे कनिष्ठ नोकरांना लिहीत.

( ७ ) सामान्य शूद्रांस डावेकडील कागदाचा रकाना एक टाकून तीन रकाने योग्यतेनुरूप लिहीत.

( ८ ) महजर, चकनामे, खरीदपत्रें वगैरे सर्व सरकारी कागद चार रकानी रेघेनें सुरू होत.

६ सरकारी कागद इतक्या प्रकारचे असतः—

१ गांवावर किंवा महालावर मामलतदार किंवा कमावीसदार यांस लेहून देणें ती **सनद.**

२ गांवीं एकमेकांस जामीन घेणें ती **जामीनसाखळी.**

३ ठराव करून लेहून घेणें ती **कबुलात.**

४ मुदत करणें ती **मुदतबंदी.**

५ दरमुदत ऐवज घेणें त्याविषयीं लेहून घेणें ती **हफ्तेबंदी.**

६ करारमाफक तगादा व वरात करणें तो **रोखा.**

७ तगादा मना करणें ती **मनाचिठ्ठी.**

८ पोत्यास ऐवज जमा केला त्याची पावती देणें ती **हुज्जत.**

९ परभारें ऐवज पावला ती **पावती.**

१० अंमल सोडणें त्याबद्दल लेहून देणें ती **सोडचिठ्ठी.**

११ जमीदारापासून अगर कमाविसदारापासून ऐवजाची खातर घेणें ती **निशांचिठ्ठी.**

१२ लावणी करणें अगर वसाहत करणें त्या बाबें रयतेस लेहून देणें तो **कौलनामा.**

१३ दहशतीनें रयत परागंदा जाली ती समजूत करून आणणें तें **अभयपत्र.**

१४ जातीस जामीन मोकदमास घेणें तो **मोकदमजामीनकतबा,** व **जातकतबा.**

१५ अस्मानी ह्मणजे पर्जन्य न पडला अथवा फार लागला व सुलतानी ह्मणजे दंग्यानीं लुटलें, त्याबद्दल सूट देणें तें **माफीपत्र.**

१६ आपण लेहून देणें तें **जातपत्र.**

१७ अमलावरी गेल्यावरी सरकारी जिनसा माजी मामलतदारांपासोन तपासून घेणें तें **मोजदादपत्र.**

१८ सरकत केली तरी **सरकतनामा.**

१९ वादी याणीं खुषीनें लेहून दिला तो **राजीनामा.**

२० हकीकत लिहिली तो **करीना.**

२१ एकमेकांचीं बोलणीं विचारून लिहिणें ती **पुरशिस.**

२२ निरोप घेऊन जाणें तें लेहून देणें तें **नेमोतरपत्र.**

२३ वाद्याचा लेख वाद्यास दाखवून त्याजवरी लेहून घेणें ती **तकरीर.**

२४ वाद न करतां समजुतीस आले तें **समजपत्र.**

२५ तंटा लेहून घेणें तो **मुचलका.**

२६ ज्ञातीनें आंगवण नाहीं सबब भाऊ उभा करणें त्यास लेहून देणें घेणें तो **सामी-लनामा.**

२७ एकदिल सारे होणें त्याचा ठराव करणें तो केला तें **समापत्र.**

२८ कलमाकलमास लबाडी दिसोन आली सबबें या परतें बोलणें नाहीं म्हणोन शेरा लेहून घेणें तें **कुंठितपत्र.**

२९ रुजवातीस खोटा ज़ाला तेव्हां लेहून घेणें तें **खोटपत्र.**

३०।३१ एक वादी भोगवटा करतो, दुसरा फिर्याद आला, सबब लि॥ तें **अमानत पत्र व जप्तीपत्र.**

३२ दर नांव लेहून पुरुषांची मागणें ती **वंशावळ.**

३३ न्यायांत खरा जाला त्यापासोन पैका घेणें त्याचें पत्र तें **हरकीपत्र.**

३४ न्यायी खोटा झाला त्यापासोन द्रव्य घेणें त्याचें पत्र तें **गुन्हेगारीपत्र** किंवा **दंडपत्र.**

३५ जमीदार सामील करून कारकूनकमाविसदारांनीं द्रव्य खादलें त्याजपासोन धणी घेणें, निशा घेणें तें **निशापत्र.**

३६ दाखला लेहून आणणें तें **सडीपत्र.**

३७ पांढरीवरी भोंवरगांव मेळवून पंचामतें इमान करवणें ती **वदणूक.**

३८ सर्वमतें खोटा जाला त्यापासोन लेहून घेणें तें **यजितपत्र.**

३९ दिव्य काढण्यास राजी जाला त्याचे मस्तकीं बोलावयाचें लिहिणें तें **भाळपत्र.**

४० सरकारांत न्याय निवडला तें **निवाडपत्र.**

४१ महालांत पंचाईत जाली तो **महजर.**

४२ वाद्यावाद्याचा कयास निवडून संभाविताचें मत देणें तो **सारांश.**

४३ थळ नेमून दिल्हे, तेथें पंचाईत जाली, तें **थळपत्र.**

४४ आपसांत समजुतीनें वाटे जाले ते **वाटेपत्र.**

४५ रिणकोनाम लेहून घेणें तो **कर्जरोखा.**

४६ महालीं कमाविसदारावरी पैका घेतल्याचा मुद्दा शाबीत करून तुफानदार आला, त्याजपासोन निशा सरकारानें घेऊन कमाविसदार बोलावून आणोन रुजुवात क-रविली; सबब पत्र लेहून घेणें तें **तहकरेपत्र.**

४७ धण्यांनीं रुपेनें दिल्ही जमीन तिचें पत्र घेणें तें **इनामपत्र.**

४८ नजर देऊन इनाम घेणें तें **अर्जीइनाम.**

४९ सनद गमावली नवीन करून घेणें त्यास **हरदूमुसनाजुमला** म्हणून लिहावें.

५० ऐवज कुळाकडून येणें थकला, त्यास तगादा केला, सबब बोलावयास आला, ते-व्हां त्याजपासोन खात्री घेणें ती **जामिनी.** जामिनीला उगवणी ती **भिडेदा-री.** खताखालीं " यासि उगवणीस धणी अमुक " पुढें गुंतवणें तसें लिहिणें.

५१ खत गमावले त्याची **फारखती.**

५२ खरेदी जमीन वगैरे घेतलें तें **खरीदपत्र**
५३ ऐवज देऊन देशावरावरी घेणें ती **हुंडी.**
५४ हुंडी गमावली पुन्हां लेहून घेणें तो **जाब.**
५५ हुंडीवर भरपाई लेहून घेतली, ठिकाणीं हुंडीचा ऐवज पावला न पावला, चौकशी केली तरी दाखवणें, तो **खोका.**
५६ नवा अंमलदार आला, माजी अंमलदारापासोन इनामी वगैरे जाबसाल लेहून आणणें तें **दुमालपत्र.**
५७ हंशील माफ करणें जकातीचें तें **दस्तक.**
५८ लग्नमुंजीचें पत्र तें **कुंकुमपत्र.**
५९ कामगारीवरी रवाना करणें तें **हुकमीपत्र.**
६० मदतीस बोलावणें तें **समलातीपत्र.**
६१ बखेडा जाला त्याविषयीं लिहिणें तें **ताकीदपत्र.**
६२ हुकूम मोडला अगर सालाबाद शिरस्त्याप्रमाणें न वर्तला तरी **मसालापत्र** लिहिणें तो **हुकमीरोखा.**
६३ छत्रपतीचें खुद्दपत्र तें **आज्ञापत्र.**
६४ बक्षिस दिल्हें तें **बक्षिसपत्र** किंवा **बहालपत्र.**
६५ कामावरून काढणें तें **तगीरपत्र.**
६६ वृत्ति नेमून दिली तें **वृत्तिपत्र.**
६७ नव्या अंमलदाराच्या मदतीकरितां दिलीं पत्रें तीं **साहित्यपत्रें.**
६८ सरकारानें कोणता हि जुजबी कायदा किंवा नियम केला तो **तह.**
६९ दोन राज्यांत नेमबंदी जाली तो **तहनामा.**
७० जप्ती करविली ती **जप्तीचिट्ठी.**
७१ सरंजाम दिल्हा तें **सरंजामपत्र.**
७२ कबजा दिल्हा तें **कबजपत्र.**
७३ हाजिरी घेणें तें **हजिरीपत्रक.**
७४ संस्थानिकांनीं हुजूर अर्ज करणें ती **यादी.**
७५ मरणसमयीं लिहिलें तें **मृत्युपत्र.**
७६ जन्मता केलें तें **जन्मटिपण.**
७७ लग्नाचे वेळीं लिहिली ती **लग्नचिट्ठी.**
७८ दरबारास बोलावलें ती **आमंत्रणपत्रिका.**

हे सर्व कागद चाररकानी किंवा पहिल्या दफ्याचें एक अक्षर सोडून लिहीत. वरील नांवांत कित्येक संस्कृत आहेत व कित्येक फारशी आहेत. संस्कृत नांवें हेमाडपंतापासूनचीं आहेत. फारशी नांवें संस्कृताचीं च भाषांतरें आहेत. चकनामा, वतन, वगैरे फारशी नांवानें हि कित्येक संस्कृत नांवाचीं पत्रें लिहिलीं जात.

७ उपरिनिर्दिष्ट ७८ प्रकरणीं सरकारी कागदपत्रें मुसुलमानी अमलांत जशीं लिहिलीं जात तशींच तीं शिवाजीच्या रियासतींत हीं लिहिलीं जात. ह्याशिवाय शिवाजीनें जो लेखनप्रशस्तीचा कायदा केला त्यांत एकंदर सात मुख्य बाबी होत्या. त्या येणेंप्रमाणें:—

१ राजश्रीनीं सर्वांस लिहिण्याचा जाबता राजकीय संप्रदाय धारे

२ अष्टप्रधानादि पदाधिकारी यांचा परस्परें व स्वामीस लिहिण्याचा संप्रदाय

३ लहानथोर मराठे मंडळ यांणीं लिहिण्याचा संप्रदाय

४ यवनीपत्रें लिहावयाची चाल

५ जमीदारी लिहावयाचे संप्रदाय

६ व्यावहारिक सर्व संप्रदाय अहद ब्राह्मण तहद एकंदर चाल

७ जमाखर्च, हिशेबाचे धारे, हेमाडपंती आहेत. शिवाय नवीन ठराविले.

८ लेखनप्रशस्तीचे शिवाजीनें हे सात भाग केले होते. पैकीं प्रथमारंभीं इष्टदेवतांस लिहिण्याची चाल प्रशस्तींत सांगितली आहे. शिवाजीची इष्टदेवता भवानी. तिचें वास्तव्य मूळचें तुळजापुरास व नंतरचें प्रतापगडास. त्या देवतेस लिहितांना खालील मायना शिवाजी योजीत असेः—

श्रीमन्मायामहात्रिपुरसुंदरी–भगवती–अनेककोटि–ब्रह्मांडमंडलजगदुत्पत्तिस्थितिनिलयलीलाविलासिनी–अखिलवृंदारक–स्तुतिसेवापरायणदिग्विदिक्स्वैरक्रीडा–मदीयन्हृत्कमलस्थिता–श्रीमन् तुळजादेवीचरणीं तत्पर.

करवीरच्या श्रीमहालक्ष्मीचा मायना येणेंप्रमाणेंः—

श्रीमत्सकलजगत्रयनिर्मितकर्तुमकर्तुमनेककोटिब्रह्मांड–परिपालितश्रीमन्मायाश्रीमहाकालीमहासरस्वतीश्रीआदिमायाश्रीलक्ष्मीचरणीं तत्पर.

श्रीकाशीविश्वेश्वराचा मायना येणेंप्रमाणेंः—

श्रीमदाद्यशिवनिर्विकारनिर्मत्सरस्वरूपनिर्मलभक्तपरिपालकभक्ताधीनदुर्निवारमनःकल्पितविचारछेदकभवतारकश्रीश्रीश्री चरणीं.

प्रतिवर्षीं व मंगलसमयीं ज्या देवतांना छत्रपतींचीं पत्रें जात त्यांची नांवनिशी.

| | |
|---|---|
| १ श्रीतुकाई तुळजापूर | १४ श्रीगणेश विष्णुपदास ( गयेस ? |
| २ श्रीयमाई आउंद | १५ श्रीवेणीमाधव |
| ३ श्रीदेवी भवानी प्रतापगड | १६ श्रीचंद्रिकेदार |
| ४ श्रीलक्ष्मी करवीर | १७ श्रीरामेश्वर |
| ५ श्रीदेवी माहूर | १८ श्रीमहांकाळ |
| ६ श्रीमल्हारीमार्तंड जेजुरी | १९ श्रीघृष्णेश्वर |
| ७ श्रीदेवी सप्तशृंगी | २० श्रीत्र्यंबकेश्वर |
| ८ श्रीव्यंकटेश गिरी | २१ श्रीनागनाथ |
| ९ श्रीशंभू शिखर शिंगणापूर | २२ श्रीसोरटीसोमनाथ |
| १० श्रीविठोबा पंढरपूर | २३ श्रीवैजनाथ |
| ११ श्रीविश्वेश्वर काशी | २४ श्रीशैलमल्लिकार्जुन |
| १२ श्रीजगन्नाथ | २५ श्रीवोंढ्याजगन्नाथ |
| १३ श्रीद्वारकानाथ | २६ श्रीभीमाशंकर |

२७ श्रीकेदारपर्वती कोल्हापुरानजीक.

कारणपरत्वें इतर देवतांस पत्रें जात.

९ देवतांचे मायने दिल्यावर नंतर **गुरूंस मायने** येणेंप्रमाणें:—

श्रीसद्गुरुमहाराजरामदासस्वामी यांस कागद लिहिणेयाची छत्रपतींची चाल कागद दौलताबादी मदगडी.

बीत रेघ

तीर्थरूप श्री स्वामी वडिलाचे सेवेसी

अपत्य राजे चरणावरी मस्तक ठेवून रुतानेक दंडवत विज्ञापना येथील कुशलवृत्त तागायत माहे पर्यंत स्वामीचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे. विशेष. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

कारभारी निसबत संस्थान यांस बीतरेघ नाहीं.

हरिभक्तपरायण राजश्री केशव गोसावी यांसी प्रति–उपरि–मजकूर–तेरीख–सन–निशाण–बहुत–काय लिहिणें.

## सामान्य कारकून नि॥ संस्थान

राजश्री काशीविश्वनाथ नि॥ संस्थान——यांसी——

राजश्री—उपरि—मजकूर—तेरीख, माहे, सन—बहुत काय लिहिणें. खास दस्तुर.

## संस्थान निगडी

हरिभक्तिपरायण राजश्री रंगनाथबावा गोसावी सं॥ निगडी स्वामीचे सेवेसी:—

राजश्री शिवाजीराजे रुतानेक सां दंडवत विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावे. विशेष. मजकूर. याप्रमाणें पूर्वी संप्रदाय होता. परंतु भगवद्भक्त, स्वामीचे ( रामदास ) पूर्ण अंतरंगांतील, ईश्वरांश ह्मणून चरणरज लिहूं लागले.

## संस्थान वडगांव

हरिभक्तिपरायण राजश्री जयराम गोसावी संस्थान वडगांव स्वामीचे सेवेसी:—

राजश्री उपरि. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. मजकूर. तेरीख, सन. लेखनालंकार.

येणेंप्रमाणें ब्रह्मनाळ वगैरे संस्थानांस लिहिण्याची पद्धत.

असल्या व्यक्तिविषयक मायन्यांचे अलकाब मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १०, पृष्ठ ३ ४।३१८ दिले आहेत ते पहावे.

वि. का. राजवाडे.

# ३ सवाई माधवरावाची जन्मपत्रिका.

ही पत्रिका खेड येथील एका जोश्यांच्या दफ्तरांत निघाली.

श्री.

१ श्रीगणेशायेनमा—जन्म
२ पत्रीका सके १६९६ जये ना
३ म सछरे आधीक वैशाख सु
४ ध ७ सप्तमी सोमवारी
५ श्रीमंत रा नारा
६ येणराउ बळाळ ते तो श्वर्गास
७ कैळासास गेले त्याची श्री
८ गंगाबाई प्रसुत झाली तीस
९ रत्न पुत्र जाला ( ले ) जेन्मनक्षेत्र
१० पुनरवसु घटीका ३२ वे + व
११ घटिका ५४
१२ पुरंधरचे माचीस प्रसुत जाली
१३ जन्मनाम हरदेव
१४ चेरण तिसरा घटी १६ पळें
१५ मेशक्रांत होती
१६ देवगण गुण
१७ जेन्म जाला समये पाहोन लेह
१८ वे पुढें राज्याचा बंदोबस्त व
१९ कारभार कैसा होल ते पहावे
२० गरोधरपणांत मुलुक खरा
२१ ब फार जाला फी(त)व्यामुळें

पत्रिका जशीची तशी बालबोध केली. तींत अक्षरवटिका चुकलेली पदोपदीं आढळेल. तत्कालीन ग्रामजोशी किती अशिक्षित व गांवढळ शुद्धलेखनप्रकरणीं होते तें अस्सल पत्र पहातां कळतें. सवाई माधवरावाचें जन्मनाम हरदेव होतें, ही एक नवीन बाब ह्या लेखावरून कळते.

वि. का. राजवाडे.

## ४ अष्टाधिकार.

पूर्वी नियमानें व आतां क्वचित् संस्थानांतून खालील अधिकार ब्राह्मणांकडे असत व असतात:—

१ ज्योतिष्य
२ उपाधिक
३ ग्रामोपाधिक
४ धर्माधिकार
५ आचारप्रवृत्ति
६ व्यवहार
७ प्रायश्चित्त
८ सर्वाभ्यता

पैकीं व्यवहार व प्रायश्चित्त यांची जागा कायद्यानें घेतल्यामुळें व ब्राह्मणादिवर्गांनीं आचार सोडिल्यामुळें पहिले तीन अधिकार मात्र वृत्तिरूपानें असलेले सध्यां इंग्रजशाहींत दिसतात.

वि. का. राजवाडे.

---

## ५ शिवाजीमहाराजानीं रामदासांना राज्य अर्पण कां केलें?

यदि स्वर्गे परं स्थानं धर्मतः परिमार्गसि ।
यत्किंचिज्जयसे भूमिं ब्राह्मणाय निवेदय ॥ १६ ॥

( भारत–शांतिपर्व–अध्याय ७२ )

ह्या श्लोकांत उपदेशिलेलें धर्मतत्व शिवाजीच्या मनांत भारतादि इतिहासांच्या श्रवणानें ठसलेलें असल्यामुळें, त्यांनीं सद्ब्राह्मण जे रामदास त्यांना बाहुबलोपार्जित राज्य अर्पण केलें. व रामदासानीं शिवाजीला तें पुनः परत केलें.

वि. का. राजवाडे.

---

## ६ संभाजीचा एक शिक्का.

शिवाजीचा पुत्र संभाजी याचा खालील शिक्का एका वृद्धाच्या तोंडून ऐकिला:—

श्रीमच्छिवभवस्युद्रेकादधिगतधरणीसमस्तसा-
म्राज्य–॥ शंभोः छत्रपतेर्मुद्रा मोदप्रदा जयति ॥ १ ॥

वि. का. राजवाडे.

---

## ७ कोंडभट सनकाडे.

कोंडभट सनकांडे हा शिवाजीमहाराजांच्या मुतबखान्यांत पाणक्या होता. ऋग्वेदी ब्राह्मण. एकदां महाराज तुकोबाच्या कीर्तनास देहूस आले. तेथें एक ब्राह्मण वेदशास्त्रशून्य असा तुकोबापाशीं व्युत्पत्ति शिकण्याकरितां आला. त्याला काशीस दृष्टांत झाला होता कीं, देहूस तुकारामापाशीं जाऊन व्युत्पत्ति शिकावी. ब्राह्मण देहूस येऊन पहातो तों कुणबटी उच्चार करणारे तुकोब्बा दिसले. हा कुणबट आपल्याला व्युत्पत्ति कसली शिकविणार, असा विचार करून, ब्राह्मण तुकोबानें केलेले व्युत्पत्तीचे अभंग उपेक्षिता झाला. ते अभंग शिवाजीचा पाणक्या जो कोंडभट सनकाडे यानें परम भाविकपणें खुद्द तुकोबारायांच्या हातून घेतले. ती मिति कार्तिक वद्य दशमी होती. तोच कोंडभटाचा उपदेश घेतल्याचा दिवस. उपदेश घेतल्यानंतर कोंडभट गुरूच्या प्रसादानें व कृपेनें चांगले व्युत्पन्न झाले व पुराण सांगूं लागले. तेव्हांपासून त्यांचें आडनांव पुराणिक पडलें. तें त्यांच्या वंशजांत अद्याप चालूं आहे. कोंडभटाचे सध्यांचे वंशज गणेशभट पुराणिक शेलपिंपळगांव येथें राहतात. त्यांनीं ही कथा सांगितली. गणेशभट अंध असून वेद पढलेले आहेत.

वि. का. राजवाडे.

---

## ८ नामा पाठक केंदुरकर.

केंदूर, ता० खेड, जि० पुणें, येथें कान्हो पाठक–ज्ञानेश्वरसमकालीन–यांची समाधि आहे. कान्हो पाठकाचे पुत्र हरि पाठक व हरि पाठकाचे नामा पाठक. नामा पाठकानें अश्वमेध मराठींत लिहिलेला प्रसिद्ध आहे. पाठकाचें सबंद आडनांव राजपाठक. हे राजपाठक चाकणच्या कोण्या मांडलिक राजाचे ज्योतिषी होते. हा चाकणचा राजा देवगिरीच्या जाधवांचा मांडलिक होता. सध्यां केंदूरकर पाठकांपाशीं कान्हो पाठकाचे हस्तलेख बिलकुल नाहींत. नामा पाठक शक १३०० च्या सुमारास झाला असावा, कारण शक १२१२ त असलेल्या कान्हो पाठकाचा तो नातु होता.

वि. का. राजवाडे.

---

## ९ पळशीकर.

महीपतिबोवा ताहराबादकर यांचें आडनांव कामळे. होळकरांचे दिवाण जे पळशीकर त्यांचें आडनांव कामळे, व ते महीपतिबोवांच्या च वंशांतील.

वि. का. राजवाडे.

---

## १० नाना फडणिसासंबंधीं आर्या.

( कवि नाना फडणिसाच्या प्रतिपक्षांतील दिसतो. ऐतिहासिक उल्लेख स्पष्ट आहेत. आर्या म्हसवडप्रांतीं सांपडल्या. )

माहा प्रतापी नाना ईश्वर देतो अयुष्य हाडातें ॥
पूर्ण कृपा विष्णूची आले पाहूनिया महाडातें ॥ १ ॥
अधिक तप नानाचें ब्राह्मणपणाला दुजा न साजावा ॥
सेवट तोही चकला जाग्यावर बंधुच्या कसा जावा ? ॥ २ ॥
बहिरोपंत मेंधळे हाति न लागे प्रयत्न केल्यानें ॥
नानाचे चेल्यानें घर-लाशा पुजिजेत ( धरला वा पूजिपंत ?) लेल्यानें ॥ ३ ॥
वर खालीं तप्त तवे सिवाय मग योजि चाप कानाला ॥
रग लावि दो कानाला कीं जाइ यमाजिचे ठिकाणाला ॥ ४ ॥
या पंतप्रतिनिधिचा अजिक्य किल्ला आहे तो वासोटा ॥
नलगे शस्त्र नि सोटा लघविस फेडों न दे च कासोटा ॥ ५ ॥

वि. का. राजवाडे.

---

## ११ जोशी, पाध्ये व नानासाहेब पेशवे.

( रा. सा. काशीनाथ नारायण साने, बी. ए. )

१. पाध्ये यांचें म्हणणें:—तर्फ संगमेश्वर व तर्फ कोंडिवरें, तालुके रत्नागिरी, येथील ७२ गांवची ज्योतिषी, धर्माधिकरण, इत्यादि अष्टाधिकार यांची वृत्ति फार पुरातन काळापासून गोळविली येथील पाध्यांकडे होती. पण पाध्ये यांचे गुमास्ते कृष्ण जोशी संगमेश्वरकर हे पेशव्यांचे आप्त असल्यामुळें, त्यांनीं पेशव्यांचे जोरावर ती वृत्ति आपली म्हणून वाद उपस्थित केला. त्या वादाचा निकाल शके १६८० पौष वद्य १ या दिवशीं होऊन सनदा जोशी यांस मिळाल्या.

जोशी यांचें ह्मणणें:– " सदरहु वृत्ति समस्त संगमेश्वरकर जोशी यांची. तिचा काशी पाध्ये यांनीं अपहार केला होता. त्याची मनसुब्री सरकारांत पडून फडशा होऊन गोळवलकर खोटे जाहले, आणि श्री. कै. माधवराव बल्लाळ प्रधान यांचे कारकीर्दीस, मिरजेचे मुक्कामीं, शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरीं कै. त्रिंबक राम जोशी सिद्धांती यांनीं निवाडपत्रें करून घेतलीं " असें, जोशी यांची एक फारखत आहे, तींत म्हटलें आहे.

२. ह्या दोन्ही पक्षांपैकीं खरा कोणता हें ज्यांत ठरविलें आहे तें निवाडपत्र तूर्त उपल-

---

१. पाध्यांचें म्हणणें रा. रा. पांगारकरकृत मोरोपंतांचें चरित्र याजवरून दिलें आहे. २. फारखतीचा उतारा येणेंप्रमाणें:–

### श्रीलक्ष्मीनरसिंह.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री बाळशास्त्री बिन राम जोशी ज्योतिषी सणगरे संगमेश्वरकर यांसी प्रती भीमजोशी व वामन जोशी बिन नरजोशी सिद्धांती सां नमस्कार विनंति वि॥ तर्फ संग-

[ ७४ पृष्ठ पहा. ]

ब्ध नाहीं. तें उपलब्ध असतें तर दोन्ही पक्षांकडून पुरावा कसकसा झाला, जोशी यांचे तर्फे निवाडा करण्यास कोणत्या गोष्टी अनुकूल होत्या व कोणत्या गोष्टी पाध्ये यांस प्रतिकूल जाहल्या, तें सर्व स्पष्ट समजलें असतें. पण वरील निवाडपत्राच्या अभावीं इतिहास व इतर कागद्पत्र उपलब्ध आहेत त्याजवरून काय निष्पन्न होतें तें पाहणें प्राप्त आहे.

३. पाध्ये वादांत हरल्यावर ते पंढरपुरीं राहण्यास गेले व तेथें त्यांनीं आपल्या वादाच्या हकीकतीची बखर लिहिली. ती बखर उपलब्ध असून रा. रा. लक्ष्मणराव पांगारकर यांस पाहण्यासही मिळाली होती, व जोशी यांची उपरिनिर्दिष्ट फारखत झाली, तिची नक्कल रा. ब. बापू पुरुषोत्तम जोशी टोंकेकर यांजपाशीं आहे, ती पाहण्यास मिळत आहे.

ह्या दोन्ही कागदांत एक पक्ष दुसऱ्यानें सदरहु वृत्तीचा अपहार केल्याचें म्हणत आहे. तेव्हां नुसतें असें ह्मणणें ग्राह्य समजतां येत नाहीं.

४. पाध्ये ह्मणतात, जोशी हे पेशव्यांचे आप्त होते; परंतु तसा पुरावा सांप्रत उपलब्ध नाहीं. चासकर जोशी व बारामतकर जोशी ह्यांशीं पेशव्यांची सोयरीक होती, ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे; पण संगमेश्वरकर जोशी यांशीं पेशव्यांच्या आप्तपणाचा उल्लेख इतिहासांत आढळत नाहीं. पाध्ये यांनींही तो सिद्ध केला नाहीं. उलट रा. ब. बापू पुरुषोत्तम जोशी सांगतात कीं, संगमेश्वरकर जोशांचा व पेशव्यांचे घराण्याचा आप्तपणा बिलकुल नव्हता; तेव्हां पाध्ये यांचें म्हणणें साधार आहे असें मानतां येत नाहीं.

५. पाध्ये यांचें ह्मणणें कीं, ह्या वादांत रामशास्त्री माहुलीकर देशस्थ पंडित यांनींही कृष्ण जोशी यांचा अगत्यवाद धरिला आणि पेशव्यांनीं दिलेलें पत्र पाध्यांनीं नाकारिलें व पंचद्रविडांसमक्ष न्याय बोलूं असें पाध्ये बोलले. तें पेशव्यांनीं कबूल करून दोन्ही पक्षांकडून जामीन घेतले. पण, पाध्ये म्हणतात, " कृष्ण जोशी यानें पाध्यांचा जामीन नय घालून फोडिला. व लक्ष्मण भट सप्रे पाध्यांनीं देऊं केले ते वितंडवादी ह्मणून पेशव्यांनीं नाकारिले. " नंतर " जोशी यांचे पक्षपाती रामशास्त्री यांस पंचांत घालतां, तर बाळशास्त्री तेलंग यांसही घाला, " असें पाध्ये म्हणूं लागले. तेंही पेशव्यांनीं कबूल केलें. पण पाध्यांच्या मतें ह्या पंचांत पक्षपात होऊं लागला; तेव्हां " पांच जातींचे पांच पंच व पांच इतर सभ्य व पेशवे बसून न्याय करावा, असें ते म्हणजे पाध्ये पुनः बोलूं लागले. तेंही त्यांच्या बखरीवरून पेशव्यांनीं कबूल केलेंसें दिसतें. परंतु पाध्ये पुनश्च ह्मणतात, " कित्येक निःपक्षपाती पंच उपरत जाहले, बहिरव जोशी पंच यांनीं पेशव्यांचें चित्त पाध्यांविषयीं इतराज केलें " व पेशव्यांनीं पाध्यांच्या सेवकास कोंकणांत बांधून, मारून कागद्पत्रांसाठीं बहुत त्रास दिला.

---

[ ७२ पृष्ठावरून समाप्त. ]

मेश्वर व तर्फ कोढिवरें ता॥ रत्नागिरी देहे कसबे मु॥ ७२ येथील ज्योतिषी व धर्माधिकरण व पुराण व देशोपाध्येपण अष्टाधिकारवृत्ती पुरातन आपल्या समस्त संगमेश्वरकर जोशांच्या परंतु मध्यें काशी पाध्ये गोळवलकर यांणीं अपहार केला होता त्याची मनसुबी सरकारांत पडून फडशा होऊन गोळवलकर खोटे झाले. त्यांचीं निवाडपत्रें श्रीमंत कैलासवासी माधवराव बल्लाळ प्रधान यांचे कारकीर्दींत मिरजेचे मुक्कामीं शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरीं ती॥ कैलासवासी त्रिंबक राम जोशी सिद्धांती यांणीं करून घेतलीं. इ. इ. इ. फारखतीची मित्ती शके १७२८ क्षयनाम संवत्सरे कार्तिक व॥ ४ मंदवार.

याजकरितां पाध्ये पुनः ह्मणूं लागले, " परोक्ष साक्षी आम्ही मानीत नाहीं. उभयतां वादींस श्रीकृष्णेंत घालावें, व त्या प्रांतींचे लोकांस सत्वपूर्वक विचारून खरा वादी असेल त्यास हातीं धरावयास सांगावें. " अशी प्रांतस्थांस अपील करण्याची सूचना पाध्यांनीं केली; पण ती अमलांत आली कीं नाहीं तें समजत नाहीं. बहुधा ती अमलांत आली नसावी, असें दिसतें. तथापि पेशवे यांनीं पत्रें दाखवा असें पाध्यांस ह्मटलें असतां, " दरबारांत पत्रें काढल्यावर तुम्ही अपहार करणार, " असा पाध्यांनीं आक्षेप घेतला ! तेव्हां बाळकृष्ण शास्त्री यांस पत्रें पहावीं म्हणून पेशव्यांनीं सांगितलें. " त्यांची निशा झाल्यावर ते पाध्यांचे पक्षपाती अशी जोशी यांनीं घालमेल करून ती गोष्ट राहविली व शेवटीं बहिरव जोशी वगैरे यांनीं वतन जोशी यांचेंच खरें असा निर्णय, जोशी यांचा लिखितभुक्त साक्ष दाखला किमपी नसतां, केला. " व शके १६८० " पौष वद्य १ रविवारीं सनदा जोशी यांचे स्वाधीन केल्या, " असें पाध्ये लिहितात.

६. वरील बहुतेक सर्व हकीकत पाध्ये यांच्या तर्फेनेंच पुढें आलेली आहे. (पांगारकरकृत मोरोपंत यांचें चरित्र पृष्ठें १०७–११० पहा.) ह्या लिहिण्यास पुरावा वगैरे पुढें आलेला नाहीं. संगमेश्वरकर जोशी पेशव्यांचे आप्त नव्हते, आणि ते तसे असते तरी न्यायाच्या ह्या कामांत पेशव्यांनीं तरफदारी केली किंवा न्यायाच्या इतर कामांत पेशवे तरफदारी करीत असत, अशाबद्दल कोठें उल्लेखही नाहीं. उलट ह्या मुकदम्यांत पाध्ये म्हणत गेले त्याप्रमाणें त्यांस पेशव्यांनीं पंच अनेकदां बदलून दिले; तथापि पाध्ये कशासही कबूल होतना. कागदपत्र दाखवा म्हणतां " तुम्ही अपहार कराल " असें ते खुद्द पेशव्यांस साफ सांगतात ! रामशास्त्री माहुलीकर देशस्थ पंडित न्यायाधीश होते, त्यांची निस्पृहता सर्वत्र प्रसिद्ध आहे; पण त्यांसही पाध्यांनीं पक्षपाती ठरविलें. निवाडपत्रें जर थोरले माधवरावांचे वेळीं झालीं असें मानिलें तर त्या माधवरावानें—त्या न्यायप्रिय पेशव्यानें ही—अन्यायच केला असें म्हणावें लागतें ! सारांश, इहलोकींच्या सर्व न्यायदेवता जोशांचा पक्षपात करून पाध्यांविरुद्ध झाल्या ! नानासाहेब पक्षपाती, माधवराव पक्षपाती, रामशास्त्री देशस्थ पंडित पक्षपाती, बाळशास्त्री तेलंग हे देखील पक्षपाती, पंच द्रविड न्यायकर्ते ही पक्षपाती, असें कसें व्हावें ? असें काय गुळखोबरें जोशी यांनीं ह्या पंचांस, न्यायाधिशास व सत्ताधिशांस देऊं केलें होतें कीं, त्यामुळें त्या सर्वांनीं जोशी यांचा पक्षपात करावा ? असें कांहीं देऊं केलें असल्यास त्याचा पुरावा कोठें आहे ? फक्त जोशी हे पेशव्यांचे आप्त होते असें पाध्यांचें म्हणणें, पण त्यासही कांहीं आधार नाहीं; आणि आप्त होते असें क्षणभर मानिलें तथापि न्यायाच्या कामांत, न्यायाधीश, पंच व सत्ताधीश हे सर्व सत्याची, धर्माची, न्यायाची व अब्रूची चाड सोडून पक्षपात करतील, हें संभवत नाहीं. ह्यावरून पाध्यांचें म्हणणें ग्राह्य ठरत नाहीं; व ज्यापक्षीं तेव्हांच्या उच्चतम न्यायाधिशानें किंवा उच्चतम पंचमंडळानें म्हणजे त्या काळच्या हायकोर्टानें जोशी यांस निवाडपत्र दिलें, त्यापक्षीं त्या निवाडपत्राच्या प्रामाणिकतेविषयीं संशय घेण्यास बिलकुल जागा नाहीं, असें मानणें ओघानेंच प्राप्त होतें. आणि नेहमीं तडजोडीनें कामें पार पाडणाऱ्या व विद्वान्

ब्राह्मणांस विपुल दक्षिणारूप आश्रय देऊन "थोर धर्मात्मा" असा लौकिक करून घेणाऱ्या नानासाहेब पेशव्यांवर जो पक्षपाताचा आरोप पाध्यांच्यातर्फे करण्यांत येत आहे, त्यास बिलकुल आधार नाहीं, असें म्हणावें लागतें. उलट पाध्यांच्या म्हणण्याप्रमाणें नानासाहेबांनीं न्यायाधीश व पंच वारंवार बदलून दिले आणि पाध्यांच्या क्रोधावेशाच्या प्रत्येक प्रसंगीं तितिक्षापूर्वक गम खाल्ली, यावरून त्या सत्ताधीशाचें उत्कृष्ट सौजन्य आणि न्याय करण्याविषयींची त्याची अत्यंत कळकळ, हीं मात्र चांगलीं निदर्शनास येतात.

७. पंचांनीं निवाडपत्र जोशी यांस दिलें असें दोन्ही पक्षांचें म्हणणें आहेच; तें अस्सल निवाडपत्र अगर त्याची नक्कल मिळाल्यास ह्या वादाचा निकाल स्पष्ट होईल. तथापि आज उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून ही पेशव्यांना ह्या वादांत पक्षपात करण्यास कांहीं कारण नव्हतें असेंच दिसून येतें.

---

## १२ एक ऐतिहासिक सांकेतिक पत्र.

[ खालीं दिलेलें पत्र महेश्वराहून कोणी एकानें माधव गंगाधर चंद्रचूड यांस लिहिलें आहे. पुण्यशील अहल्याबाई व तुकोजीबावा यांमध्यें कांहीं लढा पडला होता, त्याचा संबंध या पत्रांत आहे. मराठेशाहींतील सांकेतिक भाषेचा हा एक ऐतिहासिक मासला आहे. चंद्रचूडांच्या संग्रहांत हें पत्र सांपडलें.

सदर सांकेतिक भाषेची गुरुकिल्ली खालीं दिली आहे. सदरील पत्रांत हल्लींप्रमाणें शुद्धलेखन नाहीं. रेफ मात्र नेहमींचे आहेत. ]

### श्रीरामजी.

डिसंसी क्षगटी. झेहीठ जमधुट तडीत्सटे ईपोकट चादंछरातजापजे टीथुस गालडिठा. स्झा क्षुगट जंपद्डाटी स्टीसीझ गृथटी जाडती ड वसद् ड ळांमीचा झांती चोठपे घांट माठे. स्झासीठ ईहै गाथसा जाडतीसी झेहीठ तांपीसस्झानेटीम अंळुटधटांत झेषू—झा—डीढी बीली ठीथीटी. स्झाडटुस से झेसास ईते तजमठे. सेडूथा स्झामठा सीटेक धडाटझावी चाधी लेडींठी साथा. ईषी सेबतजअ क्षछझसांत सीटोग ळीस्था धीं झुज्थी मांक्षस स्झांमठा ताध तांपाडे धीं झुज्थाधवुस छेरीबी टीस टाथीटी साथी. क्षा क्षगटी छेरपे ईह्डा चोठपे से गारीठचाडा ळटज्झास ईतस्झानेटीम् धांथी फवस साथी. स्झांसी झेहे

---

१. रा. रा. वि. का. राजवाडे यांचीं मराठ्यांच्या इतिहासांचीं साधनें—खंड ६ वा—पुरंधऱ्यांची स्मरणाची यादी–पृष्ठ ९३–९४, येथें नोंद आहे तीः–"शुद्ध ८ (श्रावण शके १६७५) सोमवारीं पुणियांत ब्राह्मणांस दक्षणा द्यावयाचा आरंभ केला. पांचां ठायीं दक्षणा द्यावयास द्वारें केलीं. दक्षणा फार फार दिल्या. बारा तेरा लाख रुपये वांटिले. खबूतरखानियांत भिकारभणंग यांस देकार देविला. अटरापगड जातींतून जो घ्यावयास गेला त्याजला देकार दिल्हा. रमणियांत रात्रीं दिवट्या लाविल्या. ब्राह्मणांवर उजेड पाडिला. दुसरे दिवशीं मंगळवारीं रात्रीं अडीच प्रहर रात्र झाली ते समयीं ब्राह्मण सरले. मग सुटले. चौदा प्रहर दक्षणा वांटिली. मोठा धर्म झाला. पन्नास साठी हजार ब्राह्मण हलला. सत्तर हजारपर्यंत गणती आली. नाना धर्मात्मा थोर ! ऐसा कोणी जाला नाहींसा दिसतें. १".

झेक्ष सझे. ळेती माडझाबे ईतस्तात सुजचे डीबाटात झेअट सैते धटषे. झागृजाषे चो-टुस डीवे ळीस्थें. तंकृझाधादी गटढटाजखाअध ईठे. स्झांची पांल फाठुफ चोठषे माटे. सीधवीढ़ नासटमजेचे ईहै तांपीसठे. स्झाडटुस तंसोण थोक्षख क्षसट धेटे धी सुर्स च धुच धटु सझे. थे क्षछझसा माक्षख गोथाचस्झाडट स्झांचा डियाट धाझ थोसो थे तजनस्झा-खंसट जापुस चीली गालक्षं. स्झागृजाषे धटाडे, ईते चोठषृ-झांस ईठे. गारीठचाडाने-टीम धांथी धर्सड्झ खाथी था नंचीट गुर्ता ईये. था ईहै ईगष खीडेळख थटाडा. .जा-पाथुस ईवदृठ सैते ठीथुस गालक्ष. ताटांढ, झेहीठ ठऊ तडें गृधाटे गारीठचाडाडट ईये. स्झांखी झा गृतंपी मगुस धैठातडाती तुछेळाटाचे धीझेत क्षचीस से खिळर्देखात ईपुस ळान-डाडे. सेहुसथी चासजी टानुस मता गृतंप ईवदृठ सती सझाटी ईतो ळ्-झाडी झेह थी चासजी झेअट सैती ठीथुस गालक्ष. टडाखा धार्सीध ढुक गंचजी चुकडाट गृहाः धाद् थैखजस्धाट.

पाो छ ४ जिल्काद मु॥ उज्यन.

## किल्ली.

मराठींत ३६ व्यंजनांपैकीं ङ, ञ, क्ष व ज्ञ हीं चार वगळून बाकी जीं ३२ उरतात, त्यांचे बरोबर दोन भाग केले ह्मणजे क=ध, ख=न व उलट ध=क, न=ख असा संकेत उघड दिसून येतो. मिताक्षरीहून हा संकेत पुष्कळ सोपा असल्यामुळें त्याची गुरुकिल्ली पुष्कळांस सहज सांपडेल. मूळ सांकेतिक पत्र मोडींत लिहिलेलें असल्यामुळें त्यांत ऱ्हस्व-दीर्घ, किंवा आधुनिक शुद्धलेखनाचे नियम पाळलेले नाहींत हें खालील तर्जुम्यावरून दिसून येईलच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ = इ | छ = भ | ण = ष | ब = च | ष = ण |
| इ = अ | ज = म | त = स | भ = छ | स = त |
| क = ध | झ = य | थ = ह | म = ज | ह = थ |
| ख = न | ञ = | द = ळ | य = झ | ळ = द |
| ग = प | ट = र | ध = क | र = ट | क्ष = उ |
| घ = फ | ठ = ल | न = ख | ल = ठ | ज्ञ = |
| ङ = | ड = व | प = ग | व = ड | |
| च = ब | ढ = श | फ = घ | श = ढ | |

## श्रीरामजी.

विनंती उपरी येथील मजकूर सविस्तरे अगोधर बाळंभटासमागमें लीहून पाठविला त्या उपर मंगळवारी तृतीय प्रहरी मावसी डफळ व दाजीबा यांसी बोलणे फार जाले. त्यातील अर्थ पाहता मावसोनी येथील सांगीतल्याखेरीज इंदूरकरास येण्यावीशी चीठी लीहीली. त्यावरून ते येतात आसे समजले तेव्हां यांजला नीशेध करावयाची बाकी ठेविली नाहीं. आणी तेच ( समइ ? ) उभयतास नीरोप दिल्हा कीं तुह्मी जाऊन त्याजला साफ सांगावे कीं तुह्माकडून भेटीची रीत राहीली नाहीं, याउपरी भेटणे अथवा बोलणे तें पाटील-बावा दरम्यान अल्याखेरीज कांहीं घडत नाहीं त्यानी येथे येऊ नये देसी जावयाचे अस-ल्यास तुमचे विचारास येईल तैसे करणे. याप्रमाणें बोलून वीडे दील्हे. संध्याकाळीं परशराम नाइक अले. त्यांची गाठ घालुन बोलणे जाले. तीकडील खातरजमेचे अर्थ

सांगीतले. त्यावरून संतोष होऊन उतर केले की तुर्तच कुच करु नये हे उभयता. जाउन पोहोचल्यावर त्यांचा विचार काय होतो हें समजल्यानंतर मागून चीठी पाठउ त्याप्रमाणें करावे, असे बोलण्यांत अले. पाटीलबावाखेरीज काही कर्तव्य नाहीं. हा संबीर पुर्ता आहे. हा अर्थ अपण नीवेदन करावा. मागाहून अडळल तैसे लीहुन पाठऊ. सारांश, येथील लक्ष सर्व प्रकारे पाटीलबावावर अहे. त्यांनी या प्रसंगी जपुन कैलासवासी सुभेदाराचे कीयेस उचीत ते निदर्शनास अणुन दाखवावे. तेथुही बातमी राखुन जसा प्रसंग अडळल तसी तयारी असों द्यावि येथेही बातमी येईल तैसी लीहून पाठउ. रवाना कार्तीक शुध पंचमी बुधवार प्राथःकाळ हे नमस्कार.

पाो छ ४ जिल्काद मु॥ उज्यन.

चि. गं. भानू.

---

## १३ एक मानभावी सांकेतिक लिपी.

हा सांकेतिक मजकूर फलज्योतिषासंबंधाचा असून त्यांतील विसर्ग पूर्णविरामार्थी आहेत.

### सांकेतिक लेख.

| | | | |
|---|---|---|---|
| मयण | चाहिगा | घेळा | प्काञि |
| हञच | अेंवा | याधिबेटि | वेळलागें |
| ञोवार्घे : | मञ | सागी॰ ां | मन्क |
| वागीबे : | घिमञ | सागी॰ ां | अेव |
| याधीबे : | ञल | च्अम्णु | चाहिबे : |

उत्तर येणेंप्रमाणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| सकून | पाहिला | वेळा | च्यारि |
| हमप | रेघां | काढिजेति | घेळगाले |
| मोजावें : | सम | आली॰ ां | सण्य |
| घालीजे : | विसम | आली॰ ां | रेघ |
| काढीजे | मग | प्रस्तु | पाहिजे : |

किल्ली.

| | |
|---|---|
| सा — आ | ञ — म |
| क — य | ट — त |
| अ — र | ठ — थ |
| ग — ल | ड — द |
| घ — व | ढ — ध |
| च — प | ण — न |
| छ — फ | म — स |
| ज — ब | ह — ह |
| झ — भ | ळ — ळ |

बाराखडींत अक्षरांखालीं शून्य दीर्घ उकारार्थी आहे. बाराखडींतील अकार, आकार, इकार, ईकार, उकार, एकार, ओकार व अनुनासिक प्रचारांतल्याप्रमाणें. म–स्थानीं ञ आदेश होतो; परंतु ञ–स्थानीं म–आदेश होत नाहीं; कारण ञकारी शब्द मराठींत नाहींत. स–स्थानीं म आदेश होतो; परंतु म–स्थानीं स–आदेश होत नाहीं; कारण ञकार तें कार्य करतो. ह व ळ यांना आदेश नाहींत. या सांकेतिक वाक्यांत हनुमानशकुनवंति आहे; परंतु तिचें उद्घाटण करण्याचें येथें कारण नाहीं. या संकेतांत व अशाच इतर संकेतांत मानभावांचे गुप्त ग्रंथ लिहिलेले असतात. या लेखांतील भाषा कुणबाऊ मानभावी आहे.

वि. का. राजवाडे.

---

## १४ एक ऐतिहासिक महत्वाची सनद.







**स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३६ विरोधी नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध दसमी भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं राजश्री विठल गोपाल देशाधिकारी व कारकून वर्तमान व भावी प्रांत जावली यांस आज्ञा केली ऐसीजेः वेदमूर्ती शामभट बिन रामभट श्रीमाभळेस्वरकर सूर्यउपासनी यांणीं हुजूर येऊन विदित केलें कीं, थोरले कैलासवासी स्वामी यांणीं गोपालभट, आपले आजे, यांजपासून मंत्र उपदेश संपादिला ते समयीं वर्षासन सुभे मजकूर पैकीं करून दिलें आहे बिं॥**

**होन पादशाही १००. गला नवशेरी बारुळ मापें**

| **वजनी टं॥[2] मण** | **खंडी** |
|---|---|
| ०।४ तूप | ४ तांदूळ |
| ०।४ तेल | ४ नागली |
| ०।॥३ | ८ |

**येणेंप्रमाणें होन एकशें व गला खंडी आठ वजन टकेबंदी अठरा मण थोरले[3] कैलासवासी यांचे कारकीर्दीपासून ............... (** अक्षरें उमटत

---

१. बितपशील. २. टकबंदी. ३. थोरले महाराज, शिवाजीमहाराज.

नाहींत.) श्रीशिवाजीराजे यांजपासून सदरहू प्रों भोगवटा चालत आला आहे. परंतु आपणाजवळ पुर्वीळ पत्रें होतीं तीं घरामध्यें जळालीं. याकारितां स्वामींनीं सदरहू वर्षासन भोगवटियाप्रों नूतन पत्र देऊन चालवावयाची आज्ञा केली पाहिजे. त्यावरून हे थोर भळे अनुष्ठाते ब्राह्मण यांस स्वामींनीं आज्ञा केली कीं, तुह्मी सुभां जाऊन आपले वर्षासनाचे मोइनीची सुभेदारीची बखेर घेऊन येणें, त्यावरून शामभट बिन रामभट सदरहू संभर होन पाौ व गला नौ॥ बारुळे खंडी ८ आठ वजन टकबंदी अठरा मणप्रों भोगवटा पूर्वापर चालत आहे ह्मणोन सुभांची बखेर आणिली. त्यावरून स्वामींनीं मनास आणून पहिलें चालत आल्याप्रों चालवावयाची आज्ञा करून हें तुम्हांस आज्ञापत्र सादर केलें असे, तरि सदरहू मोईनप्रों पूर्वींपासून चालत आलें असेल तें मनास आणून पुढेंही शामभट यांस व त्यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें बिलाकुसुर चालवणें. या पत्राची प्रती घेऊन असल पत्र भट गोसावी यांजवळ भोगवटियास परतून देणें जाणिजे. लेखनालंकार.

| मर्यादेयं |
|---|
| राजते. |

१. ही सनद श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथें पाहण्यास मिळाली. तींत कांहीं फेरफार न करितां जशीच्या तशीच वर दिली आहे. ती सांप्रतचे वे० शा० संपन्न मोर दीक्षित बिन नारायण दीक्षित महाबळेश्वरकर यांच्या पूर्वजांस श्रीशाहू छत्रपति याणीं राज्याभिषेक शके ३६ ह्मणजे इ० स० १७१० मध्यें दिली.

२. वरील सनद घेणारे वे० शामभटजी यांचे आजे गोपाळभट याणीं श्रीशिवाजी राजे यांस मंत्रोपदेश दिला. हा मंत्रोपदेश बहुधा श्रीरामदासांनीं दिलेल्या मंत्रोपदेशाच्या पूर्वीं दिलेला असावा; कारण, श्रीरामदासांचा मंत्रोपदेश झाल्यावर, ते राजगुरु झाल्यानें, दुसरा मंत्रोपदेश घेण्याची अवश्यकता नव्हती. गोपाळभटांचा उपदेश इ० स० १६५५ ते १६५९ च्या दरम्यान, ह्मणजे जेव्हां महाराज श्रीमहाबळेश्वराच्या डोंगराच्या आसपास जावळी, प्रतापगड, जोरखोरें वगैरे ठिकाणीं वावरत होते तेव्हां झाला असावा, असें चांगलें अनुमान होतें.

३. वरील सनदेवरून त्या काळीं गुरुदक्षिणा ( वर्षासन ) कोणत्या रूपाची मिळत असे तें दिसून येईल. ह्या गुरुदक्षिणेंत भूमिदान नाहीं. चंद्रराव मोरे यांजपासून जावळीचें राज्य इ० स० १६५५ मध्यें घेतलें, त्या वेळीं शिवराजाचा मुलूखही लहानच होता.

१. ठरीव रक्कम, वर्षासन. २. फारसी खबीर या शब्दाचें अपभ्रष्ट रूप. = माहिती, शोध. ३. पादशाही. ४. नवशेरी. ५. निःसंदेह, बिनदिक्कत.

४. सनदेवर पंतप्रधान यांचा व पंतप्रतिनिधि यांचा असे दोन शिक्के आहेत. त्या वेळीं पंतप्रधान भैरवपंत ( बहिरोपंत ) पिंगळे असून त्यांच्या शिक्क्यांत " श्रीशिवनरपति " असें महाराजांचें नांव आहे, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. प्रतिनिधीच्या शिक्क्यांत " श्रीशाहूछत्रपति " असें महाराजांचें नांव दिलें आहे. यावरून शाहूचें नांव प्रथम ' शिव ' असें होतें व मागाहून ' शाहू ' असें पडलें असा मजकूर बखरींतून लिहिलेला आढळतो तो सप्रमाण आहे असें ठरतें. शिवासच पुढें शाहू ह्मणूं लागले ही बखरकारांची कल्पनासृष्टि होय; राजाचें नांव शाहाजी, शाहुजी, शाहू असेंच होतें; " शिवाजी चोर, शिवाजी साऊ " वगैरे मजकूर केवळ गप्पा होत असें अलीकडे जे कांहीं इतिहाससंशोधक प्रतिपादितात, त्यांस ह्या सनदेवरील शिक्के चांगलें उत्तर देतील. शाहाजी किंवा शाहू हेंच प्रथमपासून त्या शंभुपुत्राचें ( संभाजीच्या मुलाचें ) नांव असतें तर ' श्रीशिवनरपति ' असें पेशवे आपल्या शिक्क्यांत कोरतेना. तेव्हां शिव हें नांव मूळचें व पुढें शाहू हें टोपण नांव प्राप्त झालें, आणि तेंच पुढें प्रचारांत आलें, असें स्पष्ट दिसतें.

५. सनदेचे मूळ संपादक वे० गोपाळभटजी ह्यांच्या वंशजांकडे हें वर्षासन रूपांतरानें ह्मणजे रोख रुपयांच्या रूपानें अद्यापही अंशतः चालत आहे. त्यांची वंशावळ येणेंप्रमाणें:—

गोपाळभट ( श्रीशिवछत्रपतीस मंत्रोपदेश करणारे. )
|
रामभट
|
शामभट ( शाहूमहाराजांपासून वरील सनद मिळविणारे. )
|
रामभट ( यज्ञकर्ते, येथपासून त्यांस दीक्षित उपनांव पडलें. )
|
यज्ञेश्वरदीक्षित.
|
कृष्णदीक्षित ( अग्निहोत्री. )
|
नारायणदीक्षित*.

हे सर्व पुरुष विद्वान् व कर्मनिष्ठ होते असें कळतें. नारायणदीक्षितांचे चिरंजीव मोरदीक्षित सांप्रत विद्यमान आहेत. ते व त्यांचे दत्तकपुत्र कृष्णदीक्षित हेही विद्वान् असून कर्मनिष्ठ आहेत. वरील सनदेची अस्सल प्रत मोरदीक्षितांकडे पाहाण्यास मिळेल.

**का. ना. साने.**

---

* येथें गोपाळभटजीपासून नारायणदीक्षितांपर्यंत सरळ पिढ्या तेवढ्याच दिल्या आहेत. भाऊबंद वगैरे आहेत ते येथें दर्शविले नाहींत.

# १५ पत्रिका एकावन्न.


पुढील पत्रिका पिंपळगांव (सेल) येथील रा. रा. नाना राजूरकर यांच्या येथें सांपडल्या.

वि. का. राजवाडे.

अकबर.




औरंगझेब.



बाजीराव धाकटे.




राजा चंदूलाल.




अप्पासाहेब कुरुंदवाडकर.



बापूसाहेब कुरुंदवाडकर.




दाजीसाहेब कुरुंदवाडकर.




दाजीसाहेब कुरुंदवाडकरांची स्त्री.




प्रतिनिधि सातारकर.




बाळासाहेब पटवर्धन.
अप्पासाहेबांचा पुत्र.



बाबासाहेब सांगलीकर.



अप्पासाहेब सांगलीकर.




मिरजकर.




इचलकरंजीकर.




### तात्यासाहेब सांगलीकर.




### सयाजीराव गायकवाड.




### दमाजी गायकवाड.





### परशुरामभाऊ पटवर्धन.




### अप्पासाहेब पटवर्धन.





### चिंतामणराव पटवर्धन.




### गोपाळराव पटवर्धन.





### चिंतामण बल्लाळ पेशवे.




### बाजीराव बल्लाळ.




### नातू.




### फत्तेसिंग गायकवाड.




### दत्ताजी शिंदे.



### महादजी शिंदे.




### दौलतराव शिंदे.




### बाबा मेणवलीकर.




### गोपी नागदार.




श्रीपादभट.




निपाणीकर.



रणजितसिंग.




शिवाजी.




शहाजी.



बुवासाहेब.




रघोजी भोंसले.




थोरले माधवराव पेशवे.




### युधिष्ठिर.




### विक्रम.




### चिदंबर दीक्षित.



### नाना फडणीस.




### जनकोजी शिंदे.




### मानसिंग.




### मच्छ.




### कच्छ.




वराह.




श्रीरामचंद्र.





श्रीकृष्ण भगवान.




खंडेराव गायकवाड.




मल्हारराव गायकवाड



# काहीं शब्दांची व्युत्पत्ति.

२

( वि. का. राजवाडे. )

( २०३ ) अटाट.

धातोरेकाचो हलादेः क्रियासमभिहारे यङ् ( ३—१—२२ ).

* पौनःपुन्यं भृशार्थो वा क्रियासमभिहारः

अट—अटाट्यते ( ∴ अटाट ) अति हिंडणें, जिवापाड मेहनत करणें.

( २०४ ) अर्ध + ल = अर्धल = अधलं = अधेला—अधेली—अधेलें.

अधेला रुपया ह्मणजे अर्धा रुपया

अधेली रुपी

अधेला साप

अधेलें ( न० ) = क्षुल्लक साप.

अधेला पैसा, अर्धी.

( २०५ ) अमूप, मोप, म्होप.

अनुपम = अनुपअँ = अमूप, मूप, मोप, म्होप.

( २०६ ) अंकनक = अँअणअ = आणा.

( २०७ ) आंबट.

अंबष्ठ = आंबट ( ब्राह्मणात् वैश्यायां जातः )

कनिष्ठ जातींत आंबठ, गोंड, कडू असे भेद सध्यां हि आहेत.

( २०८ ) ईर.

हा मराठींतला शब्द वेदकालीन आहे. ह्याचा संबंध कंड्वादिकांतील इरस् ( इरस्यति ) ईर्ष्यायां ह्या धातूशीं येतो.

ईरेस पडला = ईर्ष्येस पडला.

प्यादा ईरेंत पडला = प्यादा ईर्ष्येंत पडला.

( २०९ ) उक्त.

अवक्रयः = मोल ( अमर, द्वितीयकांडः ७९ वैश्यवर्गः )

अवक्रीत = ओकत = ओक्त = उक्त, साक्षात् मोल देऊन आयतें तयार केलेलें द्रव्य.

( २१० ) उजेड, उजेडणें.

युत् जुत् भासनें । उत् + युत् वा उत् + जुत् = उज्युत् उज्जुत् ।

नाम उद्योत वा उज्जोत । उज्जोत = उज्जोड = उजोड ।

ओ स्थानें ए होऊन उजेड.

**( २११ ) उलिसें.**

हा शब्द अल्पीयस् पासून निघाला आहे. आदेश ध्यानांत ठेविण्यासारखे आहेत. अ = उ; ल्प = ल.

अल्पीयस् = उलिअस = उलिसें ( अति थोडें ).

**( २१२ ) उसणारे.**

हें आडनांव महाराष्ट्रांत ब्राह्मणादिकांत आहे. हें उशनिरस् या संस्कृत जनपद-देशवाचक शब्दापासून आलेलें दिसतें.

**( २१३ ) ऐरणी, मावळण, माउली.**

अर्याणी = अयरणी = ऐरणी ( पूजन ) = अहिरणी ( महीरणी ) किंवा आचार्याणी = आयरणी = ऐरणी.

मातुलानी = माउलाणी = मावळाणी = मावळाण = मावळण.

मातुलः = माउळा = मावळा.

मातुली = माउली = मावली, माउली.

* शक लोकांत मंद म्हणून एक वर्ण होता. त्या शब्दाचें स्त्रीलिंग मंदानी. Mandanè हा शब्द ग्रकि इतिहासकार जो Herodotus तो देतो. ही मंद लोकांची राणी, हिनें Kyrus ऊर्फ कुरुस, पर्शु लोकांचा राजा, त्याचा पराभव केला. ह्या पराभवांत कुरुस् वारला.

शेटाणी हा शब्द इंद्राणी शब्दासारखा आहे. इंद्र, इंद्राणी; तसें, शेट, शेटाणी. श्रेष्ठिन् चें स्त्रीलिंग श्रेष्ठिनी. त्याचें मराठी (सेट्टिणी) शेटिणी, शेटीण असें व्हावें व होतें. परंतु शेटाणी हें रूप कांहीं श्रेष्ठिनीपासून निर्वचतां येत नाहीं. हा आनी प्रत्यय संस्कृतांत तरी आला कोठून ! वैदिक भाषेंत इंद्राणी शब्द आहे. वैदिक भाषेंत तरी हा प्रत्यय आला कोठून ! हा पूर्ववैदिक स्त्रीलिंगाचा प्रत्यय आहे.

महार्याणी = महीरणी.

**( २१४ ) काणेली.**

कन्या = कण्णा = काणा = काणेली

काणेलीमातर् ह्मणजे तो ज्याची आई कन्या आहे.

**( २१५ ) कात ( सापाची ).**

कृत्ति = कत्ति = काति = कात.

दें - डी प्रत्येय लागून कातडें - डी.

**( २१६ ) किडा.**

( स्त्री. ) क्रीडा ( मस्करी, थट्टा ) = कीडा = किडा ( पु. आकारामुळें ) त्याला किडा आला आहे = तस्मै क्रीडा आगता, प्राप्ता; स क्रीडितुं इच्छति.

पीडा = पिडा ( इडापिडा ).

**( २१७ ) किरसाण.**

कृपाणः - शेतकरी.

क्षपाण = किरसाण.

हा शब्द Early History of the Kokan, P. 19 note. मध्यें आला आहे.

## ( २१८ ) गांडींत नाहीं गू आणि कावळा करतो कुकवाकू.

रुकवाकु = कुकवाकू.

रुकवाकु ह्मणजे मोर.

अंगांत तें सामर्थ्य नसतांना कावळा मोराचा शब्द जो रुकवाकू तो काढूं पहातो.

## ( २१९ ) कुदाळ.

कूट = खोदा; आळ हा प्रत्यय लागून कूटाळ.

त्याचें ऱ्हस्व उकार होऊन कुटाळ.

## ( २२० ) कुह्या.

हा शब्द ज्ञानेश्वरींत (मुकुंद. ज्ञा. १४·३८७; १५·४५५) येतो. तेथें त्याचा अर्थ कूप, विहीर असा करतात. खरा अर्थ धुकें असा आहे. (सं.) कूहा (स्त्री.) किंवा कुहक, कुहअ, कुहा.

## ( २२१ ) खड्डा.

वर्षपरीतः प्रतिलोमकर्षितस्त्रिः परिक्रम्य **खदायामर्कं** क्षिप्रं संवपति ॥ ७ ॥

( कौशिकसूत्र ३८, पृष्ठ १०८ Bloomfield. )

दारिलनामकटीकाकार म्हणतो : खदा नाम स्वभावजः गर्तः ।

केशवनामकटीकाकार म्हणतो : खदां खात्वा...

खदा ह्या शब्दाचा खद्दा असा द्वित्त उच्चार करून व द स्थानीं डादेश करून खड्डा असा मराठी शब्द निष्पन्न झाला आहे. संस्कृत स्त्रीलिंगाचें मराठी पुल्लिंग आकारान्तत्व केलें आहे.

ह्या शब्दावरून असें दिसतें कीं, प्राकृतभाषेंतील ह्मणून मानलेले देशी शब्द मूळ संस्कृतांतून घेतले आहेत. आणि अशी जर गोष्ट आहे तर प्राकृत व प्राकृतिक भाषा संस्कृतापासून निघालेल्या आहेत. स्वतंत्र नाहींत.

## ( २२२ ) उकिरडा.

ह्या शब्दावरून असें दिसतें कीं दारिल व केशव हे दोघे हि Secondary प्राकृत ह्मणजे प्राकृतिक, मराठी वगैरे भाषा बोलणारे होते.

कौशिकसूत्र २८ । २

दारिलः– अवकर = उकुरटिकातृणानि

केशवः– उकरिडिका मार्जनिकातृणं

अर्थात् केशव हा महाराष्ट्रब्राह्मण आहे.

## ( २२२ अ ) पिप्परी.

कौशिकसूत्र २० । २२

प्लक्षोदुंबरः पिप्परीति प्रसिद्धः (!)

Bloomfield उद्गार व आश्चर्य कां दाखवितो न कळे.

(२२२ ब) महुमद.

केशव Mahomedan ह्याला महुमद शब्द योजतो.

(२२३) खवखवणें.

क्षव (खोकला) = खव

द्वित्वानें

खवखवणें.

(२२४) खांडववन.

सध्या हिंदुस्थानच्या पूर्वेकडील देशांत 'खांड' म्हणून लोक आहेत. त्यांचें च पूर्वीचें म्हणजे भारतकालीं तरी 'खांडव' असें नांव असे. ह्या खांडववनांत च सध्याचें 'खांडवा' हें शहर आहे. भिमाशंकराच्या पायथ्याशीं तळकोंकणांत कर्जतापासून सहा कोसांवर खांड ह्मणून गांव आहे. तेथें सध्या कोळी ऊर्फ कोळ लोक राहातात. ह्या कोळ लोकांच्या प्रदेशाला 'कोळवन' म्हणतात. कोळांवरून जसें कोळवन तसें गोंडांवरून 'गोंडवन'. कोळवन, गोंडवन व खांडवन अशीं वनशब्दान्त नामें ह्या कोळ, गोंड व खांड लोकांच्या प्रदेशाला फार पुरातन कालापासून असलेलीं दिसतात. वह उत्तरपद लागून खांडववह. त्याचें प्राकृत खांडवा (ग्रामनाम). प्रस्थपुरवहन्ताच्च (४–२–१२२). मुंडवा, सैंधवा, हीं रूपें हि अशाच मासल्याचीं होत.

(२२५) खांब.

हा मराठी शब्द संस्कृत स्तंभ, महाराष्ट्री खंभ, अशा परंपरेनें निष्पन्न झाला, ह्मणून प्राकृत वैय्याकरण समजतात. परंतु, ती चूक आहे. स्तंचा महाराष्ट्रींत त्थ, थ, ठ्ठ होईल; क्ख, ख होणार नाहीं. पुण्यस्तंभ = पुणथंब; रणस्तंभोर्वी = रणथंबोर; या स्थलीं स्तचा थ यथार्थ झालेला आहे. खांब ह्या मराठी व क्खंभ या महाराष्ट्री शब्दांतील ख स्तापासून निघालेला नाहीं; स्कपासून निघालेला आहे. पाणिनीय स्कंभ् धातूपासून महाराष्ट्री क्खंभ व मराठी खांब निघालेला समजणें युक्त आहे.

(२२६) खुत्कन् हसणें.

क्षुत् (शिंकणें) = खुत्.

शिंकण्यासारखें अल्प हसणें.

(२२७) खोटें.

कूट = खुट = खोट (टें, टा, टी) (असत्य).

(२२८) खंडोबा.

हेमचंद्र हरस्कंदौ ह्या संस्कृत द्विवचनाचें हरखंडा असें प्राकृत रूप देतो. खंडा हें अनेकवचन आहे; कां कीं प्राकृतांत प्रायः द्विवचन नाहीं. तात्पर्य स्कंद ह्या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप खंड असें होतें. त्याचें ममतादर्शक मराठी रूप खंडू व प्राशस्त्यदर्शक मराठी रूप खंडोबा. म्हणजे महाराष्ट्रांत जेजूरी, पाली वगैरे ठिकाणचे जे खंडोबा आहेत ते मूळचे स्कंद होत. स्कंद म्हणजे कार्ति-

कस्वामी. कार्तिकस्वामीचें देऊळ पुण्याच्या पर्वतीस आहे, तें स्कंदाचें म्हणजे खंडोबाचें च होय. इतकें च कीं पर्वतीवरच्या त्या देवाचें नांव संस्कृत आहे व जेजूरीच्या देवाचें नांव प्राकृत आहे. स्कंद ही देवता वीरांची व योध्यांची फार पूर्वीपासून आहे. स्कंदाला सेनानी हें अपरनाम आहे. त्याची उपासना वीर करतात. महाराष्ट्रांतील सर्व जातीचे मराठे (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, रामोशी वगैरे ) खंडोबा हें आपलें कुलदैवत कां समजतात, तें वरील उद्घाटना-वरून समजणार आहे. खंडोबा हें शिवदैवत आहे, असें कित्येक लोक समजतात, तें अर्थात् निराधार आहे. स्कंदपुराणांत स्कंदोपासकांची म्हणजे खंडोबाच्या उपासकांची माहिती सांपडते.

**( २२९ ) गर्मी, परमा.**

ह्या रोगांचा उल्लेख कौशिकसूत्रांत २७।३२ त केला आहेः—

मुंचामि त्वेति ग्राम्ये पूतिशफरीभिरोदनम् । दारिलः,—ग्राम्यो व्याधिः मिथुनसंयोगात् पितादूरिति प्रसिद्धाभिधानः ।

**( २३० ) चटकर, चटकन्, चटदिनि, पटकन्–र, पटदिनि.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | खटकन्, | खटदिनि, | मटकन्, | मटदिनि |
| **झटकर-रि** | झटकन्, | झटदिनि, | फटकन्, | फटदिनि |
| | सटकन्, | सटदिनि, | लटकन्, | लटदिनि |
| | कटकन्, | कटदिनि, | गटकन्, | गटदिनि |
| | ताडकन्, | ताडदिनि, | थाडकन्, | थाडदिनि |
| | भाडकन्, | भाडदिनि, | हटकन्, | हटदिनि |

न्यधादुत्क्षिप्य समरभद्रं चटदिति क्षितौ ॥ ९२ ॥

कथासरित्सागर—तरंग ७४
निर्णयसागर.

चट्कृत्वा = चट्करून् = चटकन्,
चट्कृत्य = चटकरि, चटकर
चटदिति = चटदिनि
त चा न झाला आहे.
करि, कर, करून, कन् ( कुन असें पूर्वीचें मधलें रूप ).

**२३१ ) चतुर्थ + ल = चउ + ल = चवल.**

चवला, चवली, चवल. ( अर्ध्या रुपयाचा चतुर्थांश ).

**( २३२ ) जाल ( ला–ली–लें ).**

ज्ञानेश्वरीच्या व्याकरणांत जन् जात पासून ( जात + ल = जाअल = जाह-ल अथवा जाल = झाल ) जाल व्युत्पादिलें होतें. परंतु हा शब्द अथवा उच्चार दुसऱ्या एका तऱ्हेनें उत्पन्न झाला आहे, असें दिसतें. तिला पुत्र झाला, येथें जन् धातूत्पत्ति आहे. परंतु एक राजा झाला, येथें जन् धातू नाहीं. ग्रेथें झाला हें अस् भावे पासून निघालें आहे. अस् ( निष्ठा )—स्त. स्त + ल =

स त ल = झअल = झाल = जाल. स्त हें निष्ठारूप लुप्त वैदिककालीं हि झालेलें होतें. पण प्रांतिक भाषांत प्रचारांत होतें. त्याला प्रत्यन्तरपुरावा जाल हा मराठी शब्द आहे. भू- भूत–पासून ज्ञानेश्वरींत भूतल असें रूप येतें. होळ, असें रूप कांहीं कनिष्ठ जातींत आढळतें. राजा झाला ह्मणजे जन्मला असा अर्थ नाहीं; अभूत्, अभवत्, आसीत् असा अर्थ आहे. तेव्हां अस् च्या निष्ठारूपांपासून हा जाल शब्द निघाला आहे.

## (२३३) जुगारी व जुवारी.

युगहारी = जुगहारी = जुघआरी = जुघारी = जुगारी

द्यूतकारी = जुअआरी = जुआरी = जुवारी.

हीं दोन्हीं रूपें मराठींत प्रचलित आहेत. युग हा शब्द फांसा ह्या अर्थी संस्कृतांत फार जुना आहे.

## (२३४) मीं झवँ तुह्माला व तुह्मीं झवँ मला.

हें विनोदपर वाक्य सर्वांना माहीत आहे. यावत् = जावँ = जवँ = झवँ.

अहं यावत् युष्माकीनः
यूयं यावत् मामकीनाः ॥

या संस्कृत वाक्यांचें वरील वाक्यें भाषान्तर आहेत.

यावत् ~ तावत्

## (२३५) टोक, टोंक.

मनुष्यान् रसान् रागान् गंधान् अन्नं चर्म गवां वशां श्लेष्मोदके तोक्मकिण्वे पिप्पलीमरीचे धान्यं मांसं आयुधं सुकृताशां च ॥ १२ ॥

आपस्तंबीयधर्मसूत्रं १–७–२०–१२

हरदत्तः उज्ज्वलायां:—

तोक्मानि ईषदंकुरितानि व्रीह्यादीनि.

तोक्मन् = मोड, त्यावरून टोंक

तोक्म = टोक्क = टोक, टोंक.

## (२३६) ठिंठाकराल.

हा शब्द कथासरित्सागराच्या १२१ व्या तरंगाच्या ७२ व्या श्लोकांत आला आहे. तसाच कर्पूरमंजरींत हि टेंटाकराल आला आहे. सोमदेवानें बृहत्कथेचा तर्जुमा संस्कृतांत यथामूल केला. तेव्हां गुणाढ्यानें ठिंठाकराल हा शब्द योजिला, असें ह्मणावें लागतें. ठिंठाकराल हें कथासरित्सागरांत कितवाचें नांव आहे. हा कितव जुगारी असे.

गुणाढ्य विक्रमादित्याचा उल्लेख करतो. सप्तशतीचा कर्ता व गुणाढ्याचा आश्रय जो हालसातवाहन तो हि विक्रमादित्याचा उल्लेख करितो. गुणाढ्य उज्जयनीच्या पालकराजाचा हि उल्लेख करितो. हा पालक विद्याधरचक्रवर्ति जो नरवाहनदत्त त्याचा समकालीन होता, असें गुणाढ्य ह्मणतो, पालकाच्या वंशांत शूद्रक झाला असल्यास तो विक्रमादित्याच्या पूर्वी झाला असला

पाहिजे. प्रायः शूद्रक विक्रमादित्याच्या पूर्वी व नरवाहनदत्तोच्यां नंतर झाली असावा. ह्मणजे मृच्छकटिक शकपूर्व २०० च्या पूर्वी व पांचशेंच्यानंतर रचिलें गेलें असावें. हीं सर्व विधानें गुणाढ्य प्रमाण धरल्यास विश्वसनीय समजावयाचीं आहेत.

**( २३७ ) तांबट.**

ताम्रकुट्ट = तामउट्ट = तामुट = तामट = तांबट.

**( २३८ ) दाल = डाळ, डाळें.**

**( २३९ ) द्रम्म.**

हा शब्द ग्रीक drachm या शब्दापासून निघाला आहे किंवा असावा असा आग्रहपूर्वक तर्क कित्येक यूरोपीयन शब्दविद् किंवा शाब्दिक करतात. परंतु तें ह्मणणें सशास्त्र दिसत नाहीं. कारण ( १ ) ग्रीक drachm ह्या शब्दाची ग्रीक भाषेंत व्युत्पत्ति कोणीं दाखविलेली नाहीं. ( २ ) ग्रीकभाषेंतील ग्रंथांत किंवा नाण्यावर हा शब्द संस्कृत भाषेंतील ग्रंथांतल्यापेक्षां किंवा नाण्यांपेक्षां पुरातन कालीं येतो, असें हि कोणीं दाखविलेलें नाहीं.

द्रम्म हा शब्द प्राकृत आहे. द्रम् धातूपासून द्रम्य कृदन्त होतें. द्रम् गतौ. द्रम्य म्हणजे That which wanders, circulates. द्रु धातूपासून द्रव्य कृदन्त होतें त्याचा हि अर्थ That which moves, wanders, circulates असाच आहे. सारांश द्रव्य व द्रम्य हे दोन्ही शब्द एका च अर्थाचे आहेत. द्रम्य ह्याचें प्राकृत द्रम्म. द्रम्म याचें प्राकृत दाम. द्रम्म ह्मणजे Circulating money असा मूळ अर्थ. नंतर तो शब्द एका विशिष्ट नाण्याला लावूं लागले. द्रम्म सोन्याचे, रुप्याचे किंवा तांब्याचे असत.

तात्पर्य हा शब्द मुळीं ग्रीक भाषेंतील नाहीं; संस्कृत भाषेंतील आहे. विशेष प्रचार प्राकृत भाषेंत आढळतो. मुळीं हा शब्द पंजाबापासून असुर्या देशांतील प्राकृत भाषांत प्रचलित असावा व तेथून ग्रीक ऊर्फ हेलेनिक लोकांनीं तो उचलला असावा.

चलन, चलनी हे शब्द हि चल् गतौपासून च निघाले आहेत.

Currency, circulation हे हि शब्द गत्यर्थक धातूंपासून च निघाले आहेत.

द्रु = द्रव्य, द्रविण.

दाम याचें क्षुद्रत्व दर्शक रूप दमडी, दामाडू.

**( २४० ) तू कां दुखतोस ?**

कंड्वादिगणांत दुःख ( दुःख्यति ) दुःखं अनुभवति धातु आहे.

तू कां दुखतोस ! = तू कां दुःख अनुभवतोस !

**( २४१ ) द्वि + आणिका = दु + आणी = (दुवाणी) = दुगाणी** (अर्धा आणा ).

**( २४२ ) धमनी.**

गुजराथेंत बैलांची दमणी ह्मणून एक चलाख जात आहे. दमणी बैलांच्या गाड्या दगडगोटे यांच्या वरून इतक्या जलद जातात कीं त्या घोड्याला हि

आटपत नाहींत. धरमपूरचे राजे ह्या गाड्या ठेवतात. ह्या द्रमणी शब्दा-वरून मराठी धमनी शब्द झाला आहे.

( २४३ ) **नामांकनकं = णाआँअणअँ = णाँणँ = नाणँ = नाणें.**

नाण हा शब्द शुद्ध प्राकृतिक आहे. त्याचें पुन्हां संस्कृत नाणकं. हा शब्द मृच्छकटिकांत येतो.

२४४ ) **नावारूपाला येणें.**

" तो मनुष्य नावारूपाला आला, " ह्या वाक्यांत **नावारूपाला** ह्मणजे **योग्यतेला** असा अर्थ आहे. हा अर्थ **नावारूपाला** येणेंप्रमाणें आला. प्रशंसायां रूपं ( ४–३–६६ ) असें पाणिनीचें सूत्र आहे. सुबंत किंवा तिङन्त शब्दापुढें रूप हें पद लागून तो शब्द प्राशस्त्यार्थी होतो. जसें, पटुरूपः ह्मणजे प्रशस्तपणें पटु–चांगला कर्तबगार. तसेंच, नाम ह्या शब्दाला रूप लागून नामरूप शब्द झाला. अर्थ चांगलें, प्रशस्त, स्तुत्य नांव ऊर्फ कीर्ति. नामरूप ह्याचें मराठी नावरूप. चतुर्थीचा ला प्रत्यय लागतांना नांव हा शब्द तसा च रहातो किंवा रूपशब्दाप्रमाणें आकार घेतो. नावरूपाला किंवा नावारूपाला.

( २४५ ) **निष्क.**

निष्क् to weigh.

१ निष्क = सुवर्ण = कर्ष ( १६ मासे = माषाः )

कार्षापण = १६ मासे.

५ { सुवर्ण कार्षापण.
६ { रौप्य कार्षापण.

७ टंक.

८ द्रम्म ( द्रम् to go ).

९ पण, पाण, पाणक ( आणक ).

१० नाणक.

११ काकिणी.

१२ कपर्दिका.

१३ बदाम = २ दाम.

१४ गद्यान.

दक्षिणा चात्र देया वै निष्कत्रयसुवर्णकं

( हरिवंशः अन्त्य अध्यायः ७ श्लोक. )

निष्कत्रयसुवर्णक = तीन निष्क सुवर्ण.

१५ विश्वा, विस्वा ( विंशक ) अठरा विश्वे दरिद्र.

( अमरकोश– द्वि. का. वैश्य वर्ग ८५–९० श्लोक ).

**रुप्याचें नाणें.**

५ गुंज = आद्यमाषक

१६ माष = कर्ष, अक्ष, ( रुप्याचा ) ( तोळा )

४ कर्ष = पल

## सोन्याचें नाणें.

१० गुंजा = सुवर्ण, विस्त ( हेम्नोऽक्षे )
४ सुवर्ण = कुरुबिस्त, सुवर्णपल
१०० सुवर्णपल = तुला
२० तुला = भार
१० भार = आचित ( शाकटो भारः )

## रुप्याचें नाणें.

कार्षापण, कार्षिक ( रौप्य ).
ताम्रिके कार्षिके = पणः
रूप्यं = मुद्रितं
रूप्यकः = रुपिया = रुपया

नाणक हा शब्द अमरांत नाहीं.
नामांकण = नावांवण = नाण
नाण = नाणावलेला, नांवाजलेला.
नामार्चित = नावाजलेला
नामांकनं = नावांअण = नाण.

### ( २४६ ) निहाळणें.

निहाळणें हा शब्द न्याहाळणें असा हि उच्चारितात. भल ( भालयति चुरादि ), पहाणें, निरीक्षिणें.

निभालू = निहाळ ( णें )
न्याभालू = न्याहाळ ( णें ).

### ( २४७ ) पागल.

पागल ( संस्कृत ) = पागळ ( वेडा, व्यंग, दुबळा ).

### ( २४८ ) पाटीवर बसणें.

पाटी ( Arithmetic ) पाटीवर बसणें म्हणजे अंकगणिताला प्रारंभ करणें.

### ( २४९ ) पाडा-डे.

पाटी, पाटः ( अंकगणित )
पाटः = पाडा ( अंकगणित ).

### ( २५० ) पाथरवट.

प्रस्तरकुट्ट = पाथरवुट = पाथरवट = पाथरट.

### ( २५१ ) पादणें, पाद.

पर्द कुत्सिते शब्दे । गुदरवे इत्यर्थः । तिङन्ते भ्वादयः ।
पर्द = पाद ( पादणें, पाद. ) गुदं पर्दते = गांड पादते.

१३

**( २५२ ) पान.**

साप चावला ह्मणजे पान लागलें असा प्रयोग महाराष्ट्रांत करितात. येथें पान म्हणजे साप असा अर्थ आहे, झाडाचें पत्र असा अर्थ नाहीं. साप हा अर्थ कसा तर असाः—

( सं. ) पन्नग = ( महा. ) पण्णअ = ( जु. म. ) पाण = ( न. म. ) पान. ( १ ) पुष्कळ शब्दांचीं लिंगें मराठींत बदलतात ह्मणून व ( २ ) पान ( पत्र ) ह्या मराठी शब्दाच्या लिंगाचें अनुकरण करून, पान ( सर्प ) हा शब्द मराठींत नपुंसकलिंगी बनला आहे. पान लागलें = साप ( पायाला वगैरे ) लागला.

**( २५३ ) पाद + ल = पाअ + ल = पावल.**

पावला रुपया ह्मणजे पाव रुपया, पावली.

**( २५४ ) पाळंदे.**

हें आडनांव पालद ह्या पाणिनीय शब्दाचा अपभ्रंश दिसतो. प्रस्थोत्तरपदपलद्यादिकोपधादण् ( ४–२–११० ) ह्या सूत्रांतील पलदी शब्दाला अण् प्रत्यय लागून पालद झालें. पलदी प्रांतांत किंवा गांवांत रहाणारा जो तो पालद. मराठींत अनुस्वार होतो; ह्या नियमानें पाळंद ( प्रंग, कदांचित्, इ. इ. इ. ).

**( २५५ ) फुटाणा.**

स्फुट + धान्यक = फुट + दाणा = फुट + आणा = फुटाणा.

**( २५६ ) बरकत.**

बरी + गती = बरगत = बरकत. वर = बर. कर्मधारय होतांना प्रथम शब्दाचें मूळरूप.

**( २५७ ) बाप** ( पिता ).

पा = पालन करणें. कुर्भ्रश्च ( उणादि सूत्र २२ ) प्रमाणें पपुः पालकः
पपु = बपु = बापु = बप्प.

**( २५८ ) बापु** ( चातक ).

चातक या अर्थी बापु शब्द महाराष्ट्रींत आहे. ज्ञानेश्वरींत बापिया असा शब्द आहे. हा शब्द संस्कृत पा धातूपासून आला आहे. पा = पिणें. पपु = पिणारा. पपुरेव पापुः.
पापु = बापु = बापिया, बापु.

**( २५९ ) भाड्या.**

ब्राह्मण्यां वैश्याद् यो वैदेहको जातः तेन राज्ञां शुद्धान्ते अंतःपुरे स्थित्वा राज्ञीनां रक्षणं कर्तव्यं । तेन सामान्यवनिताः पोष्याः । तेषां भाटी तस्य जीविका । स शूद्राद्धीनः । पण्यांगनानां राज्ञां च तदिच्छया संगतं कुर्यात् ॥

भाटी ह्मणजे भाडें.

सामान्यवनितांच्या भाड्यावर उपजीविका करणारा जो वैदेहक तो च भाटिक.

माटिकः = भाडिआ = भाड्या

हा शब्द प्राकृत स्त्रिया प्राकृत पुरुषांना अपशब्दार्थी सध्यां महाराष्ट्रींत लावितात.

☞ वरील उतारा जातिदर्पणनामक ग्रंथांतून–मजजवळ असणाऱ्या–पृष्ठ ४, पंक्ति ७।८।९–घेतला आहे.

**( २६० ) मुर्मुरे.**

मुर्मुर = तुसांवर किंवा पानांच्या पाचोळ्यावर किंवा भुसावर भाजलेलें भात.
मुर्मुरक = मुर्मुरा.

**( २६१ ) मेंग** ( सापाची ).

मृतांग = मिअंग = मेंग. साप मेंग टाकतो ह्मणजे साप मेलेली कातडी टाकतो.

**( २६२ ) म्हस, म्हैस.**

हे दोन्ही शब्द मराठी शब्दकोशांत मान्य समजावे. संस्कृतांत महस् व महिषी अथवा महिस् असे शब्द आहेत. त्यांवरून प्राकृतांतून मराठींत म्हस व म्हइस ऊर्फ म्हैस शब्द आले आहेत. म्हशीला व म्हैशीला अशीं रूपें मराठींत होतात. तीं दोन निरनिराळ्या शब्दांचीं होतात. एका म्हैस या शब्दाचीं होत नाहींत. महिषः ह्या शब्दापासून म्हैसा हा पुल्लिंगी शब्द मराठींत झाला आहे. त्याचें दुसरें रूप भैंसा वऱ्हाडांत योजतात.

**( २६३ ) रुका.**

रुक्म ( सुवर्ण, लोखंड ) = रुक्क = रुक
रुक्मकः = रुका ( एक कनिष्ठ नाणें ).

**( २६४ ) मराठींतील ऱ्हस्वत्वदर्शक रूं प्रत्यय.**

गुरूं, मेंढरूं, वासरूं, पाखरूं, कोंकरूं, बकरूं, म्हसरूं, मछरूं, वाघरूं, हातिरूं; या शब्दांतील रूं हा प्रत्यय पाणिनीय ष्टरच् प्रत्ययापासून निघाला आहे. वत्सोक्षाश्वर्षभेभ्यश्च तनुत्वे ष्टरच् ( ५–३–९१ ) ह्या सूत्रांत तनुत्वदर्शक तर प्रत्यय सांगितला आहे. वत्स ( मूल ) आणि वत्सतर ( लहान मूल ).

वत्सतर = वच्छअर ( महाराष्ट्री )
= वच्छरु ( अपभ्रंश )
= वासरूं . ( मराठी ).

तरः; तरी; तरम् असा तिन्ही लिंगी हा प्रत्यय आहे.

गुतर = गुअर = गुरु = गोरूं ( ज्ञानेश्वरी ) = गुरूं.
पक्षितर = पक्खिअर = पक्खिरु = पाखिरु ( ज्ञानेश्वरी ) = पाखरूं.
बर्करतर = बक्करअर = बाकरु = बकरूं.
मक्षितर = मच्छिअर = मच्छिरु = मछरूं = मच्छर ( मच्छरदानी ).
मत्स्यतर = मछअर = मच्छरु = मच्छर ( मासमच्छर ).

व्याघ्रतर = वाघरूं.
हस्तितर = हातिरूं.
महस् + तर = म्हसअर = म्हसरुं = म्हसरूं.
कुक्कुरतर = कूउत्तर = कूत्तरुं = कुतरूं.
मयूरतर = मोरअर = मोअरुं = मोरूं.
पाडा, पाडी हे शब्द ह्मशींच्या वत्साला लावितात.
तर प्रत्यय लागून,
पाड + तर = पाडअर = पाडरूं = पारडूं.
पाड + तरी = पाडरी = पारडी = पारडें.
कोंकरूं व मेंढरूं ह्यांचे मूळ संस्कृत शब्द धुंडाळले पाहिजेत.

## ( २६५ ) रेकणें.

रेकणें = ह्मशीचा शब्द.
रेष = खिंखाळणें ( घोड्याचें ) =
आवाज ( म्हशीचा ).

## ( २६६ ) रेफ.

रिफ = कर्कश नाद करणें. ( नाम ) रेफ =
कर्कश नाद = र ( उच्चार ).

! अलीफ = अलेफ = अरेफ = अ हा कर्कश नाद करणें. आसुरभाषांत अ चा उच्चार कंठांतून करतात, तेव्हां अलेफ शब्द संस्कृत अरेफ ह्या शब्दाचा आसुर अपभ्रंश आहे.

## ( २६७ ) रेवन्त.

रेवन्त देवाचा उल्लेख वराहमिहिर–बृहत्संहिता अध्याय ५८ श्लोक ५६ व विष्णु-पुराण ३ ( २, ६, ७ श्लोक ) येथें आहे. ही देवता घोड्यावर बसून मृ-गया करीत असलेली कोरीत किंवा घडवीत. हिच्या प्रतिमा महाराष्ट्रांत खेडो-खेडीं सांपडतात. कलकत्त्याच्या Indian Museum मध्यें ह्या देवाची एक मृगयाक्रीड मूर्ति आहे. रेवन्त हा शब्द रैमत् = रेमन्तः ( अनेकवचन ) ह्या संस्कृत शब्दाचा महाराष्ट्री अपभ्रंश आहे–रैमत् म्हणजे श्रीमन्त, लक्ष्मीवान्; ' रेवन्त ' ह्या प्राकृत रूपानें ज्याअर्थी हा शब्द बृहत्संहितेंत व विष्णुपुराणांत येतो, त्याअर्थी हे दोन्ही ग्रंथ प्राकृत–महाराष्ट्री प्रचलित झाल्यावर बऱ्याच किंवा कांहीं कालानें झाले असले पाहिजेत. बृहत्संहितेचा काल प्रसिद्ध आहे. तोच विष्णुपुराणाचा काल असावा; कारण विष्णुपुराणांत गुप्तांचा उल्लेख आहे.

## ( २६८ ) लय.

लय काल, लय वेळ, लय पीक असे शब्द गांवढे योजितात. येथें लय

ह्मणजे **अंत.** लय वेळ ह्मणजे मर्यादातिकान्त वेळ; अमर्याद वेळ; अति फार वेळ. अर्थात्

लय ह्मणजे फार, पुष्कळ, अति, अमर्याद.

**( २६९ ) लढ्** ( to fight ) **युद्ध करणें.**

१ लढणें

२ लढाई

३ लढा

४ लढवय्या

५ लढाऊ

पाणिनीय धातुपाठांत **रध हिंसासंराध्योः** असा धातु आहे. हिंसार्थी रध् आहे. र चा ल् व ध् चा ढ् होऊन लढ् हें महाराष्ट्रींतून अपभ्रंशद्वारा मराठींत रूप आलें आहे. लढ् चा मूळचा अर्थ ठार मारणें. द्वितीयार्थ युद्ध करणें; तृतीयार्थ भांडणें; ईरेस पडून त्वेषानें वाद करणें; इत्यादि.

**( २७० ) लांकुड.**

लकुटः = } लकुड = लाकुड, लाकडी,
लगुडः = } लकडा.

लगुरः = लगुरी = लगोरी ( डाव ).

**( २७१ ) लाफ्या.**

लंफ = उडी मारणें.

लाफ्या = लंफक = उड्या मारणारा =
बोलतांना उड्या मारणारा =
गप्पा ठोकणारा.

**( २७२ ) लामणदिवा.**

लावण्यदीपक = लामणदिवा.

**( २७३ ) लाह्या.**

लांजिका = लाइआ = लाया = लाह्या
( Aspirated ) लाही ( एकवचन ).

**( २७४ ) लंका.**

लंका = दुराचारी स्त्री.

प्रस्तुत लहान पोरींना विनोदानें अपशब्दार्थी किंवा अवगुणार्थी लावतात.

**( २७५ ) लंगड ( डा–डी–डें ).**

लंग = पायानें व्यंग.

**( २७६ ) लंड.**

लंड = गू ( घ्या आमचा लंड = घ्या आमचा गू ).

**( २७७ ) लेंडं.**

लेंडं = गू ( पशूंचा ).

**( २७८ ) लौंड.**

लौंड = वेड्यासारखें वागणें.
लौंड = लौंड ( उन्मत्त, मूर्ख मनुष्य )
= लौंडा, लवडा ( उन्माद् = शिस्र ).

**( २७९ ) वलगणें.**

अवलगनं = वलगणँ = वलगणें.
" वलग्गए दिट्ठी "

हेमचंद्र–काव्यानुशासन–पृ. २४६–पं. ४
निर्णयसागर.

**( २८० ) वागळे.**

वाग्गुलिकः तांबूलकरंकवाही । वाग्गुलिकः = वागुळिआ = वागुळिया = वागुळ्या = वागळ्या = वागळे ( अनेकवचन ). हें आडनांव सारस्वतांत सध्यां आहे. इतर जातींत आहे कीं नाहीं, तें माहीत नाहीं. **तांबोळी** ( तांबुलिकः ) हें आडनांव देशस्थ ब्राह्मणांत सध्यां आढळतें.

**( २८१ ) शिकंदर.**

हा फारसी शब्द अलेक्सेंदर या ग्रीक शब्दापासून निघाला आहे, हें सांगावयाला नको च. निघण्याचा प्रकार असा.
अलेक्सेंदर = अलेक्सिंदर = कसिंदर = सिकंदर = शिकंदर
अले = अल् अरबी आर्टिकल झालें; व अल्सिकंदर असा शब्द बनला. पैकीं अल् हें आर्टिकल उडून, नुसता सिकंदर शब्द राहिला.
पुरातन शिलालेखांत अलिकसुंदर असें संस्कृत रूप या शब्दाचें आढळतें.
" नशीब शिकंदर " अशी ह्मण फारसींतून मराठींत रूढ झालेली सर्वांना माहीत आहे च.

**( २८२ ) शेणगंड, न्हावगंड.**

गंड = वीर, शूर पुरुष, श्रेष्ठ पुरुष
शेणगंड = शेणवयांतील उत्तम पुरुष ( विपरीत लक्षणेनें, अधम शेणवई )
न्हावगंड = स्नापिकगंडः ( उत्तम न्हावी, विपरीत लक्षणा )
ब्राह्मणगंड = उत्तम ब्राह्मण ( विपरीत लक्षणेनें, वाईट अधम ब्राह्मण )
शेणकूट = ( कूट = मुख्य, ) विपरीत लक्षणेनें, अधम, नीच शेणवई.

**( २८३ ) सकलाद.**

हा शब्द फारशींत सगलाद असा आहे; इंग्रजींत scarlet असा आहे. इटालियन भाषेंत scarlatto; तुर्की iskerlet ; फ्रेंच scarlate, असा आहे. मूळ

कोणत्या भाषेंत हा उत्पन्न झाला तें सांगतां येत नाहीं. Scarlet ह्मणजे एका प्रकारचें Broad-Cloth. Scarlet या रंगाशीं या शब्दाचा कांहीं संबंध नाहीं. चिनी भाषेंत Sakala ह्मणजे एका प्रकारची Silk-brocade. मराठेशाहींत सकलादी अफगानिस्थान, इराण व यूरोप या देशांतून महाराष्ट्रांत येत. येथें होत नसत. त्या अर्थीं हा शब्द परदेशी आहे, असें दिसतें. बहुशः फारशी सगलाद् शब्दावरून आला आहे. इंग्रजी scarlet हा हि शब्द फारशी सगलादवरून च घेतला असावा. एक r मध्यें घुसडून दिला आहे. हा इंग्रजी बोलण्याचा स्वभाव हि आहे.

**( २८४ ) समदें, मस्त.**

समस्त = समत्त = समर्ते = समदें ( सर्व )

समस्त = मस्त ( सर्व, पुष्कळ ).

**( २८५ ) समुद्र.**

सामुद्रिक = सामुद्दिआ =

समुद्या = समुद्दे = समुद्र.

हें आडनांव देशस्थ ब्राह्मणांत आहे.

**( २८६ ) हला !**

हा निपात प्राकृतांत स्त्रियाम् आहे. वैदिक निपात भल ( आकार, आव्हान ) = भल = हल ( पु. ) हला ( स्त्री. ).

वि. का. राजवाडे

# सूची १.


| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अजमीर | ५७ | इनू मिनू तिनू | २८ | कातर्डे | ९० | खेड सिद्धेश्वर शी- | |
| अटाट | ८९ | इंद्रवरुणभव० | ४ | कात्यायन | ४ | लालेख | ३९ |
| अभेला | ८९ | ईर | ८९ | काबाडकष्ट | २१ | खो | २२ |
| अपर | २४ | उकिरडा | ९१ | कायस्थ | १६ | खोर्टे-टा-टी- | १९, ९२ |
| अमूप | ८९ | उके | ८९ | कालवड | ३० | गड्डा | १९ |
| अरण्यान्मनुष्ये | ९ | उजळणें | २१ | किटकिटणें | ३२ | गबर | २२ |
| अरबट | २४ | उजवणें | २८ | किडा | ९० | गर्गादि° | ११ |
| अवृद्धादपि° | ५७ | उजाड | २५ | किनी | १९ | गर्मी | ९३ |
| अशोक | ६ | उजेड | २५, ८९ | किरसाण | ९० | गंगरसपंत | ६० |
| अष्टाधिकार | ७१ | उजेडणें | ८९ | की | २० | गंड | १०२ |
| असुरस्य स्वं | ७ | उटी | २१ | कुकवाकु | ९१ | गंधवाटी | ३२ |
| अळणी | २६ | उठवणें | २३ | कुची | ३२ | गार | २४ |
| अंकनक | ८९ | उबगणें | १८ | कुटाळ | ९१ | गाळी | २८ |
| अंडगडी | २८ | उभ | २२ | कुमारः श्रमणादि° | ९ | गांडींत नाहीं गू | ९१ |
| अंबाडा | ३२ | उमरावती | ५८ | कुम्भश्च | ९८ | गांधारी | ५६ |
| अंबाबाईचें नव- | | उलिसें | ९० | कुल्लक | १५ | ग्वाल्हेर | ३० |
| रात्र | ४२, ४३ | उसणारे | ९० | कुहा | ९१ | गोरा गोरा पाक | २६ |
| आंठवण | २२ | ए | २० | कुळंबी | १५ | गोरा गोरा पान | २६ |
| आउक्ष | १८ | ऐरणी | ९० | केरल | ४ | गोसावी नंदन | ३४ |
| आणि—आणू—, | | ओपणें | २२ | कोतवाल | ३० | घट्ट | २० |
| आनू° | १९ | ओवाळ | १८ | कोंडभट खन- | | चकण | २३ |
| आणा | २५, ८९ | ओशट | ३१ | काडे | ७२ | चकाल्या | २८ |
| आणीक | ३१ | कच्छाग्नि° | ५५ | कौशांबि | ५७ | चंची | २८ |
| आंधळी कोशिं- | | कच्छादिभ्यश्च | ५५ | खटनट | २५ | चटकर | ९३ |
| बिर | २७ | कफल्लक | १९ | खट्याक | २५ | चमचा | १८ |
| आंबट | ८९ | कभिन्न | १९ | खड्डा | ९१ | चर्या | ३१ |
| आंबवणी | २९ | कंबोजाल्लुक् | ४ | खंडोबा | ९२ | चवल | ९३ |
| आंबिल | २२ | कर्णाटक | ५५, ५६ | खंदार | ५६ | चांदराते | २५ |
| आहेर | २१ | कन्ह | २४ | खंमीर | १६ | चालकराव | ६० |
| आळ | ३० | कलाल | ३० | खवखवणें | ९२ | चाक | १८ |
| आळवणें | २१ | कल्याणदास ग- | | खारट | १९ | चुई | १८ |
| आळुमाळु | २५ | रूरराव | ६० | खांडववन | ९२ | चोख | २९ |
| इटीदांडू | २६ | कस्तुरी परीक्षा | ३३ | खांब | ९२ | चोल | ४ |
| इटेकरी | २९ | काणेली | ९० | खांबुल्यो | २६ | चोलणें | २१ |
| इठी | १८ | कात (सापाची) | ९० | खुतकनू | ९३ | छप्पापाणी | ११ |

जगद्धके ३०
जणु १८
जनी २९
जाऊं देणें ३१
जाड २८
जाल ( ला-ली-लें ) १३,१४
जुगारी १४
जुवारी १४
जेठी २५
जोगदेव ३०
जोशी, पाध्ये व नानासाहेब पेशवे ७२-७६
झटकर १३
झर्वे १४
ञ्यादयः ७
टोक १४
ठिंठाकराल १४,१५
ठी ३०
डचणें १८
डाव ३१
डुकर २९
डोंबल २१
ढेंकुण २४
तत्र नियुक्तः १४
ताठ २१
तांतड २८
तांबट १५
तांबोळी १०२
तुकारामाचा एक अभंग ३३
तुथ्थ २३
थिल्लर २४
थोरले कैलासवासी महाराज ७९
दंडाराजपरी २५
दंव २३
द्रम्म १५
दाठर २०
दाम १५
दाल १५
द्विवडे २३
दुस्तोस १५
दुगांणी १५
दुट्टें २३
दुधार ३२
दूण ३१
दूणी ३२
देवाचार २०
दोणस २३
धड २८
धणंतर ३२
धमनी १५,१६
धातोरेकाचो° ८९
धान्याभिवृद्ध्यर्थं° ४४
धाम २९
धूण २३
धूत १९
धूमादिभ्यश्च ५८
धोम ५८
नट ११,५६
नद्यां मतुप् ५८
नंतर २६
नाठाळ २५
नाणें १६
नांना फडणिसासंबंधीं आर्या ७३
नानासाहेब पेशवे ७३
नामर्द २७
नामा पाठक कें-दूरकर ७२
नारू २५
नावारूपाला येणें १६
नाँ १८
न्यारें २२
निकाम्या २७
निगरगट्ट २७
निच्छिवि ११
निनावी २७
निपजे २३
निपुत्रिक २७
निपुंसक २७
निबाप्या २७
निरंजन पंढरपूरकर ३४
निरुंद २२
निलाजिर २७
निष्क १६
निसरडें ३१
निहाळणें १७
निंबगांव खंडोबा (शिलालेख) ३८
निंबोळ्या २५
नेट २३
पखळण २१
पटकुर २४
पत्तन ५७
पथ्यध्यायन्यार्यं ९
परखंडी ५८
परमा ९१
परवड २९
पर्श्वादि ७
पलखा ५७
पवन विजय ३२
पळशीकर ७२
प्रगंडी ६८
प्रशंसायांरूप° १६
प्रस्थ=पत ( सोनपत, पानपत इ० ) ५७
प्रस्थपुरवहन्ताच्च १२
प्रस्थोत्तरपद° ५७
पागल १७
पाटीवर बसणें १७
पाणिनि ४
पाथरवट १७
पादणें १७
पाद्रा ५५
पापिटल १८
पान (साप) १८
पारध २८
पावटा २९
पावल १८
पाळंदे १८
पांगूळ ४२
पिचकारी ३२
पिचणें १८
पिस्या २८
पिप्परी ९१
पिरकारणें २९
पिळणें २३
पुंड २४
पेंच २३
पेंढारी २८
फसविणें ३०
फंद ३२
फासणें २९
फुटाणा १८
बडवा ३०
बडोदा ५५
बरकत १८
बंधुला २९
बाचणें १८
बाजीराव ३०
बाप १८
बापु ( चातक ) १८
बामणोली ३२
बामह १७
बिंजारी २०
बुबुळ २३
बेंबल १९
ब्रह्मा १२
भक्तिः १८
भडोच ५५
भप्प २८
भरु ५५
भंपक २३
भाड्या १८,१९
भामह १७
भालेराव ६०
भास्कर राऊ ६०
भिजणें २६
भिडणें २६
भिसे २०
भीतर २६
भीम १९
भोसल २४
मण ३१
मणे २०

मण्यारी ३०
मत्कुण २४
मम्मट १७
मर्लें ३२
मलखांब २६
मसूर जटाशंकर शिलालेख ४१
मसूर पोथी श्लोक ४१
मसूर भवानी शिलालेख ४१
महाराष्ट्रिक १४,१५
महुमद् ९२
मंत्र, तंत्र ४३-५४
मंदानी ९०
माउली ९०
मात २२
मानभावी सांकेतिक लिपी ७८,७९
मायण १७
मायदेव ३०
मावळण ९०
मिचर्णे १८
मिथर्णे २७
मुर्डुग्या २६
मुर्मुरे ९९
म्हस ९९
म्हैस ९१
मेंग ९९
मद्द २२
मोगर ३१
यवन ४
रती ३१
रध हिंसां १०१
रस्सी २३
रामदेवराव जाधव ६०
राष्ट्रक १२,१३
राष्ट्रिक १२,१३
राष्ट्रिय १२,१३
रुका ९९
रुंद् २१
रेंकर्णे १००
रेफ १००
रेवन्त १००
लगोरी २६
लढ(to fight)१०१
लय १००,१०१
लंका १०१
लंगड (डा-डी-डें) १०१
लंड १०१
लांकूड १०१
लाफ्या १०१
लामणदिवा १०१
लाह्या १०१
लिच्छिवि १२
लेखनप्रशस्ती६०६०
लेंडं १०२
लोधा २०
लौंड १०२
वठवर्णे २३
वत्सोक्षाश्वे ९९
वर्तक २९
वलगर्णे १०२
वळचण २१
वागळे १०२
वाटी २१
ढ्ढ (प्रत्यय) ९९
वाढ ३०
वारी २९
वारूळ ३१
वाहणा २२
विझावर्णे २८
विरजण ३०
विरापाल राजा६०
विहीर ३०
शाक ४
शण्डिकादिभ्योऽण् ११
शहाणा २३
शाक्य ११
शिकंदर १०२
शिवाजीचें राज्यार्पण ७१
शिवि १२
शीण ३२
शेणकूट १०२
शेणगंड १०२
शेमर्णे २९
शेल पिंपळगांव शिलालेख ३८
शेंदुर्णी खोलेश्वर शिलालेख ३७
सकलाद्१०२,१०३
सचकार ३२
सढळ २२
सबर २२
समर्दे १०३
समुद्र १०३
सरड २९
सर्वधातुभ्यः ष्ट्रन् १३
सवाई माधवरावाची जन्मपत्रिका ७०
संकलादिभ्यश्च ६
संभाजीचा शिक्का ७१
साम भारुत महाभारत मुकेश्वर व विष्णुदास नामारुत ३४, ३५, ३६
सातवण १४
सायण १७
सांकल ७
सांकेतिक पत्र ७६-७८
सांघर्णे २१
सांठवर्णे २२
सुई १८
सुद्री २५
सुरवाडर्णे २४
सोटभैरव २४
सोंपर्णे २२
हकारानि २१
हला १०३
हसन गंगो ब्राह्मणी५९, ६०
हळू २४
हंनरी २९
हंमीर १६
हातुल्यो २६
होट २०

# सूची २.

(एकावन जन्मपत्रिका.)


अकबर ८२
अप्पासाहेब कुरुंदवाडकर ८२
अप्पासाहेब पटवर्धन ८४
अप्पासाहेब सांगलीकर ८३
औरंगजेब ८२
इचलकरंजीकर ८३
कच्छ ८७
कृष्ण भगवान ८८
खंडेराव गायकवाड ८८
गोपाळराव पटवर्धन ८४
गोपी नागदार ८५
चंदूलाल (राजा) ८२
चिदंबर दीक्षित ८७
चिंतामणराव पटवर्धन ८४
चिंतामण बल्लाळ पेशवे ८४
जनकोजी शिंदे ८७
तात्यासाहेब सांगलीकर ८४
थोरले माधवराव ८६
दत्ताजी शिंदे ८५
दमाजी गायकवाड ८४
दाजीसाहेब कुरुंदवाडकर ८३
दाजीसाहेब कुरुंदवाडकरांचा बायको ८३
दौलतराव शिंदे ८५
नाना (बाळाजीपंत) ८५
नाना फडणीस ८७
निपाणीकर ८६
परशुरामभाऊ पटवर्धन ८४
प्रतिनिधी (सातारकर) ८३
फत्तेसिंग गायकवाड ८५
बाजीराव (धाकटे) ८२
बाजीराव बल्लाळ ८५
बापूसाहेब कुरुंदवाडकर ८२
बाबा मेणवलीकर ८५
बाबासाहेब सांगलीकर ८३
बाळासाहेब पटवर्धन (अप्पासाहेबांचा पुत्र) ८३
बुवासाहेब (सातारा) ८९
मच्छ ८७
मल्हारराव गायकवाड ८८
महादजी शिंदे ८५
मानसिंग ८७
मिरजकर ८३
युधिष्ठिर ८६
रघोजी भोसले ८७
रणजितसिंग ८३
वराह ८८
विक्रम ८७
शहाजी ८६
शिवाजी ८६
श्रीपादभट ८६
श्रीरामचंद्र ८८
सयाजीराव गायकवाड ८४


# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | पंक्ती | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६ | ३६ | सत्रांत | सूत्रांत |
| ११ | १३ | पश्चीबाल्हीनाः | श्चीनबाल्हीकाः |
| ११ | २२ | (४–३–१२) | काढून टाकणें. |
| १६ | ३७ | १ | १६ |
| २७ | १७ | निंपुसक | निपुंसक |
| ३० | ४।५।६ | | या तिन्ही ओळी काढून टाकणें. |